हलसूर येथील सोमेश्वर देवालय, नाडप्रभु केंपेगौडांच्या काळातील गवीगंगाधरेश्वर देवालय, दोड्डबसवण्णा देवालय, धर्मराय स्वामी देवालय इत्यादी होत. या शहरात शेकडो वर्ष जूने चर्च आहे. त्यापैकी प्रसिद्ध सेंट ॲड्रोस चर्च, सेंट जोसेफ चर्च मुख्य होत. त्याप्रमाणे मुस्लिमांच्या पवित्र अशा मशिदी आहेत. संगीन जामिया मशीद, जुम्मा मशीद, जामिया मशीद या होत. अलिकडच्या काळात 1981 मध्ये निर्माण केलेली खाद्रिया मशीद आणि बनेरघट्ट रस्त्यालगत 2015 साली बांधलेली बिलाल मशीद प्रमुख होत.

बेंगळूरु मधील प्रसिद्ध चर्च सेंट मेरीज बॅसीकल, सेंट मार्क केथड्रल, इनफँट जीझस चर्च, सेंट फ्रान्सीस झेवीयर केथड्रल इत्यादी.



विधान सभा



सेंट मेरी चर्च



जामिया मशीद

© KTBS Not to be republished

**बेंगळूरु ग्रामीण जिल्हः** हा जिल्हा 1986 मध्ये अस्तित्वात आला. या जिल्हयात चार तालुके आहेत. ते म्हणजे नेलमंगल, दोड्डबळ्ळापूर, देवनहळ्ळी आणि होसकोटे हे होत. नेलमंगल तालुक्यात शिवगंगे हे प्रसिद्ध यात्राक्षेत्र आहे. देवनहळ्ळी येथे केंपेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे.

## रामनगर जिल्हा

हा जिल्हा 23 ऑगस्ट 2007 रोजी अस्तित्वात आला. या जिल्हयात चार तालुके आहेत. चन्नपट्टन, कनकपूर, रामनगर व मागडी हे ते चार तालुके होत. या जिल्हयाची प्रमुख उद्योग केंद्र म्हणून वाढ होत आहे. बिडदी उद्योग राज्याचा प्रमुख केंद्र होय. तेथे हजारो लहान व मध्यम उद्योगधंदे कार्यरत आहेत. हा जिल्हा दोन मुख्य उत्पन्नासाठी प्रसिद्ध आहे. पहिले चन्नपट्टनच्या खेळातील बाहुल्या आणि दुसरे रेशीम उत्पादन होय.





चन्नपट्टन बाहुल्या

## चिक्कबळ्ळापूर जिल्हा

कोलार जिल्हयाचे विभाजन करून 10 नोव्हेंबर 2007 रोजी चिक्कबळ्ळापूर जिल्हयाची नवीन निर्मिती झाली. चिक्कबळ्ळापूर, गौरीबिदनूरु, बागेपल्ली, शिड्लघट्ट गुडीबंडे, चितामणी हे तालुके होत. नंदीदूर्ग येथे प्रसिद्ध विहार धाम आहे. तेथे योग नंदीश्वर व भोग नंदीश्वर ही प्रसिद्ध देवालये आहेत. चिंतामणी तालुक्यातील कैवारऊ तातय्या हे अनुभवी केंद्र होय. गौरीबिदनूरु तालुक्यातील विधुराश्वथ नावाचे पवित्र स्थळ आहे.



कैवार तातय्या



कैवार देवालय



विधुराश्वथ (वीरसौध)



नंदीदुर्ग

© KTBS Not to be republished

येथे 1938 मध्ये ब्रिटिशांच्या विरुद्ध ध्वज सत्याग्रह केला. त्याची आठवण म्हूणन विधानसभा निर्माण केली आहे. बागेपल्ली तालुक्यातील निडूमामीडी मठ प्रसिद्ध आहे. या जिल्हयाचा शिडळघट्ट तालुका व्यापाराचे केंद्र आहे. हे रेशीम व्यापारासाठी प्रसिद्ध आहे.

## कोलार जिल्हा


अंतरगंगे


हैदर अलि दर्गा

कोलार म्हणताच लगेच तेथील सोन्याच्या खाणी लक्षात येतात. दूरदृष्टीच्या विचाराने 2003 मध्ये सोन्याच्या खाणी बंद करण्यात आल्या. बंगारपेठ, कोलार, मालूरु, मूळबागलू आणि श्रीनिवासपूर हे येथील तालुके होत. या जिल्हयातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा होय. दूग्ध व्यवसाय, पुष्पांची शेती आणि रेशीम उत्पादन केले जाते. हा खडकाळ जमीन असलेला दुष्काळी जिल्हा आहे. या जिल्हयात चिक्कतिरुपती हे प्रसिद्ध यात्रास्थळ आहे. या जिल्हयात अनेक तलाव आहेत. अंतर गंगे हे प्रसिद्ध स्थळ आहे. हजरत बाबा, हैदरअली दर्गा, श्रीपादराय वृंदावन कोलार जिल्यात आहेत.

## तुमकूरु जिल्हा


एकशिला टेकडी मधुगिरी


देवराय दुर्ग

हा जिल्हा 1832 मध्ये अस्तित्वात आला. नारळाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यात दहा तालुके आहेत. ते म्हणजे कोरटगेरे, गुब्बी, चिक्कनायकनहळ्ळी, पावगड, कुणिगल, तुरुवेकेरे, तिपटूरु, मधुगिरी, तुमकूरु आणि सिरा हे होत. अनेक सरदारानी बांधलेले अनेक किल्ले येथे आहेत. मधुगिरी, मिडीगेशी, पावगड, निडू-गल,

©KTBS Not to be republished

देवरायनदुर्ग, हुलीयुरुदुर्ग आणि सिरा येथे असे किल्ले आहेत. या जिल्ह्यातील शिक्षण संस्था प्रसिद्ध आहेत. श्री शिवकुमार स्वामी यांच्या नेतृत्वाखाली सिद्धगंगा येथे हजारो गरिब विद्यार्थ्यांना शिक्षण आणि अन्नदान केले जाते. या ठिकाणी प्रसिद्ध सिद्धार्थ शिक्षण संस्था आहे. संपूर्ण देशात विशिष्ट अशा घोडयांची पैदास करण्याचे केंद्र येथे आहे. अलिकडे हे राज्याचे उद्योग केंद्र म्हणून वाढत आहे. मधुगिरी येथे आशिया खंडातील एकेक एकशीला टेकडी आहे. देवराय दुर्गाचे पुराण प्रसिद्ध आहे. याबद्धल लोकगीते गायीली जातात. कोरटगेरे तालुक्यातील गोरवनहळ्ळी येपील लक्ष्मी देवालय प्रसिद्ध आहे.

## चित्रदुर्ग जिल्हा



चित्रदुर्ग टेकडी



मदकरी नायक

चित्रदुर्ग जिल्हा 7 पदरी अभेद्य किल्ल्यासाठी प्रसिद्ध आहे. या किल्ल्याच्या आत पाण्याचे कुंड आणि देवालय आहे. या जिल्हयातील तालुके याप्रमाणे चित्रदुर्ग, हिरीयुरु, चळ्ळकेरे, होसदुर्ग, होळ्लकेरे आणि मोळ्कालमुरु हे होत. हा जिल्हा पाळेगारासाठी प्रसिद्ध आहे. मदकरी नायक हे एक प्रसिद्ध पाळेगार होते. ओणके ओब्बव्वा साहसासाठी प्रसिद्ध आहे. एस. निजलिंगप्पा, मल्लडीहळ्ळी राघवेंद्रस्वामी, तळुकीन वेंकणय्या, तरासू, श्री शिवमुर्ती मुरुघा शरणरु, तरळबाळू स्वामीजी, कबीरानंद आश्रमाचे शिवलींगानंद स्वामी इत्यादी या जिल्हयातील प्रसिद्ध व्यक्ती होय.

## दावणगेरे जिल्हा

चित्रदुर्ग जिल्हयाचे विभाजन करून 1997 साली दावणगेरे जिल्हयाची निर्मिती केली. नवीन अस्तित्वात आलेल्या या जिल्हयात बळ्ळारी जिल्हयाचा हरपनहळ्ळी आणि शिवमोग्गा जिल्हयाचा काही भाग समाविष्ट केला आहे. या जिल्हयात सहा तालुके आहेत. ते म्हणजे हरिहर, हरपनहळ्ळी, चेन्नगिरी, होन्नाळी, जगळूरु आणि दावणगेरे हे होत. दावणगेरे शहराला कर्नाटकाचे मँचेस्टर असे म्हणतात. हा जिल्हा 1960 दशकात कापूस उत्पादनासाठी प्रसिद्ध होता. परंतू कापसाच्या कमतरतेमुळे कापड उत्पादन बंद

© KTBS Not to be republished

झाले आहे. आता जिल्हयात अनेक साखर कारखाने आहेत.

शकडो आहार प्रक्रिया घटक कार्यरत आहेत. कर्नाटकातील प्रसिद्ध शिक्षण केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध बापूजी शिक्षण संस्था येथे आहे.



**शांती सागर तलाव**

दक्षिण भारतातील सर्वात मोठा तलाव शांती सागर चन्नगिरी येथे आहे. याचे क्षेत्रफळ सुमारे 64 चौ.कि.मी. आहे. हरिहर येथे होयसळ काळातील हरिहरेश्वर देवालय आहे.

## शिवमोग्गा जिल्हा

हा एक कर्नाटकातील प्रसिद्ध जिल्हा आहे. नैसर्गिक सौंदर्याने परिपूर्ण आहे. या जिल्हयात सात तालुके आहेत. ते म्हणजे तिर्थहळ्ळी, सागर, सोरब, भद्रावती शिवमोग्गा, शिकारीपूर आणि होसनगर हे होत. याला कर्नाटकाची भाताची कणगी असे म्हणतात. तुंगभद्रा, शरावती, वरदा आणि कामदवती या नद्या या जिल्हयात आहेत. जिल्हयाच्या शंकरघट्टमध्ये कुवेंपू विश्वविद्यालय आहे. या जिल्हयातील तिर्थहळ्ळी तालुक्यात कुवेंपू यांचे गाव कुप्पळी आहे. हे एक प्रवासी केंद्र म्हणून वाढत आहे. भद्रावती शहर उद्योगधंद्याचे शहर म्हणून नावारूपास येत आहे. राज्याला आवश्यक वीज येथील शरावती जलविद्युत केंद्र आणि वराही जल विद्युत केंद्रामधून मिळते. शिवमोग्गा नगराची स्थापना केळदी राजानी केली असे म्हणतात. शिवाचे मुखदंती असलेले शिवमोग्गा नगर प्रसिद्ध आहे. आशियातील सर्वात उंच धबधबा शरावती नदीवर गिरसप्पा येथे आहे. सोरब तालुक्यातील गडवी येथे प्रसिद्ध पक्षीधाम आहे. भद्रा येथील वन्य मृगधाम प्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळ बनले आहे. तिर्थहळ्ळी तालुक्यातील आगुंबे येथे सर्वात जास्त पाऊस

©KTBS Not to be republished

पडतो. बळ्ळीगावी येथील त्रिपुरांतकेश्वर आणि केदारेश्वर प्रसिद्ध आहेत. केळदी राजा शिवप्पा नायक याने केळदीमध्ये सुंदर असा राजवाडा बांधला आहे. ज्ञानपीठ प्रशस्ती मिळविलेले दोन साहित्यीक राष्ट्रकवी कुवेंपू आणि डॉ. यु.आर. अनंतमुर्ती शिवमोग्गा जिल्हयातील तिर्थहळ्ळी तालुक्यातील होत. राष्ट्र प्रशस्ती पुरस्कृत गायक शिवमोग्गा सुबण्णा या जिल्हयातील होत.



जोग धबधबा



कुवेंपूंचे घर कुप्पळ्ळी

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1. बेंगळूरु विभागात किती जिल्हे आहेत?
2. दक्षिण भारतातील सर्वात मोठा तलाव शांतीसागर कोणत्या जिल्हयात आहे?
3. बेंगळूरु विभागात अती जास्त अरण्य कोणत्या जिल्हयात आहे?
4. राष्ट्रकवी कुवेंपूच्या नावाने विश्वविद्यालय कोणत्या जिल्हयात आहे?

**उपक्रम.**

1. बनेरघट्ट राष्ट्रीय उद्यानाला भेट द्या. तेथे असलेल्या प्राण्यांची यादी तयार करा. त्यांची चित्रे संग्रह करा व त्याचा अहवाल तयार करा.
2. बेंगळूरु शहरातील प्रमुख कारखान्यांची यादी तयार करा.

## मैसुरू विभाग

आपल्या भूमीतील आणखी एक सुरळीत व्यवस्थापनाच्या दृष्टीने केलेला विभाग म्हणजे मैसुरू होय. मैसुरू ही सुरूवातीला वडेयर राज्यांची राजधानी होती. या विभागात

© KTBS Not to be republished

एकुण 8 जिल्हे आहेत. ते म्हणजे मैसुरू, मंड्या, हासन, चिक्कमंगळूर, उडूपी, दक्षिण कन्नड, चामराजनगर, आणि कोडगू होय. या विभागांचे व्यवस्थापन केंद्र मैसुरू आहे. कर्नाटक मधील अनेक श्रीमंत जिल्हे मैसुरू विभागात आहेत. या विभागात सुद्धा अनेक नद्या, पर्वतश्रेणी, जंगल, वन्यप्राणी, कॉफीचे मळे, किनारपट्टी, बंदरे प्रसिद्ध आहेत. त्यामुळे मैसुरू शहर हेच या विभागाचे प्रमुख व्यवस्थापन केंद्र झालेले आहे.




**मैसुरू विभागाचा जिल्हावार नकाशा**

## ऐतिहासीक पार्श्वभूमी

मैसुरू हे अनेक शतकापासून वडेयर घराण्याच्या अधिपत्याखाली होते. काही वर्षे त्यावर हैदर अली व त्याचा मुलगा टिपू सुलतान यानेही राज्य केले. ऐतिहासिक आणि पौराणिकदृष्या मैसुरूला महिषभूमी असे म्हणून ओळखतात. पुराण कथेनुसार देवी पार्वतीनेच चामुंडेश्वरीचे रूप घेऊन महिषासुराला ठार मारले. महिषासुराला ठार मारलेल्या स्थळालाच मैसुरू हे नाव पडले. यदुराय हा वडेयर घराण्याचा पहिला राजा होय. चिक्कदेवराय वडेयर हा प्रसिद्ध राजा होऊन गेला. त्यानंतर सिंहासनावर आलेले राजे दुर्बळ होते. त्यावेळी सेनापती असलेल्या हैदर अलीने हा भाग आपल्या ताब्यात घेतला. त्याने व त्याच्या मुलाने टिपू सुलतानने 1761 ते 1799 पर्यंत राज्य केले.

ब्रिटीशाविरुद्ध टिपुने अनेक लठाया केल्या. फ्रेंच यांना सोबत घेऊन ब्रिटीशाना

©KTBS Not to be republished

भारतातून बाहेर हाकलून देण्यासाठी प्रयत्न केले. त्याने अनेक लोक कल्याणाची कामे हाती घेतली.

## टिपु सुलतान



टिपु सुलतान

टिपु सुलतानचा ब्रिटीशाबरोबरच्या युद्धात 1799 मध्ये मृत्यू झाला. त्यानंतर ब्रिटीशांनी पुन्हा हे राज्य वडेयर यांच्याकडे सोपविले. राज्यकारभारातील दुर्बलता पाहुन ब्रिटीशांनी 1831 मध्ये संपुर्ण कारभार आपल्या हाती घेतला. पण 1881 मध्ये पुन्हा वडेयर यांच्याकडेच राज्यकारभार सोपविला. मागील 20 व्या शतकाच्या अगोदर नाल्वडी कृष्णराज वडेयर याच्या काळात अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या गेल्या. त्यापैकी शिक्षण, संकृती जल निगम इत्यादींना प्रामुख्यता दिली.

सर.एम.विश्वेश्वरय्या आणि सर मिर्जा इस्माईल यांच्या दिवाणगिरीच्या काळात मैसुरूने अपूर्व यश संपादन केले. देशाला 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मैसुरू संस्थानसुद्धा भारत देशात विलीन झाले.



नाल्वडी कृष्णराज



सर. मिर्जा इस्माईल

या विभागातील वेगवेगळ्या जिल्ह्यात विविध राज घराण्यांनी राज्यकारभार केला. कोडगू या प्रदेशावर अनेक राजघराण्यानी राज्यकारभार केला. हालेरी या घराण्याने 17 व्या शतकात आपले राज्य स्थापन केले. बिदनुर ही यांची राजधानी होती. हालेरी राजापैकी दोड्डविरप्पा हा प्रसिद्ध राजा होय. चिक्कविरराज हा शेवटचा राजा होय.

तो दुर्बळ होता. त्याचा वापर करून ब्रिटिशानी राज्यकारभार आपल्या ताब्यात घेतला. स्वातंत्र्यानंतर कोडगू हे स्वतंत्र राज्य झाले. पण 1956 मध्ये ते कर्नाटकमध्ये विलीन झाले. केळदी हे आणखी एक राजघराणे होऊन गेले. कर्नाटकाच्या किनारपट्टीच्या

Not to be republished ©KTBS

प्रदेशाला तुळूनाडू असे संबोधत असत. दक्षिण कन्नड आणि उडुपी जिल्ह्याना एकत्र करून तुळूनाडू हे 7 व्या शतकापासून ते 14 व्या शतकापर्यंत अळूप घराण्याच्या ताब्यात होते. वेगवेगळ्या काळात उद्यावर, मंगलपूर, हुंच आणि बनवासी हया अळूपांच्या राजधान्या होत्या. तुळुनाडूमध्ये अनेक पाळेगारांचा राज्यकारभार चालू होता. त्यापैकी प्रसिद्ध म्हणजे पुत्तीगेय चौटरू, बंगवाडीचे बंग, कार्कळचे बैरवरु. कासरगोडचे कुंबळे राजे पुढे आले.

किनारपट्टीच्या प्रदेशाला ब्रिटिशानी केनर असे संबोधले. हा प्रदेश त्यानी 1801 मध्ये आपल्या अधिपत्याखाली आणला. ब्रिटिशानी किनारपट्टीचा प्रदेश 1860 मध्ये उत्तर कन्नड आणि दक्षिण कन्नड असा विभागला. दक्षिन कन्नड जिल्हा विभागून 1997 मध्ये उडूपी जिल्ह्याची रचना करण्यात आली.

**I. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1. मैसुरू विभागामध्ये सद्या किती जिल्हे आहेत?
2. मैसुरू हे नाव कशावरून पडले? वर्णन करा.
3. मैसुरू संस्थानाच्या उद्धारासाठी 20 व्या शतकापूर्वी काम केलेल्या वडेयर राजांची नावे लिहा.
4. किनारपट्टीला ब्रिटिश सुरुवातीला कोणत्या नावाने संबोधत असत?

**II. रिकाम्या जागा भरा.**

1. दक्षिण कन्नड जिल्ह्याची विभागणी करून ____________ साली उडुपी जिल्हयाची रचना करण्यात आली.
2. मैसुरू विभागातील ____________ आणि ____________ हे किनारपट्टीचे जिल्हे आहेत.

**नैसर्गिक संपत्ती**

हा विभाग विविध हवामान असलेला प्रदेश आहे. या विभागाला जोडलेले उडुपी आणि दक्षिण कन्नड जिल्ह्याना विशाल अशी किनारपट्टी लाभलेली आहे. पर्वत श्रेणी, घनदाट अरण्ये आणि किनारपट्टीचा प्रदेश एकत्र आल्याने येथील हवामान उष्ण कटिबंधातील पावसाळी प्रदेश म्हणून ओळखला जातो. या विभागातील हवामान अति थंड तसेच सरासरी उष्ण आहे. मंड्या आणि मैसुरू जिल्ह्यातील हवामान कोरडे

© KTBS Not to be republished

आहे. या विभागातील उडूपी जिल्ह्यात जास्त पाऊस पडतो. तर मंड्या जिल्ह्यात कमी पाऊस पडतो. विभिन्न हवामान. विभिन्न प्रकारचा पाऊस, पर्वत, अरण्ये असुनसुद्धा येथे विविध प्रकारची पिके पिकविली जातात. येथील मुख्य कृषी पीक म्हणजे नाचणा, भात, जोंधळा, उडीद, मूग, कुळीथ ही होत. येथील व्यापारी पिके म्हणजे कॉफी, ऊस, तंबाखु, सुपारी, वेलदोडे, मोसंबी, अननस, काजू इत्यादी. भारतामध्ये कॉफी सर्वप्रथम चिक्कमंगळूर मध्ये पिकविली होती. या विभागातील अनेक प्रदेशात खायच्या पानांची लागवड केली जाते.

नैसर्गिक संपन्नतेच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास हा विभाग समृद्ध आहे. कोडगू, दक्षिण कन्नड, मैसुरू, चिक्कमंगळूर इत्यादी जिल्हयामध्ये विविधप्रकारची अरण्ये आहेत. त्यामध्ये तेग, श्रीगंध (चंदन), होंगे, नंदी, मत्ती इत्यादी वृक्ष या अरण्यात आढळतात. या अरण्यामुळे अनेक प्रकारची उत्पन्ने मिळतात. मध, मेण, झाडाचे डिंक, जंगली फळे हे किरकोळ उत्पन्न या अरण्यामुळे मिळते. या विभागात अनेक लहान व मोठे पर्वत वसलेले आहेत. त्यापैकी प्रमुख म्हणजे सुब्रमण्य पर्वत, गोपालस्वामी पर्वत, मलेमहदेश्वर पर्वत, पांढऱ्यारंगाचा पर्वत, मुळ्ळयनगिरी, केम्मनगुंडी, चामुंडी, श्रवणबेळगोळचा चंद्रगिरी, इंद्रगिरी इत्यादी प्रसिद्ध पर्वत आहेत.

घनदाट अरण्यासाठी प्रसिद्ध असलेला मैसुरू विभाग जैव विविधतेसाठी सुद्धा प्रसिद्ध आहे. वाघ चित्ता, कोल्हा, हरिण, जंगली कुत्रा, गवा रेडा, विविध प्रकारचे साप जंगली प्राणी येथील जंगलात राहतात. मंड्या जिल्ह्यातील बन्नूरु उत्तम मेंढयासाठी प्रसिद्ध आहे.

या विभागातील प्रसिद्ध नद्या हेमावती, हारंगी, नेत्रावती, कुमारधार, वेदावती, कपिल, यगचि, गंगोळ्ळी इ. होत. येथे अनेक प्रसिद्ध धबधबे आहेत. त्यापैकी गगनचुक्की, बरचुक्की, अब्बे धबधबा, इर्पु धबधबा, हेब्बे धबधबा इत्यादी.




**गगनचुक्की बरचुक्की धबधबा**

©KTBS Not to be republished

मैसुरू विभागातील जिल्ह्यामध्ये सापडणारी मुख्य खनिजे म्हणजे बॉक्साईट, फेलिसाईट, क्रोमाईट, मँगनिज, चुनखडी, काळी माती (चिकन माती) आपल्या देशामध्ये फेलिसाईट हे खनिज फक्त मैसुरू जिल्ह्यामध्ये सापडते. या विभागातील दक्षिण कन्नड आणि मैसूरू हे किनारपट्टीचे जिल्हे आहेत. येथे बंदरे आहेत. या जिल्ह्यामध्ये मासेमारी हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. येथील मासे निर्यात केले जातात. त्यामुळे हजारो माच्छिमार कुटूंबाना हा मुख्य व्यवसाय झाला आहे. कोडगू, चिक्कमंगलूर, मैसूरु जिल्हे हे लाकुड व्यवसायाचे केंद्र आहेत.



**किनारपट्टीवरील मासेमारी**

**खालील प्रश्नाची उत्तरे लिहा.**

1. या विभागातील प्रमुख दोन नदींची नावे लिहा.
2. या विभागातील अति जास्त पाऊस व अति कमी पाऊस पडणाऱ्या जिल्ह्यांची नावे लिहा.
3. या विभागातील जिल्ह्यामध्ये सापडणाऱ्या दोन खनिजांची नावे सांगा.
4. किनारपट्टीच्या लोकांचा प्रमुख व्यवसाय कोणता?

**अरण्ये वन्यप्राणी, राष्ट्रीय उद्याने (अभयारण्ये)**



**आदीवासी समाज**

अरण्यांची भूमी म्हणजे मैसुरू. मैसुरू, कोडगू, चिक्कमंगळूर, हासन इत्यादी जिल्ह्यामध्ये वैविध्यमय घनदाट अरण्याचा प्रदेश आहे. बंडीपूर. नागरहोळे, मलेमहादेश्वर, पुष्पगिरी, भद्रा इत्यादी प्रसिद्ध अरण्य प्रदेशआहेत. येथे अनेक प्रकारची छोटी छोटी अरण्यापासून उत्पादने मिळतात.

© Not to be republished

त्यामुळे लाखो गरिब कुटूंबाना ते उपजिविकेचे साधन आहे.या जिल्ह्यामध्ये अनेक आदिवासी समुदाय आहेत. जेनुकुरुबरू हा जास्त लोकसंख्या असलेला आदिवासी समुदाय आहे. मैसुरू, चामराजनगर जिल्ह्यामध्ये ते जास्त प्रमाणात आहेत. दक्षिण कन्नड आणि उडूपी जिल्ह्यामध्ये कोरग (आदिवासी) समुदाय आहे. हा अत्यंत मागासलेला समुदाय आहे. कोडगू जिल्ह्यामध्ये दिसून येणारा प्रमुख आदिवासी समुदाय म्हणजे मलेकुडीयरू ते दक्षिण कन्नड जिल्ह्यामध्ये दिसून येतात. चामराजनगर जिल्ह्यामध्ये राहणारे सोलीगरु आणखी एक आदिवासी समुदाय आहे. एवढेच नव्हे तर यरवरु, हक्कीपिक्की हलसरु, मेदार हे सुद्धा आदिवासी समुदाय आहेत.


**वाघ**


**हत्ती**


**गवारेडा**

वाघ हा आमचा राष्ट्रीय प्राणी आहे. वाघाचे संरक्षण करण्याचा कायदा राज्यात लागू आहे. राज्यात असलेल्या 5 वाघ अभयारण्यापैकी 3 मैसुरू विभागात आहेत. बंडीपूर, नागरहोळे, भद्रा हे वाघाच्या संरक्षणाची केंद्रे आहेत. त्याप्रमाणेच हत्तीच्या संरक्षणासाठीचा कायदाही येथे लागू आहे. हत्तींच्या दातासाठी (सुळ्यासाठी), वाघाच्या कातडयासाठी त्याना मारले जाते. ते थांबवून त्यांच्या संतती प्रजननासाठी वाघ वाचवा कायदा व हत्ती वाचवा कायदा लागू केलेला आहे. देशामध्ये वाघांची संख्या जास्त असलेले राज्य म्हणजे कर्नाटक. आमच्या राज्यामध्ये जास्तीतजास्त अभयारण्ये आणि पक्षीधाम हे मैसुरू विभागात आहेत. रंगनथिट्टू पक्षीधाम, गुडवी पक्षीधाम, कोक्करे बेळ्ळूरु (बगळयासाठी प्रसिद्ध पक्षीधाम) हे प्रमुख पक्षीधाम आहेत. मेलुकोटे प्राणी संग्रहालय, कावेरी प्राणी संग्रहालय, मलेमहदेश्वर प्राणी संग्रहालय, पुष्पगिरी प्राणी संग्रहालय ही मैसुरू विभागातील प्रसिद्ध अभयारण्ये आहेत. मैसुरू जिल्ह्यात राजीव गांधी नागरहोळे राष्ट्रीय अभयारण्य आहे तर चामराजनगर जिल्ह्यात बंडीपुर राष्ट्रीय अभयारण्य आहे. खेड्डु या कार्यक्रमांतर्गत जंगली हत्तीचे पालन केले जाते.

©KTBS Not to be republished



रंगनतिट्टु पक्षीधाम

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1. या विभागातील दोन प्रसिद्ध अरण्यांची नावे लिहा.
2. या विभागातील जिल्ह्यामध्ये राहणाऱ्या दोन आदीवासी समुदायांची नावे लिहा.
3. दोन पक्षीधाम आणि दोन वन्यप्राणी अभयारण्यांची नावे लिहा.

**रिकाम्या जागा भरा.**

1. आमचा राष्ट्रीय प्राणी ________आहे.
2. जंगली हत्तीना पाळण्याच्या पद्धतीला ________ म्हणतात.

**कृषी विकास आणि उद्योग**

शेती हा आमचा प्रमुख व्यवसाय होय. मैसुरू विभागसुद्धा याला अपवाद नाही. मैसुरू जिल्ह्यात रेशमी उद्योग, कोडगू, हासन आणि चिक्कमंगळूर जिल्ह्यात कॉफीचेमळे, मंड्या जिल्ह्यात ऊसाचे मळे. दक्षिण कन्नड जिल्हा, उडूपी जिल्हा काजू, मिरी, वेलदोडे आणि रबर ही पिके प्रसिद्ध आहेत. देशामध्ये सगळ्यांत जास्त कॉफी चिक्कमंगळूर जिल्हयात पिकते. शेती ही केवळ आहार पदार्थ मिळविण्याचे साधन राहिली नाही. या विभागातील जिल्ह्यामध्ये शेती पिकाबरोबरच कुक्कुटपालन, शेळी पालन, तसेच दुग्धव्यवसाय हे व्यवसाय शेतीला जोड उद्योग म्हणून केले जातात. या विभागातील प्रमुख पिके म्हणजे भात, नाचणा, ज्वारी, आवरे, मुग, उडीद इत्यादी होत. येथील व्यापारी पिके म्हणजे तंबाखू, कॉफी, सुपारी, बटाटे, ऊस, कापूस, काजू, मोसंबी, नारळ इत्यादी.

©KTBS Not to be republished



**दूग्ध व्यवसायं**

या विभागातील शेतीला चार धरणातून पाण्याची व्यवस्था केलेली आहे. ते म्हणजे कृष्णराजसागर, हारंगी, हेमावती आणि कबिनी. या विभागातील शेतीच्या विकासाला चालना देण्यासाठी अनेक शेती फार्म, कृषी कॉलेजांची स्थापना केलेली आहे.

सुरू विभागातील मैसुरू, मंगळूरु, हासन, चिक्कमंगळूर, मंड्या, मडिकेरी ही कारखानदारीची केंद्रे आहेत. औषधांचे कारखाने, कॉफी तयार करण्याचा कारखाना, आहार घटक प्रक्रिया, फर्टिलायझर कारखाने, पेट्रोलियमचे कारखाने, कॅपको चॉकलेट कारखाने. साखर कारखाना, सिमेंट कारखाना हे या विभागातील प्रमुख कारखाने आहेत. या विभागात मोठे उद्योग फार कमी आहेत. तरीसुद्धा हजारो लहान व मध्यम उद्योग व व्यवसाय आहेत.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1. मैसुरू विभागातील दोन राष्ट्रीय उद्यानांची नावे सांगा.
2. मैसुरू विभागातील प्रमुख पिके कोणती ?
3. या विभागातील शेतीला पाण्याचा पुरवठा करणाऱ्या दोन योजनांची नावे लिहा.
4. या विभागातील तीन प्रमुख कुटिरोद्योग कोणते ?

**रिकाम्या जागा भरा.**

1. मैसुरू विभागातील ____________ या जिल्ह्यामध्ये जास्त कॉफीचे उत्पादन घेतले जाते.

©KTBS Not to be republished

## कला, साहित्य, संगीत, लोकगीत, नाटक, नृत्य

मैसुरू या विभागातील कला, साहित्य, नाटक, नृत्य या मध्ये श्रीमंत आहे. मैसुरू शहराला कलेचे मोहरघर असे म्हणतात. किनारपट्टीच्या जिल्ह्यात यक्षगान प्रसिद्ध आहे. यक्षगानने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळविलेली आहे.कंसाळे कुणीत, चौडीके कला, वीरगासे कुणीत, पट कुणीत, नंदीकोलू हे लोकप्रिय लोककलेचे प्रकार आहेत. कोडवांचा उत्तरी हा सण करावळी जिल्ह्यातील भूताराधने, कंवळ हे विशिष्ट सण साजरे करतात. मैसुरूच्या राजवाडयाने कला, नृत्य, संगीताला प्रोत्साहन दिले. त्यामुळे मैसुरू संप्रदायाची विशिष्ठता नृत्य, संगीत वर्णकला उदयाला आली. भरतनाट्य, कर्नाटक नाटक, संगीत, नाटकानासुद्धा राजाश्रय मिळाला. मैसुरू शहरात सरकारी अनुदानीत नाटक गट रंगायन (रेपर्टरी) ची स्थापना झाली.

ते वर्षभर नाटकाची तयारी करून त्याचे प्रदर्शन करत होते. आता राज्याच्या वेगवेगळ्या भागात रंगायन (रंगमंच) केंद्रांची सुरूवात झाली आहे. मैसुरूमध्ये मोठे असे कलामंदिर बांधलेले आहे.



**मैसुरचा राजवाडा**

मैसुरू विभागाने अनेक प्रसिद्ध साहित्यिकांना आश्रय दिला. हासनमधील राजाराव इंग्लिशचे प्रसिद्ध कादंबरीकार, आर.के. नारायण, दुसरे प्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार होत. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त शिवराम कारंत दक्षिण कन्नड जिल्ह्याचे होत. कन्नडच्या भावगीतामध्ये प्राण आणलेले के.एस. नरसिंहस्वामी मैसुरू शहराचे रहिवाशी होत. गोरूरु रामस्वामी अय्यंगार, डॉ. एस.एल. भैरप्पा, एस. गोपाकृष्ण अडीग, बी.एम. श्री, ए.एन. मूर्तीराव, देवनूर महादेव, अकबर अली, सारा अबुबकर, आलनहळ्ळी कृष्ण, पूर्णचंद्रतेजस्वी, कोडगूची गौरम्मा, तिरूमलांबा, त्रिवेणी, निरंजन इत्यादीनी कन्नड साहित्याची उंची वाढविली. या विभागाचे मूळचे महनिय आर.के. श्रीकंठन, विणे शेषण्णा, पिटील चौडय्या, विणे दोरेस्वामी अय्यंगार, कद्री गोपालनाथ इत्यादी संगीत क्षेत्रातील दिग्गज होत. व्यंग चित्रकार आर.के.लक्ष्मण, रंगभूीचे महमद पीर,

©KTBS Not to be republished

चित्रकलेचे के.के. हेब्बार, रंगभूी व चलनचित्र क्षेत्रातील बि. व्ही. कारंत आधूनिक पूर्व साहित्यिक संची होनम्मा, रत्नाकर वर्णी, संगारार्य, इत्यादिनी सांस्कृतीक क्षेत्रात योगदान दिले. फिल्ड मार्शल जनरल कार्यप्पा, जनरल के.एस.तिम्मय्या यानी राष्ट्राला अभिमान असलेल्या सैन्याचे नेतृत्व केले. वैज्ञानिक असलेले राजारामण्णा, यु.आर. राव यांची साधना उल्लेखनिय आहे. सामजिक न्यायाचे परीहारकर देवराज अरस मैसूरु विभागातील होत.


बी.एम.श्री


देवनूर महादेव


पिटील चौडय्या


के.एस. नरसिंहस्वामी


के.के. हेब्बार


आर.के. नारायण


जनरल् कार्यप्प


देवराज अरस

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) कोडव साजरा करत असलेल्या सुग्गी उत्सवाचे नाव काय?

2) कर्नाटक सरकारच्या नाटक संस्थेचे रंगमंचाचे केंद्र स्थान कोणत्या शहरात आहे?

3) या विभागातील दोन इंग्लिश कादंबरीकारांची नावे सांगा.

4) कन्नडच्या प्रसिद्ध दोन साहित्यकारांची नावे लिहा.

©KTBS Not to be republished



कोडगू हुत्तरी गीताचे नृत्य

## शक्षण आणि आरोग्य

मैसुरू हे शिक्षणाचे केंद्र झालेले आहे. या विभागात साक्षरतेचे प्रमाण उत्तम आहे. मैसुरू वडेयर यांच्या अधिपत्याखाली असताना शिक्षणाला त्यांनी प्रोत्साहन दिले. शतमानोत्सव साजरा केलेले मैसुरू विश्वविद्यालय 1915 मध्ये सुरू झाले. या विभागात अनेक जिल्ह्यामध्ये वैद्यकीय आणि इंजिनियरींग कॉलेज आहेत. या विभागातील प्रमुख जिल्हा मंगळूरमध्ये मंगळूर विश्वविद्यालय आहे. तसेच अनेक खासगी विश्वविद्यालये आहेत. मैसुरू शहरामध्ये आहार संशोधन संस्था (CFTRICentral food Technology Research Institute) आहे. शिक्षण क्षेत्रात सुतूर मठाचे योगदान अपार आहे. पदवी कॉलेज, वैद्यकिय आणि इंजिनिअरिंग कॉलेज स्वामिजींच्या नेतृत्वाखाली चालते. या भागात शिक्षण आणि आरोग्य क्षेत्राला धर्मस्थळ आणि मनिपाल संस्थांचे योगदान फार आहे.



सुत्तूर मठ

©KTBS Not to be republished

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा रूग्णालय आहे. ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा देण्यासाठी आरोग्य उपकेंद्रे आहेत. येथे मुलांना रोगनिरोधक इंजेक्शन देण्यात येतात. गर्भिणी आणि बाळंतिणीची सेवा करण्यास आरोग्य सहाय्यक, आशा कार्यकर्ता आहेत. तसेच येथे शिशू मरण प्रमाण अत्यंत अल्प आहे. लोकांचे जीवनमान उत्तम आहे. मातांचे मरण प्रमाणही अत्यंत कमी झालेले आहे. सर्व जनतेचे आरोग्य उत्तम आहे.



रोगनिरोधक इंजेक्शन द्यायचे शिबीर

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1. मैसुरू मध्ये शतमानोत्सव साजरा करत असलेल्या विश्वविद्यालयाचे नाव सांगा.
2. ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा देणाऱ्या केंद्रांचे नाव काय?
3. दोन आरोग्य सूचींची नावे सांगा.

**सांस्कृतिक संपत्ती**

हा विभाग सांस्कृतिक दृष्ट्या श्रीमंत आहे. या जिल्ह्यामध्ये नैसर्गिक खजिना भरपूर आहे. समृद्ध नद्या, घनदाट अरण्ये, वैविद्यमय वन्यप्राणी, नैसर्गिक धबधबे, कला-वास्तु वैभव, साहित्य, कलेचे मोहरघर म्हणजे मैसुरू विभागातील जिल्हे आहेत. मंड्या जिल्हा साखरेसाठी प्रसिद्ध आहे. हासन चिक्कमंगळूर कॉफीसाठी प्रसिद्ध आहे. यक्षगान किनारपट्टीच्या जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. तर कंसाले नृत्यासाठी चामराजनगर प्रसिद्ध आहे. सोमनाथपूर, बेलुरू, चन्नकेशव देवालयतील मदनिकेची मूर्ती, श्रवणबेळगोळच्या गोमटेश्वरची एकशिला मूर्ती, हळेबिडू, मूडबिद्री इत्यादी विश्वविख्यात कलाकुसर असलेली

© KTBS Not to be republished

देवालये प्रसिद्ध आहेत. या विभागातील सर्व जिल्हे पर्यटन व्यवसायाला उत्तेजन देणारी क्षेत्रे आहेत. कावेरी नदी ही आपल्या राज्याचा प्राण आहे. ती कोडगू जिल्ह्यातील तलकावेरी येथे उगम पावते. शंभरपेक्षा जास्त किलोमीटर लांब किनारपट्टी येथे लाभली आहे. मत्स व्यवसाय, बंदरे, समुद्राच्या लाटावरील साहसी क्रिडा, शैक्षणिक केंद्रे येथे आहेत. त्यामुळे सांस्कृतिक दृष्ट्या हा विभाग संपन्न आहे.



**गोमटेश्वर श्रवणबेळगोळ**

## आपल्या विभागातील स्वातंत्र्य सैनिक

स्वातंत्र लढयातसुद्धा हा विभाग अग्रणी होता. गांधीजीना प्रिय असलेली खादी केंद्रे, गृह कुटिरोद्योगसुद्धा येथे मोठ्या प्रमाणात आहेत. मंगळूरचे कुदमल रंगराव यानी अस्पृश्यता निवारण्यासाठी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. तगडूरु रामचंद्रराव हे गांधीजींचे अनुयायी होते. त्यांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी लढा उभारला. एच.सी. दासप्पा, यशोधरम्मा दासप्पा, कार्नाड सदाशिवराव, एच.के. वीरण्णगौडा, के.टी. बाश्यम, कमलादेवी चट्टोपाध्याय, के.वी. शंकरेगौडा, के. रामकृष्ण कारंत, सी.एम. पुनच्च इत्यादीनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला होता. अनेकानी कर्नाटक एकीकरण लढ्यातसुद्धा भाग घेतला होता. यामुळेच मैसुरू विभागातील जिल्ह्यातील हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अग्रणी होते. मैसुरूचा दसरा महोत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहे.

© KTBS Not to be republished

## खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. मैसुरू विभागात समाविष्ट झालेल्या दोन इंग्लिश कादंबरीकारांची नावे लिहा.
2. स्वातंत्र्य लढयांबरोबरच अस्पृश्यता निवारण चळवळीत सहभागी असलेल्या दोन समाज सुधारकांची नावे लिहा.
3. श्रवणबेळगोळ कशासाठी प्रसिद्ध आहे?
4. चार स्वातंत्र्य सैनिकांची नावे लिहा.

## रिकाम्या जागा भरा.

1. कावेरी नदीचा उगम ____________ येथे झाला.
2. कुदमल रंगराव यांनी ____________ याच्या निवारणासाठी कार्य केले.
3. मैसुरू मध्ये होत असलेल्या विश्वविख्यात उत्सव ____________ आहे.
4. मैसुरू विभागातील ____________ आणि ____________ जिल्ह्यामध्ये बंदरे आहेत.

## या विभागातील जिल्ह्यांची विशिष्टता

आता मैसुरू विभागातील जिल्ह्यांचा संक्षिप्त परिचय करून घेऊया. येथील जिल्ह्यांची विशिष्टता, प्रेक्षणिय स्थळे, कृषी, उद्योग, प्रसिद्ध व्यक्ती यावर चर्चा करुया.

## मैसुरू जिल्हा



सेंट फिलोमिना चर्च - मैसूरु

मैसुरू संस्थानची राजधानी असलेले स्वच्छ व सुंदर शहर म्हणजे मैसुरू होय. आता त्याला राजधानीचा दर्जा नाही. परंतु ते आपल्या राज्यातील सांस्कृतिक केंद्र आहे. सर्वात जुने विश्वविद्यालय (कर्नाटक राज्यातील) अशी किर्ती लाभलेले मैसुरू विश्वविद्यालय येथे आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेला दसरा उत्सव येथे होतो. आपल्या परंपरेची जाणीव करून देणारा

©KTBS
Not to be republished

राजवाडा, देवालये, पुरातत्व वास्तु स्मारक येथे आहेत. येथील प्रमुख आकर्षण म्हणजे चामुंडी पर्वत व तेथील नंदीची मूर्ती. या जिल्ह्यात सोमनाथपूर नंजनगुडु, तलकाडू, बेट्टदूरचे गोम्मटगिरी, खादी आणि गृह उद्योग प्रवाशाना आकर्षित करतात. येथील प्रसिद्ध अभयारण्यामध्ये अनेक प्राणी, पक्षी, जलचर प्राणी इ. मुलाना तसेच माठ्यांना आकर्षित करतात. येथे फिरते वस्तु संग्रहालय आहे. आशिया खंडात प्रसिद्ध सर्वात मोठे लोकगीत वस्तु संग्रहालय येथे आहे. कृष्णराज सागर धरणाच्या मागे वृंदावन उद्यान आहे. या जिल्ह्यातील पिरीयापट्टण तालूक्यातील बैलुकुप्पे येथे तिबेटीयनांचे पुनर्वसती केंद्र आहे. येथे अति आकर्षक बौद्ध देवालय आहे. आपले राज्य 1973 पर्यंत मैसुरू राज्य म्हणून ओळखले जात होते.


जगन मोहन पॅलेस


चामुंडी देवालय


बुद्ध विहार बैलकुप्पे

## चामराजनगर जिल्हा

याला प्राचीनकाळी अरीकुठार असे नाव होते. तिसऱ्या कृष्णदेवरायाने स्वतःचे वडील चामराज वडेयर यांच्या स्मरणार्थ चामराजनगर असे नाव ठेवले. येथे चामराजेश्वर नावाचे प्रसिद्ध देवालय बांधले. या जिल्ह्यातील रेशमी उत्पादन प्रसिद्ध आहे. आता त्याचा विस्तार कमी झाला आहे.

या जिल्ह्यातील कोळ्ळेगाल तालुक्यातील बंडीपूर हे राष्ट्रीय अभयारण्य आहे. वाघ, चित्ता आणि इतर वन्यप्राणी येथे पहावयास मिळतात. एवढेच नव्हे बिळीगिरीरंगन बेट नावाचे वन्य प्राणी संग्रहालय येथे आहे. हे हत्तीच्या निवासाचे प्रमुख केंद्र आहे. बिळीगिरीरंगन पर्वतावर बिळीगिरीरंगन देवालय आहे. मलैहदेश्वर आणि हिमवद वेणूगोपाल स्वामी देवस्थान या भागात प्रसिध्द आहेत.

© KTBS Not to be republished




मल्लेहदेश्वर देवालय



मल्लेहदेश्वर देवालय

या जिल्ह्यात अनेक धार्मिक स्थळे आहेत. हरदनहळ्ळी येथे लिंगायत साधकांचे पीठ आहेत. या जिल्ह्यातील प्रमुख तालुका कोळ्ळेगाल रेशमी विणकामाला प्रसिद्ध आहे. या तालुक्यातील चिक्कलुर येथे सिद्धपाजी यांचे पीठ आहे. सतेगाळी येथे प्रसिद्ध बंडळ्ळी दर्गा आहे. येथे होगेनकल्लू प्रसिद्ध धबधबा आहे. कन्नडचे प्रसिद्ध कवि षडक्षर देव यांचे पीठ यलंदूरु येथे आहे.

## हासन जिल्हा




चन्नकेशव देवालय, बेलूरु



होयसळेश्वर देवालय, हळेबीडू

हासनांब या देवालयामुळे याला हासन हे नाव पडले. या देवालयातील आंतर मंदिराचा होयसळ यांनी निर्माण केलेला दरवाजा वर्षातून एकदाच उघडला जातो. या जिल्ह्यातील देवालये होयसळ या वास्तु शिल्पकलेचा नमुना आहेत. गोरूरु, मोसळे ही प्रसिद्ध गावे आहेत. यगची नदीच्या काठावर बेलूर येथे प्रसिद्ध चन्नकेशव देवालय आहे. लाकडावरील कोरीवकाम फार प्रसिद्ध आहे. याला वेलपूरी असे म्हणतात. हळेबीडू येथे केदारेश्वर आणि होयसळेश्वर ही देवालये आहेत. या देवालयाना एक हजार वर्षापूर्वीचा इतिहास आहे. या स्थळाला द्वारसमुद्र म्हणून ओळखत होते. या जिल्ह्यातील आणखी अद्भूत



एच्.डि. देवेगौडा अ

Not to be republished ©KTBS

ठिकाण म्हणजे श्रवणबेळगोळ. येथे एक हजार वर्षापूर्वी निर्माण केलेली एकशिला बाहुबलीची मूर्ती आहे. त्याची उंची 58 फूट आहे. बारा वर्षातून एकदा बाहुबलीला महामस्तकाभिषेक केला जातो. देश-विदेशातील प्रवासी त्यावेळी बहुसंख्येने उपस्थित असतात. हसन, मंगळूरु रेल्वे मार्गावर 58 भुयारे आहेत. या रेल्वे मार्गावरील प्रवास हा साहसी प्रवास ठरतो. कर्नाटकातून प्रधानमंत्री झालेले एच. डी. देवेगौडा या जिल्ह्यातीलच होत.

## चिक्कमंगळूर जिल्हा

आदि शंकरार्यानी स्थापन केलेले शारदा देवीचे देवालय श्रृंगेरी येथे आहे. ते तुंगा नदीच्या काठावर आहे. चिक्कमंगळूर शहर समुद्र सपाटीपासून 1034 मीटर उंचीवर आहे. येथील हवामान नेहमी थंडगार असते. हा जिल्हा पावसाळी प्रदेशाचे केंद्र आहे. या जिल्ह्यातील घनदाट अरण्यामुळे कोडगू जिल्ह्यात भद्रा वन्यप्राणी अभयारण्य आहे. त्यालाच मुत्तोडी प्राणीधाम असे म्हणतात. उळीवी पक्षीधाम आहे. येथे 19 व्या शतकात निर्माण केलेला सेंट अ‍ॅड्रूस चर्च आहे. प्रसिद्ध जामिया मशीद येथे आहे.

सदाहरित अरण्ये येथे आहेत. समुद्रसपाटीपासून 1400 मीटर इंचीवर अनेक धबधबे आहेत. नाल्वडी कृष्णराज वडेयर यानी येथे उन्हाळ्यात रहायला बंगला बांधला आहे. अब्बे धबधबा, कल्लनगिरी, मुळ्ळयनगिरी इत्यादी नैसर्गिक धबधबे येथे आहेत. हे एक प्रसिद्ध प्रवासी पर्यटन स्थळ आहे. येथे विविध प्रकारची 1500 पेक्षा जास्त प्रकारची गुलाबाची झाडे आहेत. हे एक साहसाचे, खेळाचे केंद्र आहे.

पश्चिम घाट प्रदेशात असलेली बाबा बुडनगिरी 'चंद्रद्रोण पर्वत' म्हणून ओळखली जाते. सुफी-संत बाबा बुडन दर्गा येथे आहे. त्याने भारताला सर्वप्रथम कॉफीची ओळख करुन दिली असे म्हणतात. बाबा बुडन दर्गा मुस्लीम व हिंदूचे यात्रास्थळ आहे. येथे असलेल्या एका गुहेत दत्तात्रेय पीठ आहे.



श्रृंगेरी शारदांबा देवालय



बाबा बुडनगिरी दर्गा



सेंट अ‍ॅड्रोस चर्च

©KTBS Not to be republished

कन्नडचे प्रसिद्ध कवी लक्ष्मीश यांचे जन्मगाव देवनुरु याच जिल्ह्यात आहे. त्याने लिहीलेले जैमिनी भारत कन्नडची प्रसिद्ध साहित्य कृती आहे.

या जिल्ह्यातील पर्वतातून तुंगभद्रा, हेमावती, नेत्रावती आणि वेदावती या नद्या उगम पावतात.

## मंड्या जिल्हा

मैसुरू जिल्हयाचे विभाजन करून 1938 मध्ये मंड्या जिल्ह्याची रचना करण्यात आली. मांडव्व ऋषीने येथे तपश्चर्या केल्याचे सांगतात. त्यामुळेच मंड्या हे नाव पडले आहे. या जिल्ह्यातील मुख्य पिके ऊस आणि भात ही होय. भारतामध्ये सर्वात मोठा साखर कारखाना 1933 मध्ये येथे सुरू झाला. येथे भरपूर भाताच्या (तांदळाच या) गिरण्या आहेत. कृषीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने 1951 मध्ये कृषी संशोधन केंद्राची स्थापना केली. शिवळ्ळी येथे बीजोत्पादन केंद्र आहे.

**श्रीरंगपट्टण** हे एक ऐतिहासीक व धार्मिक केंद्र आहे. ब्रिटीशांनी हे 1799 मध्ये आपल्या अधितपत्याखाली घेतले होते. त्यापूर्वी ही वडेयर राजाची राजधानी होती. टिपु-सुलतानने बांधलेल्या अनेक मशिदी, किल्ले दारूगाळ्याची ठिकाणे हैदर अली आणि टिपु-सुलतानच्या समाधी गुंबज मध्ये आहेत. टिपु सुलतानने बांधलेला उन्हाळी राजवाडा दरिया दौलत आकर्षक आहे.


कृष्णराजसागर धरण


श्रीरंगपट्टण देवालय


दरिया दौलत बाग

हे शहर कावेरी नदीच्या काठावर आहे. या शहराचे आराध्य दैवत म्हणजे श्रीरंगनाथस्वामी हे होय. हे देवालय विशाल प्रदेशावर बांधलेले आहे. कावेरी नदीमुळे निर्माण झालेल्या तीन बेटावर तीन श्रीरंगनाथस्वामीची मंदिरे आहेत. पहिले श्रीरंगपट्टण, दुसरे शिवनसमुद्र येथील श्रीरंगनाथ स्वामी देवालय, तिसरे तमिळनाडू येथील श्रीरंगमल्लीन श्रीरंगनाथस्वामी देवालय होय. पश्चिम वाहिनी असलेल्या हिंदूचे हे पवित्र स्थान आहे. तसेच येथे आदीनाथ तीर्थंकर यांची बसदी आहे. जामा मशीदे आहे. गंजाम येथे फ्रेंच प्रवासी अब्बे दुबाईस यांनी बांधलेला चर्च आहे. हे गाव बैलगाड्या बांधण्याचे केंद्र आहे.

©KTBS Not to be republished

या जिल्ह्यातील प्रमुख केंद्र म्हणजे मंटेस्वामी पीठ असलेले बोधगौडनपूर, रंगनतिट्टू पक्षीधाम, पांडवपूर, मेलुकोटे, गगनचुक्की, बरचुक्की धबधबा असलेला शिवनसमुद्र चुंचनगिरी इत्यादी. मेलुकोटे 1854 मध्ये स्थापन केलेली संस्कृत पाठशाळा आहे. येथे परकाल मठ, आहोबल मठ आणि यतिराजमठ आहे.

मंड्या जिल्ह्याच्या विकासाचे जीवनद्रव्य म्हणजे कृष्ण राजसागर धरण होय. कावेरी नदीवर बांधलेले हे धरण सर.एम. विश्वेश्वरय्या यांच्या मार्ग दर्शनाखाली बांधलेले आहे. याच्या निर्मितीला कारण असलेले नाल्वडी कृष्णराज वडेयर त्यांचेच नाव याला देण्यात आले आहे. ते 1932 पूर्ण करण्यात आले. हे केवळ शेतीलाच उपयोगी नाही तर बेंगळूरु व मैसुरू शहराला येथूनच पाण्याचा पुरवठा केला जातो. येथून पुढे गेलेल्या कावेरी नदीवर तमिळनाडू मध्ये सेलम जवळ मेट्टूरू धरण बांधण्यात आले आहे.

## कोडगू जिल्हा

कर्नाटकातील काश्मीर म्हणून याला ओळखतात. केळदी नायकाच्या पतनानंतर येथे हालेरी राजानी 1600 पासून 1834 पर्यंत राज्यकारभार सांभाळला. ब्रिटीशानी 1834 मध्ये कोडगूसुद्धा आपल्या ताब्यात घेतले. 1956 मध्ये हा भाग कर्नाटकात विलीन झाला. हा एक डोंगर, दऱ्या, पर्वतापासून निर्माण झालेला जिल्हा होय. यांचा पारंपारीक पोशाख विशिष्ठ आहे. सुगीच्या दिवासात हुत्तरी हा सण फार मोठ्या प्रमाणात साजरा करतात.


चर्च, विराजपेठ

कोडगू हे प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. येथील कावेरी नदीचे उगम स्थान तलकावेरी, अब्बे धबधबा, इर्पु धबधबा, महागडे हत्ती पाळण्याचे केंद्र, नागरहोळे ही प्रमुख पर्यटन केंद्रे आहेत. बैलुकुप्पे येथे तिबेटीयन पुनर्वसती केंद्र आहे. तेथे बौद्ध धर्माला अनुसरून अनेक देवदेवतांची मंदिरे आकर्षकरित्या बांधलेली आहेत. संपूर्ण देशात चिक्कमंगळूरु नंतर दोन नंबरचे कॉफीचे उत्पादन कोडगू जिल्ह्यात होते. कर्नाटक राज्यातील अतिशय लहान जिल्हा म्हणजे कोडगू होय. यामध्ये फक्त तीन तालुके आहेत. या जिल्ह्यात जास्तीत जास्त कोडवर, कुडीय, मलेकुडीय, इ. आदिवासी लोक, मुस्लीम आणि ख्रिश्चन आहेत. विराजपेठेतील चर्च आकर्षक आहे.

©KTBS Not to be republished

## दक्षिण कन्नड जिल्हा

हा कर्नाटकतील प्रसिद्ध किनारपट्टी लाभलेला जिल्हा होय. येथे प्रसिद्ध बंदर आहे. आयात आणि निर्यात व्यापाराला त्याचा फायदा होतो. मत्स व्यवसाय, बिडी, काजुचा व्यवसाय, कृषी (शेती) हे येथील लोकांचे प्रमुख व्यवसाय आहेत. किनारपट्टीचा प्रदेश अखंडपणे मद्रास संस्थानाचा भाग होता. परंतु ब्रिटीशानी 1860 मध्ये केनरा प्रदेशाचे विभाजन करून दक्षिण कन्नड आणि उत्तर कन्नड जिल्हे निर्माण केले. दक्षिण कन्नड जिल्हा मद्रास प्रांतामध्ये तसाच राहिला. उत्तर कन्नड जिल्हा बाँबे प्रांतात गेला. हा जिल्हा 1956 मध्ये कर्नाटकात विलीन झाला.



हज़ार खांबांची बसदी, मूडबिद्रे



मंजूनाथ देवालय, धर्मस्थळ



उल्लाळ जामा मशीद



सेंट अलोशियस चर्च

दक्षिण कन्नड जिल्ह्याचे स्वाभाविकपणे दोन विभागात वर्गीकरण केले आहे. मंगळूरु, भटकळ हे तालुके किनारपट्टीचा प्रदेश तर पुत्तूरु, बेळतंगडी आणि सूळय हे पावसाळी प्रदेश आहेत.

Not to be Republished

हे प्रसिद्ध व्यापारी केंद्र आहे. पेनंबूर बंदर निर्याती साठीचे केंद्र आहे. येथे नवमंगळूरु बंदराची निर्मिती करण्यात आली आहे. मंगळूरच्या बाज्पे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळाची निर्मिती केलेली आहे.

नेत्रावती, पयस्वनी, कुमारधारा या प्रमुख नद्या आहेत. येथे अनेक धार्मिक केंद्रे आहेत. वेणूर येथे एकशिला गोमटेश्वरची मूर्ती, कद्री येथे मंजुनाथ देवालय, मुडबिद्री हे जैनांचे पवित्र क्षेत्र आहे. येथे अनेक बसदी आहेत. धर्मस्थळ हे प्रसिद्ध तीर्थ स्थळ झालेले आहे. कटिली येथील दुर्गा परमेश्वरी देवालय फार प्रसिद्ध आहे. काद्रोळ्ळी येथील गोकर्ण नाथेश्वर देवालय आणखी एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. तसेच सेंट अलोयसीस चर्च, मिलाग्रीज चर्च प्रसिद्ध आहेत. उळ्ळालची जामा मशिद मुस्लीमांचे श्रद्धाकेंद्र आहे.

पिलीकुल निसर्गधाम हे सुमारे 350 पेक्षा अधिक प्रदेशात पसरले आहे. येथे डॉ. शिवराम कारंथ जैविक उद्यान आहे. विज्ञान केंद्र, वास्तुशिल्प केंद्र, लोकगीत वस्तू सग्रहालय आहे. मुलांना तसेच मोठ्यानासुद्धा ते आकर्षित करते.

या जिल्ह्यातील पारंपरिक सापाचे पूजन, कंबळ, यक्षगान, भूतकोल प्रसिद्ध आहे. सद्या दक्षिण कन्नड जिल्हा हा राज्याचा प्रमुख शैक्षणिक केंद्र म्हणून उदयाला येत आहे. मंगळूर, सुरतकल, सुळ्य ही शिक्षणाची प्रमुख केंद्रे आहेत. येथे अनेक संशोधन केंद्रे आहेत. या जिल्ह्याला सुंदर समुद्र किनारा लाभलेला आहे. त्यामुळे भरपूर प्रवासी पर्यटनासाठी येथे आकर्षित होतात.

## उडुपी जिल्हा


उडुपी श्री कृष्ण देवालय


कार्कळचा गोटेश्वर


सेंट लॉरेन्स चर्च

दक्षिण कन्नड जिल्हयाचे विभाजन करुन 1997 मध्ये उडूपी जिल्हयाची निर्मिती करण्यात आली. याच्या पश्चिमेला अरेबियन समुद्र, पूर्वेला पश्चिमघाट पर्वतश्रेणी आहे. अनेक नद्या, नारळाची झाडे (बागा), सुपारीच्या बागा, भाताचे उत्पादन करणारा जिल्हा म्हणजे उडूपी होय. राष्ट्रीय प्रसिद्ध असलेले आकर्षक कृष्ण देवालय येथे आहे.

©KTBS Not to be republished

द्वैत सिद्धांताचे प्रतिपालक मध्वाचार्य यांनी येथे श्री कृष्ण देवालय स्थापन केले असे म्हणतात. प्रसिद्ध संत कनकदास याला पूर्वेपासून पश्चिमेला फिरकून श्री कृष्णाने दर्शन दिले असे सागतात. असे दर्शन दिलेले स्थळ हे कनकाची खिडकी म्हणून ओळखले जाते. कोडचाद्री पर्वतावर मुकांबिका देवालय आहे. कार्कळ येथील 42 फूट उंच गोमटेश्वराची मूर्तीसुद्धा प्रसिद्ध आहे.

उडूपी येथे राष्ट्रकवी गोविंद वैगल संशोधन केंद्र येथे आहे. मालपे, मणिपाल, कुंदापूर, मंदार्ती, कोट, कापू, बारकुरु, मरवंते ही येथील प्रसिद्ध स्थळे आहेत. मणिपाल शैक्षणिक केंद्र म्हणून उदयाला येत आहे. बसरुरु नावाचे प्रसिद्ध व्यापारी शहर आहे. डच आणि पोर्तुगीज येथे व्यापार करत होते. भात. सुपारी नारळ, काजू ही येथील प्रमुख पिके आहेत.

मालपे हे सर्व ऋतूत मत्स व्यवसाय करणारे बंदर आहे. येथील प्रसिद्ध द्वीप म्हणजे सेंट मेरी द्विप होय.



मैसुरू विश्वविद्यालय



तलकावेरी




मंगळूर बंदर

## खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1. मैसुरू विभागातील जिल्ह्यामध्ये पिकणाऱ्या व्यापारी पिकांची यादी करा.
2. दक्षिण कन्नड आणि उडूपी जिल्ह्यातील दोन बंदरांची नावे सांगा.
3. या विभागातील कोणकोणत्या ठिकाणी गोमटेश्वराचा पुतळा आहे?
4. कावेरी नदीचा उगम कोणत्या जिल्ह्यात कोणत्या ठिकाणी झाला आहे?

## उपक्रम

मैसुरू विभागातील जिल्ह्यामध्ये आढळणाऱ्या प्राचीन देवालये व त्यांचे निर्माणकर्ते राज घराण्यांची यादी करून चित्र संग्रह करा.

या विभागातील वेगवेगळ्या जिल्हयात असलेल्या गोमटेश्वराच्या पुतळ्याची यादी करा. प्रत्येक पुतळ्याची उंचीचे माप, व चित्रासह माहीती संग्रह करा.

© KTBS Not to be republished

| पाठ 3 | प्राचीन समाज |
|---|---|

## पाठाचा परिचय

या पाठात ऐतिहासिक काळ आणि इतिहासपूर्वकाळ यामधील फरक समजाविला आहे. पृथ्वीची उत्पत्ती आणि सजीवांच्या वाढ विकास या संबंधी विवरण केले आहे. प्राचीन शीलायुग, मध्य शीलायुग आणि नवशीलायुग तसेच धातु युगांमध्ये मानवाच्या जीवनात झालेला बदल प्रतिबिंबित केला आहे.

## सामर्थे

1] इतिहासाच्या वर्गिकरणात अक्षरांचे महत्व जाणणे.

2] जमीनीवरील जीव विकासाचे टप्पे समजून घेणे.

3] शिलायुगातील टप्पे व प्रमुख टप्पे ओळखणे.

4] नागरिकतेच्या विकासात लोहाचे महत्व विश्लेषण करणे.

©KTBS Not to be republished

सामान्यपणे इतिहासाचे तीन कालखंडात वर्गीकरण केले आहे. (1) इतिहास पूर्व काळ (Pre historic Period) (2) आद्य इतिहास काळ (Proto historic Period)(3) इतिहास काळ (Historic Period), मानवाच्या इतिहासात शेकडा 99.9 इतका कालावधी इतिहासपूर्व काळामध्ये सामावलेला आहे. परंतु त्या काळासंबंधी-चे अध्ययन करण्यासाठी आवश्यक पुरावे फारच कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे इतिहासात इतिहासपूर्व काळासाठी दिलेले स्थान कमीच आहे. वरील तीन कालखंडाचे वर्गीकरण करताना अक्षरज्ञान याच निकषाचा आधार घेतला आहे. अक्षरांचा परिचय नसलेला कालखंडाला इतिहास पूर्व काळ असे म्हणतात (उदा: शीलायुग) एकाद्या काळात अक्षरज्ञानाची जाणीव असून ती अक्षर वाचणे किंवा समजणे आत्ता शक्य नाही अशा कालखंडाला आद्य इतिहास काळ असे म्हणतात. (उदा: हारप्पा नागरिकतेचा संस्कृती काळ) कोणत्या कालखंडात अक्षर ज्ञान आहे. आणि ती अक्षरे आत्ता लिहिली आणि वाचली जातात त्या काळाला इतिहास काळ असे म्हणतात.

**मानवाचा जन्म आणि विकास:** 4600 दशलक्ष वर्षापूर्वी पृथ्वीची उत्पत्ती झाली असे वैज्ञानिक सांगतात. पृथ्वीवर सर्वात पहिला सापडलेला सजीव म्हणजे एकपेशीय बॉक्टिरीया प्रोकार्योट हा होय. हे सजीव प्राणवायू नसलेल्या वातावरणातही जगू शकत होते. आपल्याला हवी असलेली ऊर्जा आणि पौष्टिक अंश. परिसरातून मिळवित असत. त्यानंतर सुमारे 4000 ते 2500 दशलक्ष वर्षापूर्वी शेवाळ अथवा दगडफूल असे सजीव आढळले. हे पुढे प्राणी आणि वनस्पती अशा दोन गटात वर्गीकरण होण्यास कारणीभूत झाले.

सजीव सृष्टीच्या जगात आल्यास 3500 दशलक्ष वर्षापूर्वीच्या सूक्ष्म जीवांचे अवशेष ऑस्ट्रेलिया मध्ये सापडले आहेत. आपल्या कर्नाटकातील संडूरू तालुक्यातील धारवाड जलज शीला मध्ये 2000 दशलक्ष वर्षापूर्वीच्या सूक्ष्म जीवाणूचे अवशेष सापडले आहेत. अशाप्रकारे सुरूवात झालल्या या जीव विकासाच्या वाटेवर 570 दशलक्ष वर्षापूर्वी मासेइतर जलचर, 438 ते 408 लशलक्ष वर्षाच्या कालावधिमध्ये किटक, 408 ते 360 दशलक्ष वर्षाच्या कालावधीमध्ये उभयचर, सुमारे 320दशलक्ष वर्षापूर्वी सरपटणारे प्राणी, 248 दशलक्ष वर्षापूर्वी डायनासोर, 213 दशलक्ष वर्षापूर्वी पक्षी आणि सस्तनप्राणी, 65 दशलक्ष वर्षापूर्वी महाकाय सस्तनप्राणी, आणि 25 दशलक्ष वर्षापूर्वी वानरांचा विकास झाला. 5 दशलक्ष वर्षापूर्वी द्विपादींचा तर 18लक्ष वर्षापूर्वी मानवाचा विकास झाला.

अशा प्रकारे विकास झालेल्या जीव सृष्टीच्या वाटेवर प्रथम एकपेशी प्राणी, नंतर मृदूकाय, मासे, वनस्पती, किटक, उभयचर, पंखअसणारे किटक, सरपटणारे प्राणी पक्षी, सस्तनप्राणी फुले येणाऱ्या वनस्पती, गवत, वानर, द्विपाद प्राणी इत्यादिंचा विकास झाला. सुमारे 18 लक्ष वर्षापूर्वी मानवाचा विकास झाला.

आधुनिक मानवाची शारीरिक रचना असलेले मानव सर्व प्रथम दक्षिण आफ्रिकेत आढळले. पुढे ते आफ्रिकेहून पृथ्वीच्या विविध भूभागामध्ये स्थलांतरित झाले असे सांगण्यात येते. पण हा वाद आजही अनेक अभ्यासकांच्या संशोधनाचा विषय बनला आहे.

©KTBS Not to be republished

## प्राणी आणि वनस्पतीच्या विकासाचे टप्पे

| वर्षे (दशलक्षामध्ये) | प्राणी | वनस्पती |
|---|---|---|
| 4000 – 2500 | सूक्ष्म जीवपेशी | शेवाळ |
| 2500 – 570 | मृदूकाय | अल्गी |
| 570 – 505 | मासे | - |
| 438 – 408 | किटक | जमीनीवरील वनस्पती |
| 408 – 360 | उभयचर | फेर्न, पाची |
| 320 – 248 | सरपटणारे प्राणी | - |
| 248 – 213 | डायनासोर | - |
| 213 – 144 | पक्षी, सस्तनप्राणी | - |
| 144 – 65 | - | पुष्प येणाऱ्या वनस्पती |
| 65 – 38 | महाकाय सस्तनप्राणी | गवत |
| 25 – 5 | वानर | - |
| 5 | द्विपाद प्राणीच | - |
| 1.8 | मानव | - |

इतिहास पूर्व कालखंड तीन टप्प्यात विभागला जातो 1) प्राचीन शीलायुग 2) मध्य शीलायुग 3) नवेशीलायुग

### प्राचीन शीलायुग :



हा कालावधी मानवाच्या इतिहासातील सुरवातीचा पुरातत्वीक (Archaeological) टप्पा होय. या काळातील मानव जंगलातील फूले, कंदमुळे खाऊन जगत असत. जंगलात फिरून मिळालेले अन्न खात असत. गुहा, मोठ्या दगडांचा आसरा अशा ठिकाणी ते राहात होते. प्राण्याना मारण्यासाठी चाकू दगडचा धारदार पाते, मोठ्या दगडी उपकरणोचा वापर करत होते.

©KTBS Not to be republished

पाने आणि झाडांच्या साली अंगावर परिधान करण्यासाठी वापरत असत. त्यावेळी सर्व कालावधीमध्ये फूले, कंदमुळे मिळत नव्हती. प्राचीन शीलायुगाच्या शेवटच्या कालावधित मानवाने आहारासाठी शिकार करणे, मासे पकडणे अशा कला अवगत केल्या. याच काळात सर्वप्रथम अग्नीचा परिचय झाला. मध्य प्रदेशातील बेलान दरी, कर्नाटकातील हुनसगी आणि बैचबाळ प्रदेश, आंध्रप्रदेशातील कर्नूल, अमरावती, तमिळनाडूतील अत्तीरामपक्कम इत्यादी प्राचीन शीलायुगातील प्रमुख स्थळे आहेत. सामान्यपणे 5 लक्ष वर्षापासून ते 12 हजार वर्षापर्यंतचा काल हा प्राचीन शीलायुग म्हणून ओलखला जातो.

**मध्य शीलायुग (Mesolithic age):**

हा कालखंड म्हणजे प्राचीन शीलायुग आणि नवीन शीलायुगाच्या मधला कालावधी होय. म्हणून याला मध्य शीलायुग असे म्हणतात. या काळातील मानव मोठ मोठ्या दगडी हत्यारा ऐवजी लहान दगडी हत्यांरांचा वापर करु लागला. त्यामुळे या काळाला सूक्ष्म शीलायुग (Microlithic age) असे म्हणतात.



इतिहास पूर्व काळातील मानवी जनजीवनाचे काल्पनिक दृष्य

ही सूक्ष्म हत्यार बाणाच्या टोकाला किंवा काठीच्या टोकाला अडकवून बर्चीसारखा त्याचा शिकारीसाठी वापर करीत असत. आहारासाठी जंगलातील धान्याचा संग्रह करीत असत धान्य असो किंवा शिकार ती सतत मिळत नसे. अनेक वेळा त्याना उपासमारीची वेळ त्यांच्यावर येत असे. त्यासाठी ते शिकारीच्या वेळी जखमी होऊन मिळालेले जीवंत प्राणी किंवा मिळालेली पिल्ले आपल्या सोबत पाळण्याचा मार्ग त्यानी अवलंबिला. अशा प्राण्यांचा ते शिकार न मिळालेल्या दिवशी आहारासाठी वापर करीत असत. या प्रकारामुळे त्याना पुढे पशुपालानासाठी प्रेरणा मिळाली. मध्यशीलायुगातील मानव आपल्या आणि प्राण्याच्या आहारासाठी सतत स्तलांतर करीत असत. एक ठिकाण सोडून दुसरी कडे जाताना त्या ठिकाणाच्या दगडांवर चिन्हे काढत असत. प्राण्यांचा

© KTBS Not to be republished

कातड्यांचा वापर आपले शरीर झाकण्यासाठी करत असत. या काळातील लोकांना अग्नीचा परिचय चांगला होता. मध्य प्रदेशातील भीमबेट्टक, आदमगर, कर्नाटकातील ब्रह्मगीरी, कनगणहळ्ळी, राज्यस्थानातील बागोर, गणेश्वर, पश्चिम, बंगालमधील बिरभानपूर, आंध्रप्रदेशातील वानपसारी उत्तर प्रदेशातील सरायनहर राय, महादह इत्यादी स्थळे प्रमुख आहेत. मध्यशीला युगाचा कालावधी सामान्यपणे 12000 वर्षापासून 9000 वर्षापर्यंत असावा असे मानले जाते.

## नवीन शीलायुग



नव शीलायुगातील हत्यारे

मध्य शीलायुगातील मानव पशुपालन करणारे पशुपालक झाले होते. त्यांना स्वतःच्या व प्राण्याच्या आहाराची कमतरता भासत होती. बऱ्याचवेळा अशी परिस्थिती निर्माण व्हायची त्यामुळे आहारासाठी स्थलांतर हा पर्याय सोडून नवशीला युगातील लोक आहार उत्पादनासाठी पुढे सरसावले. नदी काठावरील सुपीक मैदानी प्रदेशात त्यानी शेती करायला सुरूवात केली. शेतीमुळे नवशीलायुगातील लोकांना अन्नधान्य व प्राण्यासाठी चारा मिळाला. त्यामुळे भटके जीवन साडून देऊन योग्य प्रदेशात त्यानी स्थायिक होण्यास सुरूवात केली. हिच शेती संस्कृती आणि नागरिकतेच्या उदयाचे पहिले पाऊल ठरले. भारतीय उपखंडात शेतीसंबंधीचे सुरवातीचे पुरावे पाकिस्तानातील मेहरगर येथे मिळाले आहेत.

येथील लोकांनी राहण्यासाठी कोरडया विटांची घरे निर्माण केली, तर काश्मिर मधील बुर्जहोम प्रदेशातील लोकांनी जमीनीत गुहा निर्माण केल्या. शेतीतून उत्पादन झालेल्या धान्याची साठवण करण्यासाठी समस्या निर्माण झाली त्यावेळी त्यानी मातीपासून हाताने मडके (रांजन) तयार करण्याची कला आवगत केली. त्याशिवाय कापणे कांडण, दळण

© KTBS Not to be republished

यांची साधणे आस्तित्वात आणली. याच काळात सुरूवातीला खेडयांचा विकास झाला. चाकाचा शोध त्यागल्या नंतर गुणात्मक आणि विविध आकाराची मडकी तयार करणे शक्य झाले. या काळात दगडी हत्यारे चांगली टोकदार करुन नवीन रूपात त्याचा वापर करत असत. बळ्ळारी जवळील संगनकल्लू हे अशा प्रकारची हत्यारे तयार करण्याचे ठिकाण होते. विशेषत कुऱ्हाड, लोखंडापासून केलेली हत्यारे ते वापरत असत. कर्नाटकातील बन्नहटी, ब्रह्मगीरी, बुदिहाळ, हळ्ळूरू,पिक्लीहाळ, टि. नरसिपूर, उन्नूर, बिहार मधील चिरांड इत्यादी ठिकाणी नवशीला युगातील अवशेष सापडले आहेत. सामान्यपने याचा कालखंड आज 9000 ते 5000 वर्षापर्यंत दर्शविला जातो.

## भारतामधील शीलायुगातील स्थळे




©KTBS Not to be republished

**धातु युगः** नवशीला युगाच्या शेवटच्या कालावधित धातूच्या वापराला सुरूवात झाली. मानवाने सर्वात प्रथम तांबे या धातूचा वापर केला. तांबे आणि पितळ यांचे मिश्रण करून कास्य तयार करण्याचे ज्ञान याना झाले. कास्य हे तांब्या पेक्षा कठीण असा एक मिश्रधातू आहे.

**तांबे आणि कास्यः** शिलायुग : या काळात तांबे आणि कास्याच्या हत्यारां-चे प्रमाण फारच कमी असल्याने त्यांच्या सोबत दगडी हत्यारांचा वापरही पुढे चालू राहिला. त्यामुळे या काळाला तांबे आणि कास्य शीलायुग असे म्हणतात. हे आपल्याला 5000 वर्षापूर्वीपासून आढळून येते.शेती आणि पशुपालन हे त्याकाळातील प्रमुख उद्योग होते. चाकाच्या सहाय्याने तयार केलेली अलंकारिक मडकी या काळात दिसून येतात. तांब्याची उपकरणे, दागिनेही आढळले आहेत. जमीन खनण्यासाठी आणि जंगल तोडून ती जमीन शेतीसाठी परिवर्तन करण्यासाठी कास्याची उपकरणे सहाय्यक ठरली. त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ दिसून आली. आवश्यकतेपेक्षा अधिक असलेले धान्य हव्या असलेल्या प्रदेशात पाठविल्या मुळे व्यापाराची सुरूवात झाली. त्यामुळे वायव्य भारतामध्ये सिंधू व तिच्या उपनद्यांच्या खोऱ्यात हरप्पा नागरिकते सारख्या भव्य संस्कृतीचा उगम होणे साध्य झाले. हीच सर्वात पहिली नागरिकता (संस्कृती) असे इतिहासकारांचे म्हणजे आहे. दक्षिण भारतात तांब्याशी तुलना केल्यास कास्याचा उपयोग अधिक नव्हता. कर्नाटकातील हळ्ळूरु, बनहळ्ळी, ब्रह्मगीरी इत्यादी ठिकाणी तांबे आणि कास्याच्या शीलायुगाचे पुरावे सापडले आहेत.



बृहत शीला संस्कृतीतील शीलागोरी

**लोह शीलायुगः** लोखंड हा अत्यंत कठीण असा धातू आहे. ह्या धातूचा वापर दक्षिण भारतात तांब्याच्या धातूपेक्षा पहिला वापर करत होते.

दक्षिण भारतात 3500 वर्षापूर्वीच लोखंडाचा शोध लागला होता. या काळाला भव्य शीला संस्कृतीचा

©KTBS Not to be republished

काळ असे म्हणतात. भव्य शीला संस्कृतीतील समाधिमध्ये शवाच्या सभोवताली दगडाचे गाल वर्तुळ (**Stone circle**) निर्माण करत असत. समाधीच्या खोलीमध्ये सामान्यपणे काळया व लाल रंगाची मडकी (Black and Red ware) दिसून येत असत. अशा प्रकारच्या समाधींना कर्नाटकातील सर्व सामान्य लोक पांडवाचे देऊळ/घर, मौर्याचा दगड असे म्हणतात. लोखंडाची हत्यारे आणि उपकरणे कृषी आणि हस्तकला व्यवसायाला आश्रय मिळाला. उत्तर भारतामध्ये लोखंडाचा उपयोग अधिक झाल्यामुळे कृषी व्यवसाय कार्य भरभराटीस लागले. त्यामुळे उत्पादन अधिक वाढले. हे वाढलेले उत्पादन त्याचे नियोजन करणारा वर्ग 2600 वर्षापूर्वी उदयास आला. आणि तीच गणराज्ये होत. त्यानंतर नंद, मौर्य साम्राज्ये भरभराटीस आली. लोह शीला युगाशी संबंधीत कर्नाटकातील बनहट्टी हिरेबेनकल्लू, ब्रह्मगिरी, कोप्प, हेगडेहळ्ळी, टी. नरसीपूर, हेम्मिगे, हळ्ळूर, जडिगेनहट्टी, सावनदुर्ग, दुभिदूर्ग, पांडवरदिन्नी इत्यादी स्थळे प्रमुख आहेत.

| |
|---|
| बृहत शीला युगातील समाधी मध्ये काही प्रतीकृती आहेत. त्यात गोल दगड (Stone Circle), उभादगड (Menhir), दगडाचे घर (Dolmen), दगडाच्या राशी (Cairn) मडके (Urn) इत्यादी होत. |

©KTBS Not to be republished

**नवीन शब्दांचा अर्थ:**

सरपटणारे : जमीनीवरून सरपटत जाणारे प्राणी. उदा: साप, सहस्त्रपदी
उभयचर : जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी राहणारे, उदा: कासव बेडूक
सस्तन : आपल्या पिल्लांना दूध पाजणारे प्राणी. उदा: गाय शेळी.
व्दिपादी : दोन पायाच्या सहाय्याने जमिनीवर चालणारे, पळणारे प्राणी उदा: गोरिला, मनुष्य

**I. योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.**

1. अक्षरांचा परिचय नसलेल्या कालखंडाला ___________ काळ म्हणतात.
2. सूक्ष्म शिलायुगाला ___________ शिलायुग असे म्हणतात.
3. भारतीय उपखंडात कृषीसंबंधी सुरवातीचे अवशेष (पुरावे) ___________ या टिकाणी आढळतात.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

1. इतिहासाचे तीन प्रमुख कालखंड कोणते?
2. पृथ्वीचा जन्म केव्हा झाला?
3. प्राचीन शिलायुगातील मानवाच्या उपकरणांची नावे लिहा.
4. मध्य शिलायुगाला सूक्ष्म शिलायुग असे का संबोधतात?
5. कोणत्या युगात मानवाने शेती करण्यास सुरुवात केली?
6. मानवाने विकसीत केलेला पहिला धातू कोणता?
7. भव्य शिलायुगातील स्मारकांना सर्वसामान्य जनता कोणत्या नांवाने संबोधतात?
8. कर्नाटकात असलेल्या भव्य शिलायुगातील स्थळांची नांवे लिहा.

**III. गटात चर्चा करून लिहा.**

1. नवीन शिलायुगातील शेतीच्या उदयास कारणीभूत गोष्टी कोणत्या?
2. लोखंडाचा शोध लागल्यानंतर लोह युगामध्ये कोणते बदल घडले?

**कृती**

- चित्राच्या सहाय्याने मडके तयार करताना पहा. मडके कसे तयार करतात या बद्दल कुंभाराकडून माहिती मिळवा.
- चिकणमाती पासून भांडी तयार करा.

©KTBS Not to be republished

| पाठ 4 | # प्राचीन संस्कृती |
|---|---|

**पाठाचा परीचय**

या पाठामध्ये जगातील प्रमुख प्राचीन संस्कृती असलेल्या इजिप्त, मेसोपोटेमीया, चीन आणि हरप्पा संस्कृती बद्दल परिचय दिलेला आहे. तसेच ग्रीक आणि रोमन संस्कृती बद्धल माहिती सांगितलेली आहे. या सर्व संस्कृतींच्या देणगी बद्दल संक्षिप्तणे विवरण केले आहे.

**सामर्थ्ये :**

1] जगातील प्रमुख संस्कृती उदयास आलेल्या नद्यांच्या मैदानी प्रदेशाबद्धल जाणून घेणे.

2] इजिप्त, मेसोपोटेमीया, चीन आणि हरप्पा संस्कृतीचा राजकीय इतिहास आणि देणगी याबद्दल समजून घेणे.

3] ग्रीक संस्कृतीतील शहरे आणि त्यांच्या देणग्या यांचा परिचय करून घेणे.

4] रोम संस्कृती मध्ये प्रसिद्ध झालेले ज्युलियस आणि अगस्टस सिझर यांचे कार्य जाणून घेणे.

©KTBS Not to be republished

कोणत्याही सजीवाला जगण्यासाठी आहार, पाणी, वारा, प्रकाश आवश्यक असतो. या बरोबर वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. सामान्यपणे दैनंदिन जिवन जगण्यासाठी पाणी आणि उत्तम वातावरण नदी काठच्या प्रदेशान दिसून येते. त्यामुळे इतिहास पूर्व काळातील लोक नदी काठच्या प्रदेशात रहात होते. परिणामी पुढे संस्कृतीचा उदय नदी काठच्या प्रदेशात झाला. नद्यांची सुपीक मैदाने प्राचीन संस्कृतीचा पाळणा होता. नाईल नदीच्या काठी इजिप्त संस्कृती, युफ्रेटीस आणि तैग्रीस नदीकाठी मेसोपोटेमीया संस्कृती, हो यांग हो आणि सिकियांग नदी किनारी चीन संस्कृती, सिंधू आणि तिच्या उपनद्यांच्या खोऱ्या मध्ये हरप्पा संस्कृती उदयास आल्या.




प्राचीन जगातील संस्कृती

## इजिप्त संस्कृती

इजिप्त ही प्राचिन जगातील पहिली संस्कृती आहे. ही नाईल नदीच्या काठावर उदयास आली. नाईल नदी ही जगातील अतिलांब नदी आहे. ही आफ्रिका खंडात उत्तराभिमुख होऊन वाहत येऊन मेडिटरेनियन समुद्राला मिळते. असेच वाहत असणाऱ्या मार्ग मध्ये इजिप्त मधून वाहत जाते. नाईल नदी नसती तर संपूर्ण इजिप्त वाळवंटी प्रदेश बनला असता. म्हणून इजिप्तला नाईल नदीची देणगी (Egypt the gift of the Nile) असे म्हणतात.

**राजकीय इतिहासः** आज सुमारे 5400 वर्षापूर्वी इजिप्त मध्ये राजवंश सतेची सुरुवात झाली. इजिप्तच्या राजाना फेरो म्हणून संबोधन होते. मेनेस (**Menes**) हा प्रथम फेरो. मेंफिस (Memphis) शहर हे त्याची राजधानी होती. यांच्या नंतर आलेल्या फेरो मध्ये खुफु, अमेन होटेप, थटमोस हे प्रमुख होत. खुफु याने गिज्हे जवळ जगातील अत्यंत

©KTBS Not to be republished

मोठे पिरॅमिड बांधविले. अमेन होटेप (Amenhotep) हा दिग्विजय च्या सहाय्याने राज्याचा विस्तार करून सम्राट बनला. नंतर आलेल्या फेरो मध्ये थटमोस हा महान दिग्विजयी होता. त्याच्या नंतर तिची मुलगी हयाषेपसुट (Hatshepsut) अधिकारावर आली. यामुळे ती जगातील सर्वात पहिली साम्राज्ञी म्हणून ओळखू लागली.


पिरॅमिड

शेवटी सुमारे 2300 वर्षापूर्वी ग्रीसचा राजा अलेक्झांडर याने इजिप्त जिंकून घेतले. तेथे आपल्या प्रतिनीधीची नेमणूक करून टालेयी (Ptolem) या घराण्याच्या आरंभाला कारणीभूत ठरला.

प्रसिद्ध राणी क्लियोपात्रा (Cleopatra) ही या घराण्यातील शेवटची राज्यकर्ती ठरली. हिच्या काळात इजिप्त रोम साम्राज्यमध्ये विलीन झाले होते.

**इजिप्त संस्कृतीची देणगी:** गहू आणि बार्ली हे इजिप्तच्या लोकांची आहाराची पिके होती. नाईल नदीचे पाणी कालव्यांचा सहाय्याने शेतीला पुरवठा करत होते.

इजिप्तमधील समाज मध्ये गुलामांची स्थिती दयनीय होती. गुलामांच्या मुळे भव्य पिरमीड निर्माण करणे शक्य झाले. समाजामध्ये महिलांना चांगला मान सन्मान मिळत होता. इजिप्त संस्कृतीतील लोकांना पुनर्जन्मावर विश्वास होता. त्यामुळे शव (मरण पावलेल्या माणसांचे शरीर) सुरक्षित ठेवत होते. सुरक्षित ठेवलेल्या शवाना मम्मी म्हणतात.

आपल्या कडे ग्रामदेवता असल्याप्रमाणे प्राचीन इजिप्त मध्ये प्रत्येक शहराला एक नगर देवता होत्या. त्याशिवाय सूर्य आणि नदी यांना देव मानत होते. प्राचीन इजिप्तीयन लोक हैरोग्लिफिक्स (**Hieroglyphic**) लिपी चा वापर करत होते. हैरोग्लिफ म्हणजे पवित्रलिपी अक्षर असा अर्थ होतो. नाईल नदी मध्ये उगवणाऱ्या प्यापीरस या घोडघास गवतावर (शेवाळासम) शाईने लिहीत होते. त्यांना भूमिती मध्ये (रेखा गणित) अपार ज्ञान होते असे समजत. या ज्ञानामुळेच भव्य पिरॅमीडांची रचना करणे साध्य झाले. इजिप्त मधील शिल्पकला मध्ये स्फिंक्स ही भव्य कलाकृती आकर्षक झाली आहे. ही सिंहाचे शरीर आणि मनुष्याचे तोंड धारण केलेले आहे.

©KTBS Not to be republished

## I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरून पूर्ण करा.

1. इजिप्त संस्कृतीचा ________ नदी काठावर उदय झाला.
2. गिज्हे जवळील जगातील मोठे पिरमीड बांधविलेला फेरो _______.
3. जगातील सर्वात पहिली साम्राज्ञी _____________ होय.
4. सिंहाचे शरिर, मनुष्याचे तोंड धारण केलेले इजिप्त मधील शिल्पकलेला ___________ म्हणतात.

## II. खालील प्रश्नांना एका वाक्यात उत्तरे द्या.

1. जगातील सर्वात लांब नदी कोणती ?
2. इजिप्तला नाईलची देणगी असे का म्हणतात ?
3. फेरो म्हणजे कोण? प्रमुख फेरोंची नावे लिहा ?
4. जगतील सर्वात मोठे पिरॅमीड कोणते ? ते कोणी बांधविले ?
5. मम्मी म्हणजे काय ?
6. प्राचीन इजिप्त लोकांची लिपी कोणती ?

**कृति:**

- इजिप्त संस्कृतीतील स्मारकांच्या चित्रांचा संग्रह करून आलबम तयार करा.

## मेसोपोटेमीया संस्कृती

आजच्या इराक देशातील तैग्रीस आणि युफ्रेटिस नद्यामधील खोऱ्यामध्ये मेसोपोटेमीया संस्कृतीचा उदय झाला. ग्रीक भाषेमध्ये मेसोपोटेमीया म्हणजे दोन नद्यामधील प्रदेश. याप्रदेशात सुमेरीयन, बॉबीलोनीयन, हिट्रेटरीयन, अस्सीरीयन आणि नव बॉबीलोनीयन इत्यादी वंशजांनी राज्य केले.

**राजकीय इतिहास:** सुमेरीयन पासून सर्वात प्रथम येथे संस्कृती आस्तित्वात आली. ऊर (गडी), किश (Kish), लगाश (Lagash), इत्यादी नगर राज्यांचा प्रारंभ झाला.सुमेरीयनना क्यूनीफारम (Cuneiform) लिपी मध्ये ओल्या शाडूमातीने बनविलेल्या फलकावर लिहीत होते. मेसोपोटेमीयनांचा भारत देशाशी संपर्क होता. सुमेरीयनांच्या नंतर अक्काडीयन आले. अक्काडीयनांचे साम्राज्य दुष्ट नागरीकांच्या आक्रमणामुळे लवकरच पतन पावले. नंतर अमोरैटस (Amorites) नावाच्या आणखीन जात बॅबीलॉन नावाच्या शहारातून राज्य करीत होते. त्यांनी अक्काडीयन राज्य आपल्या नियंत्रणाखाली घेऊन विशाल राज्य स्थापन केले.

©KTBS Not to be republished

**हामुराबी (Hammurabi):** बॅबीलोनीयनांच्या मध्ये प्रसिद्ध राजा हामुराबी (Hammurabi) होय. हा त्याच्या कायद्याच्या संहितेमुळे जगप्रसिद्ध झाला. जशांस तसे या तत्वावर हे कायदे आहेत. बॅबीलोनीयनांच्या नंतर कासैट (Kassite) आणि हिट्रेट नावांच्या जमातीने मेसोपोटेमीयावर कांही काळ राज्य केले.



हम्मुरबी

**असुरबनीपाल:** हिट्रेटर नंतर मेसोपोटेमीयावर अस्सीरीयनानी राज्य केले. अस्सिरीयनांच्यांतील अत्यत प्रसिद्ध चक्रवर्ती म्हणजे असुरबनीपाल (Assurbanipal) होय. हा महान लेखक आणि कवी होता. निनेव्ह नगरामध्ये एक उत्तम ग्रंथालयाची निर्मीती केले.

**नेबुखडनेजर:** नंतर आलेल्या राज्यकर्त्यामध्ये नेबुखडनेजर (Nebuchadnezza) प्रसिद्ध होता. याने जगातील सात आश्चर्यापैकी एक असलेले झुलना बगीचा (Hanging Garden) बॅबीलोन शहरामध्ये निर्माण केला.

शेवटी आज रोजी 2500 वर्षापूर्वी पर्शियाचा चक्रवर्ती सैरस (Cyrus) याने बॅबीलोन शहर जिंकून घेतल्यानंतर मेसोपोटेमीया संस्कृतीचा शेवट झाला.



जिग्गुरात

**मेसोपोटेमीया संस्कृतीची देणगी:** जगामध्ये सर्वात प्रथम कायद्याच्या संहिता प्रमाणे राज्य कारभार करणारे मेसोपोटेमीयन लोक होय. हामुराबी याने जगामध्ये सर्वात प्रथम कायद्यांची संहिता अं लात आणली. याने कायद्यामध्ये गुलामावरील अत्याचार विषयी निषेधाची तरतूद केली. मेसोपोटेमीयन लोकानी हरप्पा आणि इजिप्त शहराबरोबर व्यपारी संबध जोडले होते. इजिप्त प्रमाणे येथेही प्रत्येक शहराला एक आदि देवता होती. येथे जिग्गुरात (नळसर्सीरीं) नावाची उंच असलेली देवालये बांधली होती. येथील लोक लिहिण्यासाठी कोन लिपी (क्यानिफार्म) चा वापर करत होते. गिल्गमेश हे मेसोपोटेमीयनांचे महाकाव्य आहे.

©KTBS Not to be republished

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरून पूर्ण करा..**

1. असुरबनीपाल याने ________ नगरामध्ये ग्रंथालयाची निर्मीती केली.
2. सुमेरीयन लोक ________ लिपीमध्ये लेखन करीत होते.
3. जगामध्ये सर्वात पहिल्यांदा कायदे संहिता अंलात आणलेला राजा ________ होय.

**II खालील प्रश्नांना एका वाक्यात उत्तरे द्या.**

1. मेसोपोटेमीया कोणत्या नदी काठी उदयास आले ?
2. मेसोपोटेमीयानंतर कोणी कोणी राज्य केले ?
3. मेसोपोटेमीयाची नगर राज्ये कोणकोणती ?
4. हम्मरबी यांच्यावर टीपा लिहा.
5. बॅबीलोन शहरा मधील 'झुलता बगीचा' कोणी निर्माण केला ?
6. जिग्गुरात म्हणजे काय ?
7. मेसोपोटेमीयनांचे महाकाव्य कोणते ?

**कृती:**

- प्राचीन जगातील सात आश्चर्याबद्धल माहिती संग्रह करा.

## चीनची संस्कृती

भारताच्या ईशान्येला चीन हा देश आहे. येथील लोक मंगोलीयन नावाच्या पिवळ्या रंगाच्या शरीर यष्टीचे मुळ वंशज आहेत. यांगत्से (धरपसींश) आणि हो-यांगे-हो (पिवळी नदी) (कुरपसे) या येथील प्रमुख नद्या आहेत. प्रथम हळदी नदीच्या काठावर चीनी संस्कृतीचा उदय झाला. त्यामुळे त्याला 'चीन संस्कृतीचा पाळणा' असे म्हणतात. आरंभी गावामधूनच त्यांच्या राज्यकारभाराला सुरुवात झाली. भात आणि रेषीम उत्पादन करून विदेशी व्यापार वाढविला.

**राजकीय इतिहास:** शांग हे चीनचे मूळ घराणे होते. या घराण्याने आज मितीस 3600 ते 3000 वर्षापर्यंत राज्य केले. यानी शेतीला जास्त प्राधान्य दिले. या काळातील लोक चिनी मातीची भांडी आणि कासे धातुची भांडी उत्पादन करण्यासाठी हस्तकलेत तरबेज होते. शांग घरान्यानंतर चौ घराण्याने जास्त काळ राज्य केले.

©KTBS
Not to be republished

चौ घराण्यातील प्रसिद्ध राजा होवांग (Wu wang) होय. प्रसिद्ध चिनी तत्वज्ञानी कनफ्याशियस, लावोत्से (Lao Tze) हे चौ घराण्याच्या काळातच होते. चौ घराण्याचा शेवट करून चीन (Shin) घराणे अधिकारावर आले. चीन घराण्यावरूनच या देशाला 'चीना' असे नांव पडले.

**षी-हाँग-ती (Shi-Huang-Ti):** चीन घराण्याचा प्रसिद्ध राजा षी-हाँग-ती होय. याने चिनची एकी करून एकाच पध्दतीचे कायदे अंमलात आणले. म्हणून याला चीनचा पहिला राजा म्हणून संबोधतात. शत्रूचे आक्रमण थांबविण्यासाठी 1500 मैल लांबीची चीनची भिंत निर्मीती केली. षी-हाँग-ती निधन पावल्यानंतर चीन हान वंशाच्या अधिपत्याखाली आले. या काळाला चीनचा सुवर्ण काळ म्हणून ओळखतात.

**वू-ती (Wu-Ti):** हान वंशाचा प्रसिद्ध राजा वू-ती याच्या काळात विशाल चीनची स्थापना झाली. विदेशी अर्थिक व्यापाराला उत्तेजन मिळाले. रोमन साम्राज्यामध्ये चीनच्या रेशीमला मोठी मागणी होती. त्याकारणाने चीन आणि रोम यांच्यामधील व्यापारी मार्ग रेशमी मार्ग या नावाने प्रसिद्ध होता. बौध्द धर्माने याच काळात चीन मध्ये प्रवेश केला. हान वंशाच्या काळात कला आणि साहित्याला जास्त प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे या वंशातील काळाला चिनच्या इतिहास तील सुवर्ण युग म्हणून प्रसिद्धी मिळाली.

नंतर आलेच्या सुंग घराण्याच्या काळात ठशांचे मुद्रणयंत्र आणी चिनी मातीची भांडी तयार करण्यास सुरुवात झाली. मंगोलीयनानी सुंगाची राजधानी पीकींग (आताची चीनची राजधानी बिजींग) जिंकून घेतले आणि सुंगाच्या राज्यकारभाराचा शेवट केला.

**चीनी संस्कृतीची देणगी:**

प्राचीन जगताला चीन लोकांनी मोठी देणगी दिली आहे. चहा आणि रेशमी वस्तूंचा जगाला परिचय करून दिला. याशिवाय बेटापासून (बिदर) तयार केलेला कागद, स्फोटक दारूगोळा, (तोफ) पेंटीग ब्रश चिनी मातीची भांडी, दिशा दर्शक यंत्र (दिकसूची) इत्यादींचा शोध लावल्याची किर्ती चिनी लोकांना जाते. चीनी लोक चित्र लिपी व्दारे लेखन करीत होते. हे लेखन बेट्टापासून (बिदरीच्या) वस्तू वरती वरून खाली लिहीत होते.



चीनची चित्र लिपी

©KTBS Not to be republished

चीनचे तत्वज्ञानी क्षेत्राला लावोत्से आणि कनफ्याशियस यांनी प्रसिद्धी मिळवून दिली. लावोत्से (Lao Tze) याने चीनी लोकांना सरळ जीवन जगणे. त्याग आणि निसर्गाशी एकरूप होऊन जगण्याचे तंत्र शिकविले. आणखी एक तत्वज्ञानी कनफ्याशियस याने समाजामध्ये ढासळलेली नीतिमत्ता आणि सामाजीक मूल्ये पुन्हा लोंकाच्यामध्ये रूजविण्याचे कार्य केले.

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरून पूर्ण करा.**

1. चीन आणि रोम मधील व्यापारी मार्ग _________ मार्ग म्हणून प्रसिद्ध होता.
2. चीनी लोक _________ लिपीचा वापर करून लिहीत होते.

**II. खालील प्रश्नांना एका वाक्यात उत्तरे द्या.**

1. चीनची संस्कृती कोणत्या नदीकाठी उदय झाली?
2. चीनवर राज्य केलेल्या प्रमुख घराण्यांची नावे लिहा?
3. चिनची भव्य भिंत कोणी बांधविली ? का?
4. वु. ती. राजा बध्दल टीपा लिहा?
5. प्राचीन जगताल चीनी लोकांनी दिलेल्या देणग्यांची यादी करा?
6. चीन देशातील प्रमुख तत्वज्ञानींची नावे लिहा?

**कृती**

- प्राचीन आणि आधुनीक जगातील सात आश्चर्यांची चित्रे संग्रहीत करून आल्बम तयार करा.

## ग्रीक संस्कृती

ग्रीक हे एक मेडटिरेनीयन समुद्रात असलेले एक पर्यायी द्वीप आहे. लहान सहान पर्वत आणि दऱ्या यांनी ग्रीक लोक इंडो-युरोपियन वंशाशी संबधीत होते. प्राचीन ग्रीक मध्ये अयोलियन, अलोनियन, डोरियन या जाती जमाती होत्या.

**नक्षर राज्यः** तीन हजार वर्षापूर्वी ग्रीकच्या प्रत्येक जमातीला एक राजा असे. त्याला सल्ला देण्यामाठी वडीलधारी मंडळी होती. हस्त उद्योग आणि व्यापार या मध्ये वृद्धी झाल्यामुळे ही जमात रहात असलेल्या खेड्यांचे नगर, शहरात रूपांतर झाले. पुढे हीच शहरे नगरराज्ये झाली. प्रत्येक नगरराज्ये स्वतःची अशी सेना, राज्यकारभार,

©KTBS Not to be republished

नगरदेवता इत्यादी स्थापन केली. अशा प्रकारे ग्रीसमधील नगरराज्ये वेगवेगळी स्वतंत्र्य झालेली दिसली तरी सांस्कृतीक दृष्ट्या एकच होती. ग्रीसच्या नगरराज्यामध्ये अथेन्स आणि स्पार्टा ही अत्यंत प्रमुख होते.

## राजकीय इतिहास:

**अथेन्स:** अथेन्स हे ग्रीस मध्ये लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केलेले आदर्श नगर राज्य होय. अथेन्स मध्ये असलेली राज्येशाहीचा त्याग करून क्लैस्तनीस (Cleisthenes) याने 2500 वर्षापूर्वी लोकशाही प्रस्थापीत केली. नंतर अथेन्स मध्ये पेरीक्लीसन काळाला सुरुवात झाली. याच काळ ग्रीस मधील सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. कारण पेरीक्लीसन याच्या काळात कला, साहित्य, विज्ञान, तत्वज्ञान इत्यादी क्षेत्रामध्ये असाधारण प्रगती झाली होती. त्यामुळे अथेन्सला हेल्लासनची शाळा (School of Hellas) असे पेरीक्लीस याने म्हटले आहे.

**स्पार्टा:** डोरीयन जमातीचे नगरराज्य असलेले स्पार्टानगर सैनीकांचे राज्य झाले होते. पर्शियाचा सम्राट डेरीयन्स याने ग्रीसवर हल्ला केला. त्यावेळी अथेन्स आणि स्पार्टा नगरराज्ये एकत्र येऊन पर्शियन सैनिकांचा मॅराथॉनच्या रणभूमीवर पराभव केला. पुढे अथेन्स आणि स्पार्टा नगरराज्यामध्ये संघर्ष झाला. शेवटी अथेन्सचा पराभव होऊन स्पार्टानगर राज्याच्या आधिपत्याखालील राज्य झाले.

## ग्रीकांची देणगी:

प्राचीन ग्रीकांनी जगाला अपार देणग्या दिलेल्या आहेत. अथेन्स ही नगराची आदिदेवता होती. ऑलिंपीया मध्ये ज्यूस देवाचे देवालय आहे. येथे चालत असलेल्या ऑलिंपीक क्रिडास्पर्धेमध्ये ग्रीक मधील सर्व नगरराज्ये भाग घेत होती. आज आधुनिक ऑलिंपीक क्रिडास्पर्धेमध्ये जगातील बहुतेक देश भाग घेतात. तत्वशास्त्राला ग्रीकांची देणगी मोठी आहे. ग्रीकचा श्रेष्ठ तत्वज्ञानी साक्रेटीस. त्याचा शिष्य प्लेटो. प्लेटोचा शिष्य अरिस्टॉटल. त्याचा शिष्य म्यासीडोनीयाचा राजा अलेक्झांडर महाशय. यांचे जगातील श्रेष्ठ गुरुपरंपरा झाली आहे. प्लेटो याने 'अकाडेमी' नावाने शैक्षणिक संस्था स्थापन केली. डेमोस्तेनीस

©KTBS Not to be republished

हा ग्रीकमधील अत्युत्तम भाषणकर्ता म्हणून प्रसिद्ध होता. होमर नावाचा आंधळा कवी याने 'इलियाड' आणि 'ओडीसी' या महाकाव्यांची रचना केली. इतिहासाचा पितामह हेरोडेटस् आणि थुसिडीडीस हे प्रमुख इतिहासकार होते. ईस्कीलस, सोपोक्लीस आणि युरीपीडीस हे प्रमुख नाटककार होते. यानी जगातील साहित्य क्षेत्राला अमुल्य अशी देणगी दिलेली आहे.

पेरीक्लीस याने बांधविलेले अथेन्समधील प्रार्थना देवालय हे ग्रीकांच्या सुंदर वास्तुशिल्पकलेचे उत्तम उदाहरण आहे. ग्रीक शिल्पकार मानवाच्या शरीर रचनेचे हुबेहुब चित्र निर्मीती करीत होते. मैरान त्यावेळचा प्रमुख शिल्पी असला तरी पालीग्नाट्स त्यावेळचा प्रमुख चित्रकार होता. थेल्स, पायथागोरस हे गणित क्षेत्रातील दिग्गज होते.

'वैद्यकशास्त्राचा पितामह' हिप्पाक्रिटस सुद्धा ग्रीक देशाचा होता.

ग्रीक आणि पर्शियन याच्यामध्ये 2500 वर्षापूर्वी झालेल्या मॅराथॉन युद्धामध्ये ग्रीकांचा विजय झाला होता. युद्धभूमी पासून 24 मैल लांब असलेल्या ही संतोषा-ची बातमी सागण्यासाठी 'फिलिप्पिडीस' (Philippides) नावाचा सैनिक धावला होता. विजयाची बातमी अथेन्सला सांगितल्यानंतर बेशुद्ध पडून मरण पावला. त्याच्या स्मरणार्थ ऑलिंपीक क्रिडास्पर्धेमध्ये मॅराथॉन स्पर्धा आयोजीत केली जाते.

ग्रीस मधील लोकशाही शासन व्यवस्था ग्रीसचा मॅसीडोनीयनचा राजा फिलीप याने मोडून काढली. त्याचा मुलगाच अलेक्झांडर होय. अलेक्झांडर हा महान जगज्जेता होता. लहान वयातच याने जग जिंकण्यासाठी दंडयात्रा हाती घेतली. याचा परिणाम म्हणजे इजिप्त, ब्याबीलोन, पर्शिया जिंकून घेऊन भारतापर्यंत आला. नंतर आपल्या देशाला परत जात असताना त्याचा वाटेतच मृत्यु झाला. याने इजिप्तमध्ये अलेक्झांड्रीया नावाने शहर निर्माण केले.

©KTBS Not to be republished

## I खालील प्रश्नांना एका वाक्यात उत्तरे द्या.

1. प्राचीन ग्रीक मध्ये असलेल्या जमाती कोणत्या ?
2. प्राचीन ग्रीक मधील नगरराज्ये कोणकोणती ?
3. ग्रिस मधील प्रमुख इतिहासकार कोण ?
4. अथेन्स बदल टीपा लिहा ?

5. होमर याने रचलेल्या कृतींची नांवे लिहा ?

6. वैद्यशास्त्राचा पितामह कोण ?

**II खालिल अ यादी आणि ब यादीतील विषय यांच्या जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| अथेन्स | प्रार्थनाचे देवालय |
| प्लेटो | म्यासीडोनियाचा राजा |
| पेरिक्लीस | ग्रीक नाटककार |
| अलेक्झांडर | अकाडेमी |
| ईस्किलस | नगरराज्ये |

**कृती**

- आधुनिक ऑलिंपीक बाबत माहिती संग्रह करा.

## रोमन संस्कृती

युरोपच्या दक्षिणेला मेडीरेनियन समुद्रामध्ये लांबपर्यंत पसरलेला पर्यायी द्वीप म्हणजेच इटली. येथे लॅटीन जमातीचे मूळ वंशज रहात होते. 2700 वर्षापूर्वी टैबर नदीच्या काठावर रोम नावाच्या जनवस्ती प्रदेशाचा उदय झाला. रोममधील मुळ पुरुष रोमलस आणि रिमस होय.

**राजकीय इतिहास:** पुढे रोमच्या राजकीय इतिहासामध्ये ज्युलियस सिझर आणि अगस्टस सिझर हे प्रमुख झाले. क्रासस, पांपे, आणि ज्युलियस या त्रिमूर्तींनी (First Triumvirate) एकत्र येऊन रोममध्ये राज्यकारभारास सुरुवात केली. हे तिघे दंडनायक म्हणून रोम साम्राज्यातील विविध प्रदेशाची पाहणी करत होते.

**ज्युलियस सिझर:** क्रासस याच्या निधनानंतर पांपे आणि ज्युलियस सिझर यांच्यामध्ये स्पर्धा लागली. शेवटी पांपे याला ज्युलियस याने ठार मारले. नंतर ज्युलियसने इजिप्त जिंकून तेथील राणी क्लियोपात्रा बरोबर स्नेह संबध वाढविले. ज्युलियस सिझर सर्वाधिकारी होऊन रोमन लोकशाही व्यवस्थेचा नाश केला. या घटनेची आठवण ठेउन ज्युलियस सिझरच्या विरोधकांनी त्याची हत्या केली. ज्युलियसच्या काळात रोमची शेती, हस्त व्यवसाय आणि व्यापार क्षेत्रामध्ये बरीच प्रगती झाली होती. ज्युलियन कॅलेंडर अंमलात आणले. या ज्यलियसचे सर्व कार्य अगस्टस सिझर याने पुढे चालविले.

©KTBS Not to be republished

**अगस्टस सिझरः** अगस्टस सिझरचे पूर्वीचे नांव आक्षेवियस. त्याने मार्क अंटोनी, लेपीड्स यांच्या बरोबर दुसऱ्या त्रिमूर्तींचा (Second Triumvirate) राज्यकारभार सुरु केला. लेपीडन्सनला पळवून लावून अंटोनी बरोबर राज्य विभागून घेतले. नंतर अंटोनीचा अगस्टसने पराभव केला. त्या नंतर अगस्टसने सर्व अधिकाऱ्यांना आपल्या हाताशी एकत्रीत करून राज्यकारभार केला. अगस्टस सिझर याचा काल सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. अगस्टसने अनेक लोकोपयोगी कामे हाती घेतली. या काळाला रोमचा शांततेचा काळ असे म्हणतात याकाळात रोमची आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगती झाली होती.

अगस्टस नंतर आलेले राजे असमर्थ होते. पुढे मुळ वंशातील लोकांच्या आक्रमणास बळी पडून प्राचीन रोमन साम्राज्य डोळ्याच्या पडद्या आड झाले.

**योगदानः**

जगातील साहित्याला रोमनानी मोठे योगदान दिले आहे. वर्जेल हा रोमचा श्रेष्ठ कवी. 'ईनियड' हे त्याचे महाकाव्य. ओविड हा आणखीन एक श्रेष्ठ कवी. याशिवाय सिसीर, प्लौटस इत्यादी प्रसिद्ध साहित्यीक होते. ज्युलियस सिझर देखील चांगला इतिहासकार होता. तत्वशास्त्र क्षेत्रामध्ये क्याटो प्रमुख होता. सिसेरू, सेनेका हे इतर तत्वज्ञानी होते. यांनी निसर्गाशी जुळवून घेऊन जीवन जग असा प्रसार केला. कलोसियम आणि एंपीथेटर हे रोमचे श्रेष्ठ वास्तूशिल्पकार होते. क्यूपीडन प्रतिमा, अरापेसीक शिल्पकला ही रोममधील शिल्पलकलेचे उत्तम उदाहरणे आहेत. रोमनाना विज्ञान आणि गणित क्षेत्रामध्ये दूरदृष्टींचे ज्ञान होते. ज्येष्ठ फ्लिनी याने 'नॅच्युरल हिस्टरी' नावाच्या विश्वकोषाची रचना केली. गॅलन हा रोमचा प्रसिद्ध तज्ञ वैद्य होय. स्ट्राबो, टालेमी हे त्याकाळातील प्रसिद्ध भूगोल शास्त्रज्ञ होते. रोमनांचे कायदे पुढील सर्व कायद्यासाठी आवश्यक ठरले. हे कायदे क्षेत्राला त्यांनी दिलेली अमूल्य अशी देणगी आहे. लॅटीन ही रोमन साम्राज्याची भाषा होती. आजही कायदे, विज्ञान इत्यादी क्षेत्रामध्ये लॅटीन भाषेतील शब्दांचा वापर करतात.

**I. खालील प्रश्नाना एका वाक्यात उत्तरे द्या.**

1. रोमनांचा मूळ पुरुष कोण?
2. पहिल्या त्रिमूर्तीची नावे लिहा ?
3. ज्युलियस सिझरच्या काळात कोणकोणत्या क्षेत्रात प्रगती केली होती?
4. अगस्टस सिझर बदल टीपा लिहा.
5. रोम साम्राज्य काळातील प्रमुख कवींची नावे लिहा.

©KTBS Not to be republished

6. रोमन तत्वज्ञानांची नावे लिहा.

7. रोमनांच्या योगदानाची यादी करा.

**II खालील प्रश्नांना गटात चर्चा करून उत्तरे द्या.**

1. अगस्टस सिझरचे कार्य.

2. रोमनांच्या देणगीची यादी करा.

**III खालील अ यादी आणि ब यादीतील विषयांचा संबध शोधून जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| रोम | न्यॅच्युरल हिस्टरी |
| अगस्टस सिझर | टैबर नदी |
| ज्येष्ठ प्लिनी | रोमचा सुवर्ण काळ |
| गॅलन | रोमची वास्तु शिल्प |
| कलोसियम | रोमचा तज्ञ वैद्य |

**कृती:**

- रोम संस्कृतीची कला आणि वास्तुशिल्प यांच्या चित्रांचा संग्रह करून अल्बम तयार करा.

## हरप्पा नागरिकता (संस्कृती)

एक शतकाच्या पूर्वी भारताच्या चरित्राचा अभ्यास वेदकालापासून केला जात होता. काही वर्षानंतर दयाराम सान्ही आणि रखलदास बॅनर्जी यांनी आताच्या पाकिस्तानातील हरप्पा आणि मोहेंजोदारो येथे प्राचीन नगरांच्या अवशेषांचा शोध लावला. हा शोध भारताच्या इतिहासाला वेदांपेक्षा सुमारे 2000 वर्षा पर्यंत मागे घेऊन जातो. सुरुवातीला सिंधू आणि तिच्या उपनद्यांच्या खोऱ्यात यांचा शोध लागल्यामुळे त्यामुळे याला सिंधु नागरिकता अथवा सिंधू संस्कृती असे म्हणून ओळखू लागले. परंतु तेव्हा पासून आतापर्यंत चाललेच्या संशोधना मध्ये सुमारे 1500 पेक्षा अधिक पुरावे स्थळांचे अवशेष सापडले आहेत. यावरून सिंधू संस्कृतीची पाळेमुळे सिंधू नदीच्या खोऱ्या पलिकडे पसरली आहेत याची जाणीव होते.

©KTBS Not to be republished

13 लक्ष चौ कि.मी. विस्तारामध्ये हरप्पा नागरिकता पसरली आहे. याची व्याप्ती उत्तरेकडे काश्मीर मधील मांड, पश्चिमेकडे बलुचिस्तानातील सुक्तजेंदार, पूर्वेकडे उत्तर प्रदेशातील आलंगीरपूर आणि दक्षिणेकडे महाराष्ट्रातील दैमाबाद पर्यंत पसरली आहे. त्यामुळे आता या नागरिकतेला (संस्कृतीला) सिंधू संस्कृती ऐवजी याचा पहिला पुरावा हरप्पा या नावावरून हरप्पा नागरिकता (संस्कृती) असे ओळखले जात आहे.




©KTBS Not to be republished

हरप्पा संस्कृतीची अनेक शहरे प्रकाशझोतात आली आहेत त्या मध्ये पाकिस्तानातील हरप्पा आणे मोहेंजोदारो, भारतातील कालीबंगन (राजस्थान), दोलामिरा, लोथाल (गुजरात), आणि राखीघरी (हरियाना) ही शहरे प्रमुखे आहेत (नकाशा पाहा).

**नगर योजना :** हरप्पा संस्कृतीतील नगरे अतिशय योजनाबद्ध रितीने निर्माण करण्यात

आली आहेत. त्यांच्या रक्षणासाठी किल्ले बांधण्यात आले आहेत. रूंद रस्ते, सार्वजनिक विहिरी, दुमजली इमारती, निटनेटकी गटार व्यवस्था ही हरप्पा नगराची विशेष लक्षणे होत. भूयारी गटार व्यवस्था ही तर प्राचीन भारतीयांनी दिलेले योगदान आहे. त्यांनी स्वच्छतेला दिलेले महत्व आजही आपल्याला मार्गदर्शक ठरते. येथील नगर योजनेची व्यवस्था जगातील दुसऱ्या कोणत्याही प्राचीन नागरिकतेमध्ये पहावयास मिळत नाही. मोहेंजोदारो नगरात सार्वजनिक स्थान गृह आहे. त्याच्या भोवती खोल्या आहेत. हरप्पा नगरामध्ये सहा धान्याची कोठारे असून भोवताली कामगारांची घरे आहेत. लोथाल हे प्रमुख बंदर होते.



सार्वजनिक स्थानगृह - मोहेंजोदारो

**आर्थिक जीवन:** कापूस व लोकरीपासून कपडे विणणे हे हरप्पा संस्कृतीतील लोकांचे एक कौशल्य होते. जळाऊ पक्क्या विटा तयार करणे हे यांचे आणखी एक कौशल्य होते. ते पशूपालन करीत असत. बैल, रेडे शेळ्या, मेंढया, डुकरे, मांजर, कुत्रा, उंट, गाढव इत्यादी प्राणी ते पाळत असत. आणि कापसाचे उत्पादन करीत असत. जगात सर्व प्रथम कापूस पिकविल्याचे श्रेय भारत देशाला जाते. याचे उत्पादन सिंधू नदीच्या प्रदेशात केल्यामुळे या कापसाला ग्रीक भाषेमध्ये ‘सिंधून’ असे संबोधले जाते. हरप्पा नागरिकांचे मेसोपोटेमिया नागरिकतेशी व्यापारी संबंध होते.

मेसोपोटेमियन लोक या नागरिकतेला ‘मेलूह’ असे म्हणत असत. लोथाल बंदराच्या

© KTBS Not to be republished

सहाय्याने अरबी समुद्र मार्गाने ते व्यापार करीत होते.



पशुपती मुद्रा



वसिंड असलेला बैल
आणि लिपी



एकशिंगी काल्पनिक
प्राणी मुद्रा



नर्तिकेची धातूची मुर्ती



मातृ देवतेची
मातीची मूर्ती



दाढी असलेल्या
मनुष्याची शीलामूर्ती

©KTBS Not to be republished

**सामाजिक जीवन:** हरप्पा संस्कृतीतील स्त्री-पुरुष दोघेही अलंकार प्रिय होते. स्त्रिया अनेक प्रकारचे गळ्यातील हार बांगडया, अंगठ्या, कर्णफुले, कमरपट्टे, पैंजन, नूपूर, पायात घालावयाची कडी, इत्यादी दागिने ते परिधान करीत असत. सौंदर्य प्रसाधनाचा वापर ते करीत असत. सुगंधी द्रव्यांची जाणीव त्यांना होती. स्त्रियां प्रमाणे पुरुष ही अलंकार प्रिय होते.

गोट्या, चेंडू आणि द्यूत हे त्यांचे खेळ होते. मनोरंजनाचे खेळ म्हणून ते बैलांची झुंज लावत असत. मुलांसाठी खेळण्यातील बैलगाडी व बाहुल्या हे खेळाचे साहित्य होते.

**कला:** चिनी मातीपासून मातृदेवतेच्या लहान मूर्त्यांचे भरपूर अवशेष मिळाले आहेत. सुमारे 2000 पेक्षा अधिक मुद्रा मिळाल्या आहेत. त्यामध्ये वशिंड असलेला बैल, एकशिंगी प्राणी प्रमुख आहेत. येथे धातूपासून बनविलेली नर्तिकेची मूर्ती, आणि दाढी असलेल्या मनुष्याची शीलामूर्ती या येथे मिळालेल्या सुंदर मूर्ती आहेत.

**धर्म:** हरप्पा नागरिक पशूपती (शिव) व मातृ देवतेची पूजा करीत असत. ते पिंपळवृक्ष, सूर्य, अग्नी, पृथ्वी, जल आणि नागदेवता यांची आराधना करीत असत. काली बंगन. आणि लोथाल इत्यादि नगरामध्ये यज्ञकुंड सापडले आहेत.

**लिपी:** हरप्पा लोक त्यांची स्वत:ची अशी लिपी आणि भाषा वापरत होते. विद्वान त्यांच्या मुद्रावरील लिपी वाचण्यासाठी अनेक दशकांपासून प्रयत्न करीत आहेत. तरीदेखील हरप्पा लिपीचा अर्थ समजून घेणे त्याना साध्य झाले नाही.

**नगरांचा ऱ्हास:** कालांतराने हरप्पा संस्कृतीतील नगरांचा ऱ्हास झाला. याची अनेक कारणे आहेत.

* सिंधू आणि तिच्या उपनद्याना वेळोवेळी आलेल्या महापूराचा उपद्रव.
* विटा भाजण्यासाठी झाडांच्या अमाप तोडीमुळे जंगलांचा नाश आणि यामुळे लोकांचे स्थलांतर
* बोहरून आलेल्या आर्यांनी हरप्पा लोकांवर केलेले आक्रमण.
* सांसर्गिक रोगांचा प्रसार.

वरील कारणांमुळे एक भव्य अशा नागरिकतेचा / संस्कृतीचा कालांतराने ऱ्हास झाला असावा असा अभिप्राय इतिहासकार व्यक्त करतात. एकूणच आपल्या पूर्वजांची अद्भूत नगर योजना आणि स्वच्छतेबध्दची काळजी आज आपल्याला आदर्श ठरली आहे.

**नवीन शब्द:**

- नागरिकता : नागरी जीवन, व्यापाराचा विकास, लिहिण्याची कला, धातूंचा वापर. इत्यादी सर्व गोष्टी नागरिकता प्रतिबिंबित करतात.
- स्थळांचे अवशेष : प्राचीन काळातील निवासी स्थळांचे अवशेष.
- वशिंड : बैलाच्या पाठीवरील उंच भाग.

©KTBS Not to be republished

## तुम्हाला हे माहित असू द्या.

1. ईस्ट इंडिया कंपनीच्या सैनिक सेनेत असणाऱ्या चार्लस् मॅसन (Charles masson) याने 1826 मध्ये हरप्पा येथे पहिली भेट दिली. त्यावेळी त्याने मॅसिडोनियाचा राजा अलेक्झांडरने पूर राजाला 2300 वर्षापूर्वी पराभुत केलेले हे स्थळ असे उद्गार काढले. मॅसन हरप्पा नगराची ओळख करून देणारी पहिली व्यक्ती असली तरी त्यांचा निर्णय चुकीचा होता..
2. हरप्पा : नागरिकतेतील लोक वापरत असलेले सोने हे कोलारच्या सोन्याच्या खाणीतून पुरविले जात होते..

## I. योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.

1. लोथाल हे हरप्पा नागरिकतेतील प्रसिद्ध ____________ होते.
2. मेसोपोटेमियन लोक हरप्पा संस्कृतीचा ____________ असे म्हणत असत.
3. हरप्पा लोक ____________ देवतांची पूजा करीत असत.

## II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1. हरप्पा संस्कृतीतील दोन प्रमुख शहरे कोणती ?
2. जगात सर्व प्रथम कापूस पिकविलेला देश कोणता ?
3. हरप्पा संस्कृतीतील लोक कोणत्या देवांची पूजा करीत होते ?
4. हरप्पा संस्कृतीतील सार्वजनीक स्नान गृह कोठे आहे ?
5. हरप्पा संस्कृतीमध्ये यज्ञकुंड आढळलेती स्थळे कोणती ?
6. हरप्पा संस्कृतीचा ऱ्हास होण्याची दोन कारणे लिहा.

## III. गटात चर्चा करून उत्तरे द्या.

1. हरप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाची कारणे कोणती ?
2. हरप्पा संस्कृती आणि तुमचे गाव/शहर या मध्ये सामाजिक, आर्थिक तसेच धार्मिक जीवनात आढळणाऱ्या समान अंशाची चर्चा करा.

## कृती

- हरप्पा संस्कृतीतील शहरे आणि आताची शहरे यातील साम्य यांची यादी करा.
- जगातील प्राचीन संस्कृती संबंधीची माहिती चित्रासह संग्रह करा.

* * * * *

©KTBS Not to be republished

| पाठ 5 | वेदकालीन संस्कृती |
| --- | --- |

**पाठाचा परिचय**

या पाठात वेदांचा परिचय करून दिला आहे. पूर्व वेदकाळ आणि उत्तर वेदकाळातील समाज, आर्थिक स्थिती, राजकीय आणि धार्मिक व्यवस्थेमधील फरक समजाविला आहे.

**सामर्थ्ये**

1] चार वेदांची नावे स्मरण करणे.
2] पूर्व वेदकाळ व उत्तर वेदकाळातील समाजात उद्‌भवलेला बदल ओळखणे.
3] वेदकाळातील राजकीय संस्थाची आठवण करणे.
4] वेदांमधील संदेश (उपदेश) समजून घेणे.
5] भारतीय महाकाव्यांची नावे जाणून घेणे.

©KTBS Not to be republished

मध्य आशियातून आलेल्या आर्य लोकांच्या आगमनाने भारतात एका नवीन संस्कृतीचा उगम झाला. त्या संस्कृतीना वेद कालीन संस्कृती असे म्हणतात. वैदिक संस्कृतीचा उगम सर्व प्रथम सरस्वती नदीच्या मैदानी प्रदेशात नंतर गंगा नदीच्या मैदानी प्रदेशात झाला. वेद साहित्याची रचना ज्या काळात झाली. त्या काळाला वैदिककाळ असे म्हणतात.

वेद म्हणजे ज्ञान. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद असे चार वेद आहेत. यातील ऋग्वेद हा प्राचीन वेद आहे. संस्कृत भाषेत असणारे हे वेद हजारो वर्षे मौखिक स्वरुपात होते. ऋग्वेदामध्ये सरस्वती या नदीचा उल्लेख अधिक आहे. सध्याच्या राजस्थानातील थरच्या वाळवंटात लुप्त झालेल्या 'घग्गर-आक्रा' याच नदीला सरस्वती नदी म्हणून ओळखले जाते. परंतु अफगाणिस्थानात वाहणारी हेल्मंड (Helmand) नदीच प्राचीन सरस्वती नदी असा मतप्रवाहही आहे.

आर्यांच्या काळात चार वेद तसेच त्या संबंधीच्या साहित्याची रचना झाली. वेदकालीन इतिहास जाणून घ्यावयाचा असल्यास वैदिक साहित्याचा आधार फार महत्वाचा आहे. ऋग्वेद काळाला पूर्व वेदकाळ म्हणून, तसेच त्यानंतरच्या काळाला उत्तर वेदकाळ असे म्हटले जाते.

## पूर्व वेदकाळ

**सामाजिक जीवन:** पूर्व वेदकाळात कुटुंब हाच समाजाचा मुख्य घटक होता. वडील हे कुटुंब प्रमुख असत. समाजात अविभक्त कुटुंब पद्धती रूढ होती. युद्धामध्ये आपण जिंकलेल्या सैनिकांना दास, गुलामासारखे वागवत होते. आर्यांना सोम आणि सुरा नावाच्या पेयांचा परिचय होता.

**स्त्रियांचे स्थान:** या काळामध्ये स्त्रियांना मानाचे स्थान होते. त्या काळातील स्त्रिया राजकीय संस्थांमध्येसुद्धा सहभागी होत होत्या. विधवा विवाहाचे आचरण त्याकाळी होते. मुलीही वेदांचे अध्ययन करत होत्या. घोषा, अपाला, लोपमुद्रा, इंद्राणी, विश्ववरा इत्यादी तत्कालीन थोर विद्वान महिला होत. सभा, समिती अशा राजकीय संस्थामध्येही स्त्रियांचा सहभाग होता. बालविवाह, सतीची पद्धत अशा चालिरिती त्या काळात नव्हत्या.

**आर्थिक जीवन:** पशुपालन आणि शेती हे आर्यांचे प्रमुख उद्योग होते. अनेक प्रकारची धान्ये ते पिकवित असत. बार्ली, तांदूळ, मासे, मांस यांचा आहारासाठी वापर करत असत. लोखंड व इतर धातूंचा वापर करण्याचे तंत्र त्यांना अवगत होते. कापूस आणि लोकर विणणारे, सुतार, लोहार आणि कुंभार असे उद्योग करणारे कारागीर समाजात होते. शेती, वैद्य आणि पुरोहित हे व्यवसाय प्रमुख होते. परंतु कोणीही कोणताही व्यवसाय करू शकत असत. गाईना संपती (धन) असे म्हणत असत. गोधनासाठी युद्धे होत होती.

**राजकीय जीवन:** आर्य समाजाच्या प्रमुखाला 'राजन' असे म्हणत. अशतः राजन हा सर्वाधिकारी नव्हता आणि राजपद हे सुध्दा वंश परंपरेने मिळत नसे. सभा, समिती आणि 'विधाता' अशा राजकीय संस्था राज्यकारभारात महत्वाची भूमिका बजावत होत्या. राजन हा अनुभवी लोकांचा सल्ला घेऊन निर्णय घेणारा न्यायाधिश होता. युद्धात लढणे, लोकांचे जीवन, संपतीचे रक्षण आणि गोधनाचे रक्षण करणे ही राजाची कर्तव्ये होती.

**धार्मिक जीवन:** आर्य लोक इंद्र, सूर्य, सोम, वरूण, मित्र, यम, अश्विनी इत्यादी देवतांची आराधना ते करीत असत. आर्यलोक देवतांची आराधना यज्ञांच्या रूपाने करीत असत. सत्य हे एकच आहे, हे ज्याना समजले ते विविध रितीने त्याचे वर्णन करतात. विश्वाच्या सर्व बाजूनी उत्तम विचार आपल्याकडे येऊ देत. ही वेदांतील शिकवण आहे..

©KTBS Not to be republished

## उत्तर वेदकाळ

बऱ्याच शतकाच्या कालावधीनंतर सप्तसिंधु प्रदेशातील लोकसंख्या वाढली. लोकांच्या जीवन क्रमात बदल झाले. वैदिककालीन लोक टप्प्याटप्याने गंगा, यमुना नद्याच्या मैदानात स्थलांतरीत झाले. काही लोक विंद्यपर्वत ओलाडूंन दक्षिणेकडे गेले.

**राजकीय बदल:** उत्तर वेदकालीन राजन बलीष्ठ झाले. या काळात राज्यकारभारात विधाताचे अस्तीत्व पूर्णपणे नाहीसे झाले. सभा आणि समित्या यांनी आपले महत्व गमविले होते. राजानी आपल्या राज्याचा विस्तार वाढविण्यास सुरुवात केली. राजपद हे वंशपरंपरागत झाले. राजांनी आपल्या राज्याच्या विस्तारासाठी अश्वमेध, राजसूय इत्यादी यज्ञयाग करावयास सुरूवात केली.

**सामाजिक बदल :** उत्तर वेदकाळामध्ये गोत्र पद्धती सुरुवात झाली. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे चार आश्रम (चातुराश्रम) व्यवस्था सुरूवात झाली. समाजात स्त्रियांचे स्थान अत्यंत कमी झाले. स्त्रिया शिक्षणापासून वंचित झाल्या. राजकीय संस्थापासून दूर झाल्या. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा चार वर्णव्यवस्था समाजामध्ये निर्माण झाल्या. सतीची, बालविवाह इत्यादी पद्धतींना सुरूवात झाली. राजे आणि इतर उच्च वर्गामध्ये बहुपत्नीत्व प्रथा रूढ होती..


ब्रम्हचर्य


गृहस्थ


वानप्रस्थ


संन्यास

**धार्मिक जीवन:** उत्तर वेदकाळात धार्मिक आचरणांचे पालन करणे कठीण झाले. यज्ञयागांचे आचरण अधिक झाले आहुतीच्या नावाखाली दूध, तूप, धान्ये मोठ्या प्रमाणात अग्नीत अर्पण करू लागले. परिणामी आहाराची कमतरता भासू लागली. ब्रह्मा, विष्णू आणि शिव हे प्रमुख देव झाले. त्याचबरोबर लक्ष्मी, सरस्वती, पार्वती, गणेश, स्कंद इत्यादी परिवारांच्या देवदेवतांचे महत्व वाढले.

**महाकाव्ये:** भारतीयामध्ये अत्यंत लोकप्रिय अशी दोन महाकाव्ये आहेत. वाल्मिकींचे रामायण आणि व्यासांचे

©KTBS Not to be republished

महाभारत. जगातील एकूण महाकाव्यामध्ये महाभारत सर्वात मोठ आहे. या महाकाव्यानी हजारो भारतीयांचे जनजीवन, साहित्य आणि कला घडविल्या आहेत.

**नवीन शब्द :**

✻ सतीजाणे: पतीच्या निधनानंतर पत्नीने त्यांच्या चितेमध्ये उडी घेऊन आपला प्राण सोडणे.

✻ आहुती: यज्ञ, होम मध्ये देवतांना अपर्ण करावयाचे तूप, दूध, धान्य इत्यादी.

**I. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यान लिहा.**

1) चार वेद कोणते?

2) ऋग्वेद काळातील देवतांची नावे लिहा.

3) चार वर्णांची नावे लिहा.

4) वेद काळातील दोन महिला विद्वानांची नावे लिहा.

5) भारताची प्राचीन महाकाव्ये कोणती? त्यांची रचना कोणी केली?

**II. गटात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) पूर्व वेदकाळातील समाज आणि उत्तर वेद काळातील समाज यामधील फरक काय?

**III. खालील अ आणि ब यादीतील विषयाच्या जोडया जुळवा..**

| अ | ब |
|---|---|
| सोम | गणाचा प्रमुख |
| राजन | आर्यांना परिचित असलेले पेय |
| सभा | एक यज्ञ |
| अश्वमेध | रामायण |
| वाल्मिकी | राजकीय संस्था |

**कृती:**

मुलांचे सचित्र रामायण व महाभारत वाचा.

* * * * *

©KTBS Not to be republished

पाठ 6

# ख्रिस्तधर्म आणि इस्लाम धर्म

## पाठाचा परिचय

भारताला धर्म निरपेक्ष राष्ट्र असे का म्हणतात ? येथे अनेक जाती धर्मांचे लोक सहकार्याने जीवन जगतात. अशा भारतातील काही धर्मांची माहिती समजून घेऊ. मध्ययुगामध्ये युरोप आणि आशिया खंडातील अनेक घडामोडींचा भारतावर कोणताच प्रभाव पडला नव्हता. प्रामुख्याने ख्रिस्त आणि इस्लाम धर्मांचा उदय, प्रसार, पडणारा प्रभाव भारताच्या ऐतिहासिक संदर्भानुसार समजून घेणे. या पाठाम ध्ये येशुख्रिस्त आणि प्रवादी महमदांचे जीवन तसेच शिकवण याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्याबरोबरच 'रोन कॅथॉलिक चर्च' एक प्रबळ संघटना म्हणून समोर येण्यामागील पार्श्वभूमी, इस्लामिक साम्राज्याची स्थापना, अरब नागरिकांचे योगदान आणि जागतिक इतिहासावर मोंगल आणि आटोन तुर्कांचा प्रभाव याची माहिती देण्यात आलेली आहे.

## सामर्थ्य

1. येशुख्रिस्त आणि प्रवादी महमदाचा उपदेश यांचा अर्थ समजून घेणे.
2. अरब, मोगल आणि तुर्कांच्या साम्राज्य विस्ताराचा भारतावर पडलेला प्रभाव समजून घेणे.
3. ख्रिस्त आणि मुसलमान यांची पवित्र स्थळे, त्याबरोबर इतर संबंधीत स्थळे नकाशात दाखविणे.

## ख्रिस्तधर्म

आज जगामध्ये व्यापकपणे प्रचलित असलेले धर्म म्हणून ख्रिस्त आणि इस्लाम धर्मांना आपण ओळखू शकतो. त्यांचा उदय, विकास आणि त्यांचा वाढता प्रभाव आता आपण समजून घेऊ.

ख्रिस्तधर्म हा दोन हजार वर्षापूर्वीचा आहे. या धर्माचा संस्थापक येशुख्रिस्त (जीजस ख्रिस्त) आहे. 'बायबल' हा ख्रिस्त धर्माचा पवित्र ग्रंथ आहे. बायबलमध्ये येशुख्रिस्ताचा जीवनपट तसेच त्यांचे उपदेशही आहेत.

'जीजस' मराठीमध्ये 'येशु', 'ख्रिस्त' शब्दाचा अर्थ 'रक्षक'

©KTBS Not to be republished

**येशुख्रिस्ताचे जीवन:** येशुचा जन्म बेत्लम्हे मध्ये झाला. त्याच्या आईचे मेरी एंबाकेय नाव होते. तो तीस वर्षांचा झाल्यानंतर घरातून बाहेर पडून गोर-गरीबांची सेवा करण्यात गुंतला होता. दया (करुणा) हेच धर्माचे मूळ आहे. असे तो गोष्टींच्या आधारे उदाहरणे देत उपदेश करत असे.

येशुख्रिस्तांच्या अनुयायींची संख्या तसेच त्यांच्या विरोधकांची संख्या जास्त होती. उच्च वर्गीय कट्टर पंथीय हे येशुंचे विरोधक होते. येशु हा राजद्रोही असल्याचा ठपका ठेवून त्याला क्रुसावर चढविले. (त्यावेळी अपराध्यांना क्रुसावर चढवत असत.)

**उपदेश:** आम्ही सारी देवाची मुले आहोत. आम्ही सारे बंधु-भगिनी आहोत. असे येशूने सांगीतले पाप करु नये, शुद्ध जीवन जगावे असा उपदेश केला. सर्वावर प्रे करा, एका गालावर मारल्यावर दुसरा गाल पुढे करा. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असा उपदेश केला.

येशूच्या मरणानंतर त्यांच्या उपदेशांचा त्याच्या बारा परमशिष्यानी उत्साहाने प्रचार केला. त्याचा परिणाम म्हणून काही रोन साम्राज्यामध्ये ठिकठिकाणी ख्रिश्चन समुदायाचा पाया घातला गेला. त्याचवेळी ख्रिस्त धर्मीयांचा अनेक रितीनी छळ करण्यात आला पण काही कालावधीनंतर रोन साम्राज्याने ख्रिश्चन धर्माला मान्यता दिली.

काही कालावधीनंतर इटलीतील रो हे शहर ख्रिस्तांचे मुख्य केंद्र म्हणून उदयाला आले. तेथील पोप हा त्याचा प्रमुख झाला. पोपच्या आधिकाराखाली युरोप आणि जगाच्या इतर भागात ख्रिश्चन धर्माच्या प्रचारकानी भेट देऊन धर्मप्रचार केला. कालानुक्रमे रोन कॅथॉलिक चर्च एक प्रबळ संघटना म्हणून उदयास आली. त्याबरोबरच पोप गुरुंचे आर्थिक आणि राजकीय वर्चस्व वाढले.

**कृती:** शांतीदूत येसुख्रिस्ताना क्रुसावर चढविले हे पाप कृत्य होते. याबद्धल मित्राबरोबर चर्चा करुन तुचा अभिप्राय लिहा.

## इस्लाम धर्म

महंद पैगंबर हा इस्लाम धर्माचा संस्थापक होय. त्यांचा जन्म अरब देशातील मक्का या शहरात झाला.

पैगंबर म्हणजे देवाचा संदेश सांगणारा : प्रवादी.

इस्लाम धर्माच्या उदयापूर्वी अनेक लहान सहान जमाती होत्या. त्यांच्यामध्ये

©KTBS Not to be republished

एकी नव्हती. मक्का येथील काबा हे एक मोठे यात्रा क्षेत्र होते. तेथे मूर्तींची पूजा केली जात असे.

**प्रवादी महंदाचे जीवन:** महंदाच्या वडीलांचे नाव अब्दुल्ला व आईचे नाव अमिना असे होते. महंदांच्या जन्मापूर्वीच त्यांचे वडील वारले. सुरुवातीला त्यांच्या लहान काकानी त्याला व्यापारात घेतले. पुढे खदिजा नावाच्या श्रीमंत विधवेने त्यांना स्वतःचा व्यापार प्रतिनिधी म्हणून नेले. महंदाची सरलता आणि प्रामाणिकता पाहून तिने त्याच्याशी लग्न केले.

आपल्या वयाच्या 40 व्या वर्षापासून महंद प्रार्थना आणि ध्यानधारणेत मग्न राहायचा. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा देवाचा संदेश सांगायला सुरुवात करायचा. असेच दिव्य संदेश एकत्र करुन 'कुराण' हा इस्लामांचा मूळ ग्रंथ तयार झाला. तो अरेबिक भाषेत आहे.

'इस्लाम' शब्दाचा अर्थ 'शरणागती', 'मुस्लीम' म्हणजे 'देवाला शरण आलेले.

काळानुसार प्रवादींच्या अनुयायांची संख्या वाढली. महं दाने त्या काळातील धार्मिक आचार विचारावर टीका केली. त्यामुळे विरोधकांची संख्यासुध्दा वाढली. त्यामुळेच त्यांना मक्का येथून मदिना शहराला जावे लागले. प्रवादी हे मक्का येथून मदिनेला गेलेल्या वर्षा पासुनच मुसलमानांचे 'हिजरी' शक सुरु झाले.



काबा - मुसलमानांचे पवित्र क्षेत्र, मक्का

©KTBS Not to be republished

मदिनतील लोकांनी महंदाचे स्वागत केले. पुढे त्यांनी मक्का येथे आक्रमण करुन ते जिंकून घेतले आणि त्याच्या शत्रुंना क्षमा केली. त्यांच्यात असलेले मतभेद मिटविले थोड्याच काळामध्ये संपूर्ण अरब देशात इस्लाम धर्माचा प्रसार झाला.

## इस्लाम धर्माचा उपदेश

- अल्लाला सोडून दुसरा देव नाही. महंद हा देवाचा प्रतिनिधी आहे. देवाला कोणत्याही मुर्तीच्या रुपात पुजू नये.
- प्रत्येक मुसलमानाने देवाचा सेवक झाले पाहिजे. प्रामाणिक राहिले पाहिजे. सगळे मानव समान आहेत.

व्यापाऱ्यानी फसवणूक करु नये. व्याजाने पैसे देण्याचा व्यवहार करु नये. शिशुहत्या करु नये, डुक्कराचे मांस खाऊ नये आणि मद्यपान करु नये.

- प्रत्येक मुसलमानाने दिवसातून पाच वेळा क्यूबाच्या दिशेला तोंड करुन प्रार्थना (नमाज) करावी. रमजान महिन्यात दिवसा उपवास करावा. श्रीमंतानी गरीबांना न चूकता दान (जकात) करावे. साध्य असेल तर आयुष्यात एकदा 'हाज' (मक्का) यात्रा करावी.

**कृती:** ख्रिश्चन आणि इस्लाम धर्माचा उपदेश कोणता ? त्यामधील साम्य व फरक यांची यादी करा.

## तुम्हाला माहित असू दे.

बेत्लम्हे : जेरुसले जवळील एक लहान शहर. आता ते इस्त्रायलचा एक प्रदेश आहे. येसू हा यहुदी (हिब्रू) चा पुत्र होता.

## उत्तरे द्या.

1 येशुख्रिस्ताचा जन्म कुठे झाला ? त्याच्या आईचे नाव काय ?

2 ख्रिश्चन धर्माचा मुख्य ग्रंथ कोणता ?

3 येशुख्रिस्ताचे मुख्य उपदेश कोणते ते सांगा ?

4 महंद पैगंबर यांचा जन्म कोठे झाला ? इस्लाम धर्माचा प्रमुख ग्रंथ कोणता?

5 प्रवादी महंदाचे मुख्य उपदेश कोणते ?

©KTBS Not to be republished

## उपक्रम

1 बायबलमधील दृष्टांत कथा वाचा.

2 येशुख्रिस्ताचे जीवन चरित्र मिळवून वाचा.

3 कुराणचे पठण ऐका.

4 प्रवादी महंदाचे जीवन चरित्र मिळवून वाचा.

5 नकाशावर ख्रिस्त आणि इस्लाम धर्माशी संबंधीत स्थळे ओळखा.

*****

©KTBS Not to be republished

पाठ 7

# नवीन धर्माचा उदय

## पाठाचा परिचय

सुमारे 2500 वर्षापूर्वी वैदिक विचारसरणी मध्ये अनेक वेगवेगळे विचार पुढे आले. गौतम बुद्ध आणि महावीर हे दोघे अशा नवीन विचार सरणीचे उद्गाते होत. त्यांचे जीवन आणि त्यांची शिकवण याची माहिती येथे दिली आहे. त्याच बरोबर त्यांच्या काळातील सिंधू व गंगा नद्यांच्या खोऱ्यातील सोळा महाजनपद (राजतंत्र) आणि काही गणराज्य (गणतंत्र) कशा प्रकारे कार्यरत होती. याचे विवरण केलेले आहे.

## सामर्थ्ये

1) नवीन धर्माच्या उदयाची कारणे समजून घेणे.
2) गौतम बुद्ध आणि महावीर याचे जीवन चरित्र समजून घेणे.
3) गौतम बुद्ध आणि महावीर यांची शिकवण (उपदेश) याचा अर्थ समजून घेणे.
4) बौध्द आणि जैन धर्माची तत्वे किती प्रमाणात आजही उपयुक्त आहेत हे समजून घेणे.
5) हजारो वर्षापासून आस्तित्वात असलेल्या गणराज्य परंपरांचा गौरव करणे.

## नवीन धर्मांचा उदय का झाला?

उत्तर वैदिक काळात यज्ञ-याग इत्यादी वैदिक आचरणाच्या नावाखाली शेतीला उपयुक्त अशा अनेक प्राण्यांची हत्या करत असत. त्यामुळे आहार धान्याच्या उत्पादनात घट झाली. त्याशिवाय यज्ञ-यागामध्ये आहार धान्य, दूध, तूप याचे हवन करा असे सांगण्यात येत होते. याचा परिणाम म्हणून आहार धान्याची कमतरता भासू लागली.

तर दुसरीकडे यज्ञ-याग इत्यादी वैदिक आचरणामुळेच मुक्ती मिळणे शक्य आहे. अशी भावना दृढ झाली. पण या सर्वांचे आचरण करणे सर्व सामान्य लोकांना साध्य नव्हते. हे आचरण संस्कृत मंत्रांचे पठण करून केले जायचे. संस्कृत ही पुरोहितांची भाषा असल्याने ती सर्व सामान्य लोकांना समजत नव्हती सर्व सामान्य लोकांच्या भाषेमध्येच सोप्या मार्गाने मुक्ती मिळवून देणारा नवीन धर्म असावा अशी लोकांची अपेक्षा होती.

©KTBS Not to be republished

आणखी दुसरीकडे उत्तर वेदकाळामध्ये वर्ण व्यवस्थेमुळे सामाजिक विघटनांना सुरूवात झाली. यामुळे समाजात तारतम्य राहिले नाही. समाजामध्ये ब्राह्मण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरोहित वर्गाला बऱ्याच सवलती होत्या. याच काळात क्षत्रियांचे प्राबल्य वाढण्यास सुरूवात झाली. याचाच परिणाम म्हणून नंतरच्या काळात अनेक गणराज्ये उदयास आली. या गणराज्यांचे क्षत्रिय, अनेक सवलती लाभलेल्या ब्राह्मणांच्याप्रती नवीन धर्मांचे उदय होण्यास कारणीभूत ठरले.

या सर्वांच्या परिणामाने 2600 वर्षापूर्वी गंगा नदीच्या खोऱ्यात सुमारे 62 नवीन धर्मांचा उदय झाला. यामध्ये जैन धर्म आणि बौद्ध धर्म प्रमुख होत. बौद्ध धर्माचे संस्थापक गौतम बुद्ध तसेच जैन धर्माचे संस्थापक वर्धमान महावीर हे दोघेही गणराज्यांचा कुळातील क्षत्रिय होते.

## बचैद्ध धर्म


गौतम बुद्ध

गौतम बुद्धानी स्थापन केलेला धर्म म्हणजेच बौद्ध धर्म होय. याची स्थापना सुमारे 2500 वर्षापूर्वी झाली.

**बुद्धाचे जीवन:** गौतम बुद्धाचा जन्म नेपाळ मधील कपिलवस्तू जवळील लुंबिनी येथे झाला. त्याचे बालपणीचे नाव सिद्धार्थ असे होते. त्यांचे वडील सिद्धोदन हे शाक्य गणराज याचे प्रमुख होते. आईचे नाव मायादेवी असे होते. सिद्धा- र्थच्या पत्नीचे नाव यशोधरा व मुलाचे नाव राहुल असे होते.

एकदा बालपणीच सिद्धार्थला पाहून असित नावाच्या महर्षींनी, हा बालक सर्व लोकांचा राजा होईल. शिवाय लोकांचे दु:ख निवारण करणारा संन्यासी होईल असे भविष्य वर्तविले होते. या महर्षींने सांगितलेली ही भविष्य वाणी ऐकून त्यांचे वडील सिद्धोदन यानी आपला मुलगा राजा व्हावा म्हणून सिद्धार्थला दु:ख, वैराग्य यांचा संबंध येणार नाही. अशा सुख समाधानाच्या वातावरणात सिद्धार्थला वाढविले. परंतु सिद्धार्थचे मन अशांतच होते.

एकदा शहराची प्रदक्षिणा घालताना त्यांना एक वृद्धमाणूस, एक रोगी, एक संन्यासी तसेच प्रेतयात्रा त्यांच्या दृष्टीस पडली. या चार घटनांनी त्यांच्यातील वैराग्य जागवून, दु:खाचे मूळ शोधण्याची प्रेरणा दिली.

©KTBS Not to be republished

एके दिवशी रात्री सिद्धार्थ कोणालाही न सांगता आपले कुटुंब आणि राजवाडा सोडून घोड्यावरून निघाला. दुःखाच्या निवारणासाठी अनेक गुरुना भेटून त्यांचे मार्गदर्शन मिळविले. परंतु दुःखाचे मूळ कारण काय आहे याचे उत्तर त्यांना मिळाले नाही. शेवटी बिहार मधील गया येथे पोहोचला. तेथे एका वृक्षाखाली बसून अनेक दिवस ध्यान धारणा केली. शेवटी तेथेच त्याना ज्ञानप्राप्ती होऊन सिद्धार्थ हा 'बुद्ध' झाला. बुद्ध म्हणजे ज्ञानी, जाणणारा असा त्याचा अर्थ होतो. बुद्धानी ध्यान केलेले हे स्थळ बुध्दगया म्हणून प्रसिद्ध आहे.

बुद्धानी उत्तर प्रदेशातील वाराणसी जवळील सारनाथ येथे आपल्या पाच शिष्याना पहिला उपदेश केला. या घटनेला 'धर्मचक्र प्रवर्तन' असे म्हणतात. तेथून पुढे त्यानी बिहार आणि सभावेतालच्या प्रदेशात चाळीस वर्षे फिरून लोकांना उपदेश केला. बुद्धांची किर्ती सर्वत्र पसरली. अनेक राजामहाराजानी त्यांचा गौरव केला. शेवटी बुद्धानी बिहार मधील कुशीनगर येथे देहत्याग केला.

## बुद्धांचे उपदेश

शुद्ध जीवन आणि चिंतन यांच्या सहाय्याने ज्ञान प्राप्ती करून घेणे हेच बुद्धांचे ध्येय होते. बुद्धानी याला 'धम्म' असे म्हटले आहे. जग प्रचंड दुःखाने भरले असून, आशा हेच दुःखाचे मूळ आहे. आशेवर जे विजय मिळवतील त्याना मोक्षप्राप्ती होईल. दुःख निवारणासाठी त्यानी उत्तम जीवन, उत्तम संकल्प, उत्तम भाषा, उत्तम कार्य इत्यादी आठ मार्ग सुचविले. या मार्गाना 'अष्टांग मार्ग' असे म्हणतात.

बुद्धाच्या जीवनातील चार महत्वाचे घटक महापरित्याग, ज्ञानोदय, धर्मचक्र प्रवर्तन व महानिर्वाण हे होत. बुद्धाची मूळ शिकवण म्हणजे चार आर्य सत्य व अष्टांगमार्ग होय. चार आर्य सत्य पुढील प्रमाणे आहेत. 1) जग हे दुःखमय आहे 2) आशा हेच दुःखाचे मुळ आहे, 3) आशेवर विजय मिळवून दुःखातून पार होऊ शकतो. 4) अष्टांग मार्ग हा दुःख दूर करण्याचा मार्ग आहे. सिद्धार्थ हे गौतम बुद्ध, तथागत 'शाक्यमुनी' या नावानीही ओळखले जातात.

©KTBS Not to be republished

या शिवाय बुद्धानी आपल्या अनुयायाना हिंसा, मद्यपान, भ्रष्टाचार न करणे, खोटे न बोलणे असा उपदेश केला. बुद्धांचे उपदेश सरळसोपे असल्यामुळे लोकप्रिय झाले. कारण त्यानी आपले उपदेश लोकांची बोली भाषा असलेल्या पाली भाषेमध्ये सांगितले. त्यानी केलेले उपदेश त्याच्या अनुयायानी तीन पिटकामध्ये संग्रह केला. ते म्हणजे विनय पिटक, सुत्त पिटक आणि अभिदम्म पिटक हे होय. बुद्धांच्या पवित्र अशा या ग्रंथाना त्रिपिटक असे म्हणतात.

सिद्धार्थनी राजवाडा सोडण्याचे नदी विवाद हे आणखी एक कारण होते. अशी माहिती आहे. दोन राज्यांच्यामधे नदीच्या पाण्याच्या वाटपावरून विवाद होऊन सिद्धार्थच्या सल्लागारानी युद्धाला तयार राहण्यास सांगितले. हे सिद्धार्थला पटले नाही. त्याला विरोध करुन त्याने राजवाडा सोडला असे सांगतात. ही डॉ. आंबेडकराच्या पुस्तकातील माहिती आहे.

**किसागोतमी :** किसा गोतमीने आपला प्रिय लहान मुलगा गमावला होता. तिला इतके दु:ख झाले होते की ती आपल्या मुलाचा मृत देह घेऊन गल्लोगल्ली फिरून आपल्या मुलाला पुन:र्जिवित करा असा आक्रोश करत होती. तिचे हे दु:ख पाहून एका दयाळू व्यक्तिने तिला बुद्धांच्या कडे घेऊन गेला. बुद्धानी तिला सांगितले तुझ्या मुलाला मी पुन:र्जिवित करीन पण तुला मोहरी आणावी लागेल. पण ती अशा घरातील की ज्या घरात कोणाचाही मृत्यू झाला नाही.

बुद्धाचे आश्वासन ऐकून आनंदाने बेभान झालेल्या किसा गोतमीने गावामध्ये मृत्यू न झालेल्या घराचा शोध घेण्यास सुरूवात केली. प्रत्येक घरामध्ये एक नाही तर दुसरा, वडील, आई, बहीण, भाऊ, पत्नी, मुलगा, मामा, आत्या, आजोबा, आजी, असे कोणीतरी मरण पावलेच होते.

**- किसा गोतमीला बुद्धानी दिलेला संदेश कोणता?**

बुध्दानी ग्रंथाची रचना केली नाही. त्यानी केलेले उपदेश त्यांच्या शिष्यानी स्मरणात ठेऊन एकमेकाकडून दुसऱ्याकडे जतन झाले. बुध्दांच्या उपदेशाचा प्राचीन ग्रंथ म्हणजे 'सुत पिटक' होय. हा पाली भाषेत आहे.

© KTBS Not to be republished

## जैनधर्म


महावीर

**महावीरांचे जीवन:** 24 वे तीर्थंकर असलेल्या महावीरांनी जैन धर्माचा प्रचार केला. महावीरांचा जन्म वैशाली शहराजवळील कुंद या गावी. सुमारे 2500 वर्षापूर्वी झाला. त्यांचे बालपणीचे नाव वर्धमान असे होते. त्यांचे वडील सिद्धार्थ हे एक जमातीचे (कुळ) प्रमुख होते. त्यांचा आईचे नाव त्रिशलादेवी असे होते. वर्धमानने दिव्यज्ञान प्राप्त करण्यासाठी घरातून बाहेर पडले. त्यानी काही काळ सर्वस्व त्याग करून दिगंबर मुनी म्हणून संचार केला. त्यानंतर बारा वर्षे तपश्चर्या करून दिव्य ज्ञान अखेर प्राप्त केले. लोक त्याना 'जीन' म्हणू लागले. जीन म्हणजे मोहावर विजय मिळविलेला असा त्याचा अर्थ होतो. त्यांचे अनुयायी हेच जैन होत. महावीरांनी सर्व वर्गातील लोकांना उपदेश केला. बिहारमधील पावापुरी येथे त्यानी देहत्याग केला.

**महावीरांची शिकवण:** वर्धमान महावीरांनी हिंसा, चोरी, संपत्तीचा संग्रह करू नये, खोटे बोलू नये असा उपदेश आपल्या अनुयायांना केला. त्याच बरोबर ब्रह्मचर्याचे पालन करण्यास सांगितले. अहिंसेला इतर कोणत्याही धर्मापेक्षा अधिक महत्व जैन धर्माने दिले आहे. महावीरांची शिकवण ही 23 वे तीर्थंकर पार्श्वनाथ याच्या शिकवणीचा भाग होता.

पुढे जैन धर्मामध्ये श्वेतांबर आणि दिगंबर असे दोन पंथ उदयास आले. पांढरे वस्त्र परिधान करणाऱ्या पार्श्वनाथाच्या अनुयायाना श्वेतांबर आणि अंगावर वस्त्र न वापरणाऱ्या महावीरांच्या अनुयायांना दिगंबर असे म्हणून ओळखू लागले. कर्नाटकातील श्रवणबेळगोळ हे जैनांचे प्रसिद्ध धार्मिक केंद्र बनले आहे.

जैन धर्मामध्ये 5 नैतिक तत्वे आहेत : अहिंसा, सत्य, अस्तेय, (चोरी न करणे), अपरिग्रह (आवश्यकतेपेक्षा अधिक संग्रह न करणे) आणि ब्रह्मचर्य (इंद्रियाना स्वतः च्या ताब्यात ठेवणे).

©KTBS Not to be republished

## महाजनपदे आणि गणराजे

**महाजनपदे :** आता आपण 2500 वर्षापूर्वी काळात जाऊया. तो बुद्धांचा काळ होता. त्या काळात सिंधू-गंगा या नद्यांच्या खोऱ्यात 16 लहान मोठी राज्ये होती. बौद्धांच्या साहित्यात त्याना महाजनपदे असे म्हटले आहे. त्यामध्ये मगध, कोसल आणि वत्स ही प्रमुख महाजनपदे आहेत. येथे राजे राज्य करीत असत.

**गणराज्ये:** याच काळात अनेक राज्यांमध्ये लोकप्रतिनिधी राज्याचा राज्यकारभार चालवित होते. त्याना गणराज्य असे म्हणत होते.

गणराज्यामध्ये वज्जी (वैजी) हे प्रमुख गणराज्य होते. या गणराज्यामध्ये अनेक लहानमोठ्या गणराज्यांचा समावेश होऊन ते एक गणराज्य बनले होते. बिहारमधील वैशाली शहर ही त्याची राजधानी होती. वज्जी या गणराज्याच्या सर्व लहान थोर सदस्यांची एक सभा बनवून ती सभा या गणराज्याचा कारभार चालवत होती. या सभा सदस्याना राजा म्हणून संबोधले जात असे. सभेमध्ये गणराज्यातील सर्वांच्या संबधित प्रमुख प्रश्नांवर चर्चा करीत असत. भारतामध्ये अशा प्रकारची गणराज्ये एक हजार वर्षापेक्षा अधिक काळ अस्तित्वात होती.

### नवीन शब्द

वैराग्य : प्रापंचिक जीवनातील सर्व आशा-आकाक्षांचा त्याग करणे.

दिगंबर : सर्व दिशांनाच आपली वस्त्रे मानणारे.

मोक्ष : जन्म मरणाच्या फेऱ्यातून पार होणे.

### हे तूला माहित असू दे

1) जैन आणि बौद्ध धर्माच्या उदयाने यज्ञ-यागामध्ये पशू-बळीची पद्धत बंद पडली. त्याचबरोबर शाकाहारी आहाराचे महत्व वाढले.

2) बौद्ध धर्मामध्ये हीनयान व महायान असे दोन पंथ आहेत.

©KTBS Not to be republished

**I योग्य शब्दांचा वापर करून रिकाम्या जागा भरा.**

1) गौतम बुद्धाचा जन्म ____________ येथे झाला.

2) बुद्धानी आपला उपदेश ____________ या भाषेत सांगितला.

3) जीन म्हणजे ____________ वर विजय मिळविलेला होय.

4) ____________ हे जैन धमाचे 23 वे तीर्थंकर होय.

5) जैन धर्मात पांढरे वस्त्र परिधान करणारे हे ____________ पंथाचे होय.

**II खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

1) गौतम बुद्धांचा जन्म कोठे झाला?

2) गौतम बुद्धाच्या आई-वडिलांचे नाव काय?

3) गौतम बुद्धानी आपला पहिला उपदेश कोठे केला?

4) धर्मचक्र प्रवर्तन म्हणजे काय?

5) महावीरांचा जन्म कोठे झाला?

6) महावीरांच्या आई वडिलांचे नाव काय?

7) महावीरांची शिकवण कोणती?

8) जैन धर्माचे दोन पंथ कोणते?

9) प्राचीन भारतातील प्रमुख गणराज्ये कोणती?

**III गटात चर्चा करून उत्तरे लिहा.**

गौतम बुद्धांची शिकवण

©KTBS Not to be republished

**IV खालील अ यादी ब यादीतील विषयांच्या जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| गौतम बुद्ध | गणराज्य |
| महावीर | बुद्धांचे प्रवित्र ग्रंथ |
| वज्जी | जैनांचे धार्मिक केंद्र |
| श्रवणबेळगोळ | बौद्ध धर्माचे संस्थापक |
| त्रिपिटक | जैन धर्माचे संस्थापक |

**कृती**

1) तुमच्या आजूबाजूच्या परिसरातील जैन बस्तीबद्धल माहिती मिळवा.

2) जैन बस्तींची चित्रे माहितीसह संग्रहीत करा.

* * * * *

©KTBS Not to be republished

| पाठ 8 | # उत्तर भारतातील प्रमुख राज्य धराणी |
|---|---|

## पाठाचा परिचय

मौर्य साम्राज्य हे भारततील पहिले ऐतिहासीक साम्राज्य होय. या साम्राज्याचे विविध क्षेत्रातील योगदान अद्वितीय आहे. चंद्रगुप्त मौर्य व सम्राट अशोक हे या साम्राज्याचे श्रेष्ठ राजे होय. त्यांचे जीवन व कामगिरी यांचे या पाठात वर्णन केलेले आहे. कुशाण घराण्याचा प्रसिद्ध राजा कनिष्काची कामगिरी याचेही वर्णन केलेलेआहे. त्यानंतर गुप्त घराण्याचा श्रेष्ठ राजा समुद्रगुप्ताचा दिग्वीजय तसेच दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळातील विविध क्षेत्रातील अद्‌भूत कामगिरी याचेही वर्णन आहे. हर्षवर्धनाने संकटकाळीसुद्धा साम्राज्याचे केलेले रक्षण आणि बौद्धधर्माच्या वृद्धीसाठी केलेले कार्य याचा परिचय करून दिलेला आहे.

## सामर्थ्ये:

1) मौर्य घराण्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य तसेच त्याचे गुरु चाणक्य (कौटिल्य) यांच्याविषयी समजून घेणे.
2) सम्राट अशोक मौर्य याचे जीवन व कारकीर्द याबदल समजून घेणे.
3) मौर्य राज्याच्या राज्यकारभाराविषयी माहिती मिळविणे.
4) कुशाण घराण्यातील श्रेष्ठ राजा कनिष्क याच्या जीवन कार्याविषयी माहिती मिळविणे.
5) मौर्य व कुशाण यांनी कला, शिल्प व वास्तुशिल्प कला या क्षेत्रात दिलेले योगदान समजून घेणे.
6) गुप्त घराण्याचा श्रेष्ठ सम्राट समुद्रगुप्त आणि दुसरा चंद्रगुप्त यांच्या कार्याची प्रशंसा करणे.
7) गुप्तांच्या काळाला सुवर्णकाळ असे का म्हणतात त्याची कारणे समजून घेणे.
8) फाहीयान आणि हयु-एन-त्संग यांच्या नजेरतून भारताकडे पाहणे.
9) हर्षवर्धनची कामगिरी व देणगी समजून घेणे.

©KTBS Not to be republished

## मौर्य


तिरंगा झेंडा

मुलांनो आपल्या राष्ट्रध्वजामध्ये एक चक्र आहे. त्याचे नाव काय माहीत आहे का? हो तेच अशोक चक्र. प्रगतीचे, विकासाचे बोधचिन्ह म्हणून त्याचा उपयोग आपल्या राष्ट्रध्वजात केलेला आहे. पण हा अशोक कोण? तो कोणत्या राज घराण्यातील आहे? त्या घराण्याचा इतिहास काय आहे? अशोकाची देणगी कोणती? याविषयी माहिती मिळवूया.

भारतातील पहिले ऐतिहासिक साम्राज्य म्हणजे मौर्य साम्राज्य होय. या साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य होय.




©KTBS Not to be republished

## अशोकाचे साम्राज्य

### चंद्रगुप्त मौर्य

चंद्रगुप्त मौर्य हा एक साहसी युवक होता. तक्षशिला येथील विष्णुगुप्त हा नंद वंशाचा राजा असलेल्या धनानंद याकडून अपमानीत झाला. चाणाक्ष, कुटील तंत्रात निपुण असलेल्या विष्णुगुप्ताला चाणक्य, कौटील्य अशीही नावे होती. त्यामुळेच चंद्रगुप्त मौर्याला सैनिक आणि युद्धनितीचे प्रशिक्षण देऊन सैन्यानिशी सज्ज केले.या काळात धनानंदने प्रजेचा विश्वास गमावेलला होता.

त्यामुळे चंद्रगुप्त मौर्याने धनानंदाला सहजपणे पराजित करून सिंहासनावरून खाली उतरवले. अशाप्रकारे 2300 वर्षापूर्वी मौर्य साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्याने केली. पाटलीपुत्र (सध्याची बिहारची राजधानी पाटणा) ला आपल्या राज्याची राजधानी बनविली. त्यानंतर भव्य अशा सैन्याची उभारणी करून वायव्य भारताकडे कूच केली. मॅसिडोनियाचा राजा अलेक्झांडरने याअगोदर जिंकलेल्या या प्रदेशावर त्याचा प्रतिनिधी सेल्युकस कारभार चालवत असे. चंद्रगुप्त मौर्याने सेल्युकसचा दारूण पराभव केला. त्यामुळे सेल्युकसने चंद्रगुप्ताबरोबर शांतीचा करार केला व अफगाणिस्तान, बलुचिस्थान तसेच सिंधचा पश्चिम प्रदेश चंद्रगुप्ताला देऊन आपल्या मुलीचे लग्न चंद्रगुप्ताबरोबर लावून दिले. चंद्रगुप्ताने या बदल्यात सेल्युकसला युद्ध कौशल्यात प्रविण असलेले 500 हती दिले. सेल्युकसने आपला अधिकारी मेगस्थॅनिस याला आपला प्रतिनिधी म्हणून चंद्रगुप्ताच्या दरबारात ठेवले. मेगॅस्थनिसने त्याकाळातील भारतीय परिस्थितीचा अभ्यास करून 'इंडिका' नावाचा ग्रंथ लिहीला.

विष्णुगुप्त अथवा कौटील्य हा चंद्रगुप्त मौर्याचा प्रधानमंत्री म्हणून काम पाहु लागला. त्यांनी लिहीलेल्या अर्थशास्त्र या ग्रंथातून राज्यकारभार कसा करावा व राजाचे गुण व वर्तन याबदलची मार्गदर्शक सुची आहे. लोकप्रसिद्ध असलेला हा ग्रंथ म्हैसूर येथील ओरीएंटल ग्रंथालयामध्ये हस्तप्रति संग्रहालय मध्ये सर्वप्रथम सापडला. हा ग्रंथ आर. शामशास्त्री या विद्वानाने शोधून काढला.

चंद्रगुप्त मौर्याने जैन धर्म स्वीकारला. आपल्या शेवटच्या काळात आपला मुलगा बिंदुसार याला गादीवर बसवून जैन मुनीबरोबर कर्नाटकाला आला. सध्याच्या हासन जिल्ह्यातील श्रवणबेळगोळ येथे सल्लेखन व्रत स्वीकारून देहत्याग केला. बिंदुसारने सुमारे 25 वर्षे राज्यकारभार सांभाळला.

©KTBS Not to be republished

## सम्राट अशोकं

बिंदुसार नंतर त्याचा मुलगा अशोक गादीवर आला. जगाच्या इतिहासात त्याला विशेष असे स्थान आहे. सर्व प्रजा मला माझ्या मुलासमान आहे. याप्रकारे प्रजेचे पालन करण्यास प्राधान्य देणारा पहिला राजा होय.

**अशोकाचे शिलालेखं:** सम्राट अशोकाच्या काळामधील त्याच्या राज्यकारभाराची, गौरवाची, जीवनकार्याची माहिती देणारे शेकडो शिलालेख संपूर्ण भारत देशात उत्खननात सापडले आहेत. त्याचे शिलालेख प्रामुख्याने ब्राह्मलिपी आणि प्राकृत भाषेत सापडले आहेत. कर्नाटकातील 9 ठिकाणी 17 शिलालेख सापडले आहेत. त्यापैकी रायचूर जिल्ह्यातील मस्की शिलालेख प्रमुख आहे. कारण या शिलालेखात सर्वप्रथम अशोकाचे नाव दिसून आले. आतापर्यंतच्या शिलालेखात देवानांप्रिय, प्रियदर्शी एवढाच मजकूर होता. मस्कीच्या शिलालेखात देवानाप्रिय, प्रियदर्शी अशोक असे लिहीलेले आहे. अशोकाच्या शिलालेखावरून त्याचे जीवन कार्य, साम्राज्याची व्याप्ती इत्यादी अंश समजून घेऊ शकतो.

© KTBS Not to be republished



अशोकाची भव्य शिलामूर्ती, कनगनहळ्ळी



अशोकाचे शिलालेख, सन्नती

## तुम्हाला माहित असू दे.

आतापर्यंत 180 वर्षा पूर्वी जेम्स प्रिन्सेप या ब्रिटिश अधिकाऱ्याने सर्वप्रथम अशोकाचे शिलालेख वाचले. त्यापूर्वी ते कोणी वाचले नव्हते. सहा शतकापूर्वी दिल्लीचा सुलतान फिरोज शहा तुघलक याने अशोकाचे शिलालेख वाचण्याचा प्रयत्न केला पण अयशस्वी झाला.

**कलिंगचे युध्द :** अशोक अधिकारावर आल्यानंतर आठव्या वर्षी कलिंग राजावर आक्रमण केले. ही त्याच्या जिवनातील महत्वाची घटना होती. कलिंग राज्य आताच्या ओडीसा राज्यात आहे. युध्दात एक लाख लोकानी प्राण गमावले. एक लाख लोक जखमी झाले. दीड लाख शत्रू सैनिक बंदी केले. रणांगणातील भीषण दृष्य अशोकाच्या मनाला लागले. तेव्हा पासून अशोकने युध्द करणार नाही असा निश्चय केला. अशा प्रकारचे मन परिवर्तन झालेला दुसरा राजा जगाच्या इतिहासात नाही. युध्द मार्गाच्या बदली धर्म मार्गाचा स्वीकार केलेल्या सम्राट अशोकाला महाशय म्हणून गौरविले.





**युद्धाच्या प्रसंगाचे दृष्य असलेल्या शिला (कनगनहळ्ळी)**

**उपक्रम :** कर्नाटकामध्ये अशोकाचे शिलालेख सापडलेल्या स्थळांची यादी तयार करा.

**धर्म प्रसार :** अशोक बौद्ध धर्माकडे आकर्षित होऊन त्याने त्या धर्माचा स्वीकार केला. बौद्ध धर्माचा प्रसार व संदेश त्याने प्रजेपर्यंत पोहोचविला. थोरा मोठ्यांचा, गुरुजनांचा आदर करणे, आई वडिलाना देवासमान मानून त्यांची पूजा करणे, सत्य, करूणा, औदार्य अंगी बाणवावे. हिंसा, क्रोध, मत्सर याना जीवनात थारा देऊ नये

©KTBS Not to be republished

असे अशोकाने सांगीतले. सम्राट अशोकने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी पाटलीपुत्र येथे भव्य बौद्ध महाअधिवेशन भरविले अनेक बौद्ध स्तूपांची निर्मिती केली. बुद्धाचा संदेश प्रसारासाठी धर्मप्रसारकांना देश-विदेशात पाठविले.

**मौर्यांची राज्यकारभार पद्धती:** राजा हाच राज्य कारभाराचा प्रमुख असे. त्याला सर्वाधिकार असत. राजाला सल्ला देण्यासाठी मंत्रीमंडळ असे. निरनिराळया विभागांचा कारभार पाहण्यासाठी उच्च दर्जाचे अधिकारी असत. 'धर्ममहामात्र' नावाचा अधिकारी विशेष धार्मिक व निती नियमांचा प्रचार करत असे. त्याचबरोबर अनाथ. विधवा स्त्रीया व वृद्धांची काळजी घेण्याचेही कार्य त्यांच्याकडे असे. राज्यकारभाराच्या सोयीसाठी विशाल साम्राज्याचे काही प्रांत केले होते. साम्राज्यात अनेक ग्राम (खेडे) असत. प्रत्येक ग्रामाच्या प्रमुखास 'ग्रामिक' असे म्हणत. ग्रामिक गावातील वरिष्ठ अनुभवी लोकांच्या सहाय्याने ग्राम राज्यकारभार पहात असे. प्रत्येक ग्रामांना स्वतः चा राज्यकारभार करण्याचे जास्तीत जास्त स्वातंत्र असे. ग्रामातील समस्या व विवाद ग्राम सभेमध्ये सोडविले जात असत. मौर्यांच्या राज्यकारभाराचा प्रभाव पुढे अनेक राज्य घराण्यांवर दिसून आला.

**वास्तू व मूर्ती शिल्प :** सम्राट अशोकांच्या काळातील स्तूप व विहार, वास्तुशिल्प व मूर्त्या आजही पहावयास मिळतात. त्यामधील स्तूप आणि विहार हे प्रमुख आहेत. अशोकाच्या काळातील मध्यप्रदेशातील सांची येथील स्तूप आणि सारनाथ येथील एकशिला स्तंभ प्रसिद्ध आहेत. सारनाथ येथील सिंहामुद्रा असलेला स्तंभ पहावयास मिळतो. ही सिंहमुद्रा म्हणजे आमचे राष्ट्रीय मानचिन्ह आहे.



अशोकाच्या काळातील शिलालेखु



सांचीचा स्तूप (मध्यप्रदेश)

©KTBS Not to be republished



अशोकाच्या काळातील, एकशिलास्तंभ



*आपले राष्ट्रचिन्ह*

© KTBS Not to be republished

## कुशाण घराणे

सुमारे 2000 वर्षापूर्वी गंधार (आताचे अफगाणिस्तान) देशामध्ये कुशाण घराणे राज्य करीत होते. काही काळ भारतातील काही भागावर त्यानी सत्ता प्रस्थापित केली. कुशाण घराण्यामध्ये कनिष्क हा प्रसिद्ध राजा होय. त्याने आपल्या शेजारील राष्ट्राविरूद्ध युद्ध करून प्रदेश जिंकला व आपला राज्य विस्तार केला. उत्तर भारतातील बिहारपर्यंत त्यांचे राज्य पसरले होते.

**कनिष्क :** कनिष्काने बौद्ध धर्माचा स्वीकार केला. तसेच त्याने अशोकाप्रमाणे अनेक स्तूप बांधले. बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी त्याने अनेक धर्मप्रचारकाना देश विदेशाना पाठविले. त्याशिवाय त्याने काश्मीर मध्ये चौथी बौद्ध धर्म परिपद भरविली. कनिष्क राजा म्हणून गादीवर बसला. त्याच्या आठवणीसाठी त्याने शक (शालीवाहन शक) वर्षाचा प्रारंभ केला. तेच आजही संपूर्ण भारत देशाचे अधिकृत कॅलेंडर आहे.




**वास्तुशिल्पकला व मूर्तीशिल्पकला:** कनिष्काने अनेक स्तूप बनविले. त्याने पुरुषपूर येथे बनविलेले (आजचे पेशावर) स्तूप तेरा मजली होते. त्याची उंची 400 फूट होती. असा भव्य स्तूप म्हणजे त्याकाळी एक आश्चर्य मानले जात असे. त्याने कनिष्कपुर नावाचे एक शहर निर्माण केले.



गांधार शैलीतील बुद्ध मूर्ती, पेशावर



कनिष्कची दगडी मूर्ती (शीर तुटलेली)

©KTBS Not to be republished

कनिष्क हा कलेचा भोक्ता होता. त्याने देश विदेशामधील अनेक कलाकारांना आपल्या दरबारात आश्रम दिला होता. त्याचा परिणाम म्हणून अनेक कला एकत्र आल्याने त्यातून गंधार व मथुरा शैली कलेचे नवीन प्रकार उदयास आले.

मथुरा येथे सापडलेल्या एका शिल्पाचे शीर नाही. पण मूर्तीच्या पायाच्या भागावर कनिष्काचे नाव कोरलेले आहे. कुशाणांच्या काळातील अनेक नाणी सापडली आहेत. कनिष्कानेच भारतात सर्वप्रथम सोन्याची नाणी चलनात आणली.

**साहित्य :** कनिष्काने विद्वान व साहित्यिकांना आपल्या राज्यात आश्रय दिला होता. कनिष्काच्या दरबारातील 'साहित्यरत्न' ही बिरूदावली प्राप्त केलेला अश्वघोष हा प्रमुख होय. त्याने बुद्ध चरित्र हा भगवान बुद्धाच्या जीवनावर आधारित ग्रंथ संस्कृतमध्ये लिहीला आहे.

नागार्जुन हा एक कनिष्काच्या दरबारात असलेला थोर तत्वज्ञानी व वैज्ञानिक होता. वसुमित्र हा एक विद्वान व काश्मीरमधील बौद्ध महासभेचा अध्यक्ष होता. चरक हा कनिष्काचा वैद्य होता.

### नवीन शब्द

* शीलालेख : दगडावरील लेखन व कोरीव काम
* स्तूप : बुद्धाच्या शरीराचे अवशेष (दात, हाडे) कलशात ठेवून त्या कलशाच्या सभोवती केलेले अर्धगोलाकृती बांधकामाची रचना.

### हे तुम्हाला माहीत असू द्या :

1. सम्राट अशोकाने आपल्या बौद्ध धर्म प्रसारकांना केवळ वेगवेगळ्या राज्यांना न पाठवता बर्मा (म्यानमार), श्रीलंका, इजिप्त, पश्चिम आशिया तसेच पूर्व युरोप या देशानाही पाठवले. अशोकाचा मोठा मुलगा महेंद्र आणि मोठी मुलगी संघमित्रा याना त्याने श्रीलंकेला पाठविले. कर्नाटकातील म्हैसूर येथे (आताचे महिषमंडल) महादेव आणि उत्तर कन्नड जिल्ह्यातील बनवासीला रक्षित नावाचे धर्म प्रचारक आले होते.
2. वास्तुशिल्प म्हणजे दगडावर कोरीव काम करून वास्तु निर्मितीची कला होय. मूर्तीशिल्प म्हणजे दगडावर कोरीव काम करून मूर्ती तयार करण्याची कला. अशोकाच्या काळात वास्तुशिल्प कलेसाठी लाकुड व वीटा यांचा वापर न करता दगडांचा वापर केला. म्हणूनच मौर्यांच्यी वास्तुशिल्प कला अजूनही पहावयास मिळते.

©KTBS Not to be republished

## I. योग्य शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.

1. सेल्युकसने चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारी आपला प्रतिनिधी म्हणून __________ याला ठेवले.
2. सर्व प्रजा ही मला माझ्या मुलासमान आहे. असे म्हटलेला सम्राट __________ होय.
3. अशोकाचे शिलालेख प्रामुख्याने __________ लिपीतील आहेत.
4. अशोकने सम्राट झाल्यानंतर __________ यासाली कलिंगशी युद्ध केले.
5. आमचे राष्ट्रीय चिन्ह __________ आहे.
6. कनिष्काने राजा म्हणून गादीवर आल्यानिमित्त __________ वर्ष सुरू केले.

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. मौर्य सम्राज्याची स्थापना कोणी केली ?
2. मौर्याच्या राजधानीचे नाव सांगा ?
3. कौटिल्याने लिहीलेल्या ग्रंथाने नाव सांगा.
4. मेगॅस्थिनीसने लिहीलेल्या ग्रंथाचे नाव सांगा.
5. सर्व प्रजा ही मला माझ्या मुलासमान आहे असे कोणी म्हटले आहे ?
6. धर्म महामात्र यांचे कार्य कोणते ?
7. कनिष्काने बौद्ध महासभेचे आयोजन कोठे केले होते ?
8. अश्वघोषने कोणते पुस्तक लिहीले ?

## III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

1. कलींग युद्धाचे महत्व वर्णन करा.

## IV. जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| अशोक | कनिष्कपूर |
| कनिष्क | बुद्धचरित्र |
| अश्वघोष | कलाकेंद्र |
| गंधार | देवानाप्रिय |

©KTBS Not to be republished

## उपक्रम

- मौर्यांची वास्तुशिल्प आणि मूर्तीशिल्प कलेच्या चित्रांचा माहितीसह संग्रह करून अल्बम तयार करा.
- कर्नाटकामध्ये अशोकाच्या काळातील शिलालेख सापडलेल्या स्थळांची नावे लिहा.

## गुप्त घराणे

मौर्यानंतर गुप्त घराने सत्तेवर आले. गुप्त हे भारताचे महत्वाचे राजधराणे होते. गुप्तांची राजधानी पाटलीपुत्र होती. या घराण्यात समुद्रगुप्त आणि दुसरा चंद्रगुप्त हे प्रसिद्ध राजे होऊन गेले.

### समुद्रगुप्त

समुद्रगुप्त हा महापराक्रमी राजा होता. त्यांच्या दिग्वीजयासंबंधी अलाहाबाद येथील स्तंभ शिलालेखावरून समजते. हा शिलालेख समुद्रगुप्ताच्याकाळातील कवी हरिशेन याने लिहीलेला आहे. त्यानुसार समुद्रगुप्ताने उत्तर भारतातील 9 राजाना हरविले होते. त्याचा पराक्रम व प्रचंड सैन्य पाहून इतर अनेक राजानी त्याच्यासमोर शरणागती पत्करली. दूरवर असलेल्या अफगाणिस्तान मधील कुशाण राजे आणि गुजरात मधील सत्रप (शक राजे) यांनी समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व मान्य केले होते.

यानंतर दक्षिण भारतात दिग्वीजय करून समुद्रगुप्ताने दक्षिणेच्या 12 राजांना युद्धात हरविले. त्यापैकी कांचीचे राजा हे एक होत. या दिग्वीजयाची आठवण म्हणून त्याने अश्वमेध यज्ञ केला.



**समुद्रगुप्त काळातील, नाणी**

समुद्रगुप्त हा विद्येचा पुरस्कर्ता होता. स्वतः महाकवी व संगीतकार होता.समुद्रगुप्ताने 'कविराज' ही पदवी धारण केली होती. तो वीणा वाजवित असलेले चित्र नाण्यावर आढळले आहे 'वसुबंधू' नावाचा एक बौद्ध विद्वान त्याचा मंत्री होता. समुद्रगुप्ताच्या काळातील सुवर्ण नाणी, गुप्त साम्राज्याचे सामर्थ्य, संपत्ती आणि वैभव दर्शन घडवितात.

©KTBS Not to be republished

## दुसरा चंद्रगुप्त

समुद्रगुप्ताचा पुत्र व उत्तराधिकारी दुसरा चंद्रगुप्त हा युद्धकलेमध्ये निपुण होता. गुजरात मध्ये 300 वर्षापेक्षा जास्तकाळ राज्य केलेल्या सत्रप राजांचा त्याने पराभव केला. अशारितीने गुजरातमधील परकीय राज्यकर्त्यांचा शेवट केला. हे त्याचे सर्वात मोठे योगदान होय. या योगदानामुळे त्याला विक्रमादित्य ही पदवी मिळाली. चंद्रगुप्त विक्रमादित्याने नवीन सोन्याची नाणी सुरू केली. त्याच्या दरबारात महाकवी कालीदास आणि इतर प्रसिद्ध विद्वान होते.



**दुसरा चंद्रगुप्ताच्या काळातील नाणी**

या काळात साम्राज्याने अर्थिक क्षेत्रातही समृद्धी साधली होती. साहित्य, मूर्तीशिल्प, वास्तुशिल्प, चित्रकला, विज्ञान आणि गणित क्षेत्रात यापूर्वी कधीच झाली नाही अशी प्रगती झाली. म्हणूनच या काळाला 'सुवर्णयुग' असे म्हणतात.

**फाहियान :** फाहियान हा चीन देशातील बौद्ध भिक्षु होता. बौद्ध धर्माची जननी असलेला भारत पाहण्यासाठी तो भारतात आला होता. इतर बौद्ध भिक्षूसोबत तो चिनपासून भारतापर्यंत चालत आला होता. तो दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळामध्ये आला होता.

भारतातील अनुभव त्याने स्वतःच्या 'फो-को-की' या पुस्तकात नमुद केले आहेत. त्यानुसार या काळात अपराधाचे प्रमाण अगदीच अत्यल्प होते. राज्यकारभार लोकाभिमुख होता. त्यामुळेच देशातील संचार सोप झाले होते.

फाहियान खूप वर्षे भारतात फिरला. त्याने बौद्ध क्षेत्रांना भेटी देऊन धर्मग्रंथ, शिल्पे, स्मारके यांचा संग्रह केला. व ते चीनमध्ये घेऊन गेला. संग्रहीत केलेल्या धर्मग्रंथांचे त्याने चिनी भोषत भाषांतर केले.

## गुप्तांचे योगदान

**संस्कृत साहित्य :** गुप्त काळामध्ये संस्कृत ही प्रमुख भाषा आणि राज्यभाषा होती. अनेक संस्कृत साहित्यिकांना राजाश्रय मिळाला होता. त्यामुळे संस्कृत साहित्याची

©KTBS Not to be republished

विशेष निर्मिती झाली. कालीदास हा गुप्तकाळातील महाकवी होय. तो जगातील एक श्रेष्ठ नाटककार होता. चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या दरबारातील श्रेष्ठ अशा नऊ विद्वान नवरत्ना पैकी कालीदास हा एक होता. कालीदासाने चार महाकाव्ये आणि तीन नाटकांची रचना केली आहे. यानी रचलेले अभिज्ञान शाकुंतल हे प्रसिद्ध नाटक होय. भारतीय साहित्य इतिहासात कालीदासाच्या साहित्यकृतीना महत्वाचे स्थान आहे. त्यांचा कवीकुलगुरू म्हणून सन्मान केला गेला होता.

'शुद्रक' आणि 'विशाखदत्त' हे या काळातील दुसरे नाटककार होत. शुद्रक ने 'मृच्छकटीक' हे नाटक लिहीले. तर विशाखदत्त याने 'मुद्राराक्षस' हे नाटक रचले विष्णूशर्माचा, पंचतंत्र हा कथा संग्रहही याच काळात रचला गेला. अमरसिंह यानी

## देवालय वास्तू शिल्प

आपल्या देशात देवालये निर्माण करण्याचा प्रारंभ गुप्तांच्या काळामध्ये झाला मध्य प्रदेशातील सांची येथील देवालय हे भारतातील अतिप्राचीन देवालय आहे. गुप्त काळातील श्रेष्ठ देवालये मध्य प्रदेशातील भितरगाव आणि 'देवगड' येथे आहेत. देवगड येथील दशावतार देवालयातील विष्णूची मूर्ती खूपच सुंदर आहे.



**दशावतार देवालय**

**स्तूप आणि लेणी :** सारनाथ येथे असलेला 128 फूट उंच असा 'धमेख' स्तूप म्हणजे गुप्त काळातील एक उत्कृष्ट निर्मिती आहे.

©KTBS Not to be republished



धमेख स्तूप

## चित्रकला

गुप्त काळातील मोठमोठ्या खडकात कोरलेले बौद्ध विहार आणि गुहा, अजंठा वेरूळ येथे आहेत. अजंठा येथील भिंतीवरील व छतावरील चित्रे जगप्रसिद्ध आहेत.



अजंठा गुहा

©KTBS Not to be republished

## विज्ञान-गणित आणि खगोलशास्त्र

गुप्तांच्या काळामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानात अपार प्रगती साधली गेली होती. पाटलीपुत्र येथील ‘आर्यभट्ट’ हा एक महान गणिती तज्ञ होता. आर्यभट्टाने लिहीलेला ग्रंथ म्हणजे ‘आर्यभटिय’, तसेच त्याने ग्रहणे कशी होतात. याच्या कारणांचा शोध घेतला. त्याने हे सर्व महान संशोधन वयाच्या अवघ्या 23 वर्षापर्यंतच केले. ब्रह्मगुप्त हा त्याकाळातील दुसरा गणिती तज्ञ होय. श्रेष्ठ खगोल शास्त्रज्ञ वराहमिहिर ही याच काळातील होय.



मिनारजवळील मेहरौली

**धातु विज्ञान :** गुप्तांच्या काळामध्ये धातु विज्ञानामध्ये उच्च प्रगती झाली होती. दिल्लीतील कुतूब मिनारजवळील मेहरौली लोखंडी स्तंभ याचे एक उदाहरण होय. हा स्तंभ सुमारे 1500 वर्षापूर्वीचा आहे. परंतु आजही तो गंजला नाही अथवा खराब झाला नाही.

**आयुर्वेदः** गुप्त कालीन वाग्भटाने ‘चरख संहिते’ तील लेखांचे संकलन केले. त्याला ‘अष्टांग हृदय संहिते’ असे म्हटले जाते. हा आयुर्वेदातील एक प्रमुख ग्रंथ म्हणून आजही अभ्यासला जातो. प्राचीन भारतात शस्त्रक्रिया ही केल्या जात असत. शल्यचिकित्सक वेगवेगळ्या प्रकारची 127 उपकरणे वापरीत असत. ते शरीरात शिरलेले लोखंडाचे तुकडे, दगड शस्त्रक्रियेने बाहेर काढत असत. पाऱ्याचा औषध म्हणून उपयोग भारतीयांनी प्रथम केला. त्याचे श्रेय भारतीय वैद्यांना जाते.

**नवीन शब्दः**

©KTBS Not to be republished

खगोलशास्त्र-ग्रह, नक्षत्र, आकाश यांचा अभ्यास करणारे विज्ञान

**तुम्हाला माहीत असू द्या.**

1. गुप्त साम्राज्य सुमारे1600 वर्षापूर्वी स्थापन झाले आणि त्यांनी सुमारे 200 वर्षे राज्य केले.

2. 'अभिज्ञान शाकुंतल' 'मालविकाग्निमित्र' व 'विक्रमोर्वशिय' ही कालीदासानी लिहीलेली नाटके होय.

3. गुप्त काळातील देवालये प्रारंभी चौकोनाकृती पायावर बांधली जात असत. देवालयामध्ये गाभारा आणि ओसरी असे भाग असत.

4. भिंतीवर काढलेल्या चित्रांना भितीचित्र असे म्हणतात. अजंठा येथील बौद्ध गुहामध्ये ही चित्रे चितारलेली आहेत. सामान्य कुंचल्याच्या सहाय्याने व स्थानिक उपलब्ध रंगानी ही चित्रे चितारलेली आहेत. शतकानुशतके या गुहा नयनमनोहर ठरलेल्या आहेत. 1819 साली या गुहांचा शोध लागला.

5. मेहरौली येथील लोखंडी स्तंभाचे वजन 6 टन आणि उंची 23 फूट आहे. 19 व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत युरोपियनाना देखील अशा प्रकारचे लोखंडी खांब बनविता आलेला नाही.

©KTBS Not to be republished

**I योग्य शब्दाचा वापर करून रिकाम्या जागा भरा.**

1. गुप्तांची राजधानी ________________ होती.
2. अलाहाबाद येथील स्तंभावर ________________ या राजाचे वर्णन आहे.
3. कविराज ही उपाधी मिळालेला गुप्तांचा राजा ________________ होय.
4. मुद्राराक्षस हे नाटक ________________ याने लिहीले.
5. कविकुलगुरू अशी पदवी लाभलेला महाकवि ________________ होय.

**II एका वाक्यात उत्तरे द्या.**

1. अलाहाबाद येथील स्तंभावरील शिलालेखावर कोणत्या राजाचे वर्णन आहे.
2. विक्रमादित्य ही पदवी कोणत्या गुप्त सम्राटाला मिळाली?
3. गुप्तांच्या काळात भारताला भेट दिलेला चिनी प्रवासी कोण?
4. कालीदास यांनी लिहीलेल्या कोणत्याही एका नाटकाचे नाव सांगा.
5. मृच्छकटिक कोणी लिहीले?
6. अमरसिंहानी लिहीलेल्या शब्दकोषाचे नाव सांगा.
7. धमेख स्तूप कोठे आहे?
8. गुप्तकाळातील प्रसिद्ध गणिती शास्त्रज्ञ कोण?
9. अष्टांग हृदय कोणी लिहीले?

**III गटात चर्चा करून उत्तरे लिहा.**

1. समुद्रगुप्ताच्या कामगिरीचे वर्णन करा.
2. संस्कृत साहित्याला गुप्तानी दिलेले योगदान वर्णन करा.

**IV जोड्या जूळवा.**

| अ | ब |
|---|---|
| कविराज | फो-को-की |
| विक्रमादित्य | खगोलशास्त्रज्ञ |
| फाहियान | समुद्रगुप्त |
| मेहरौली | दुसरा चंद्रगुप्त |
| वराहमिहीर | लोखंडी खांब |

**V उपक्रम**

1. भारतातील प्राचीन वास्तुशिल्प आणि मूर्तीशिल्पांची चित्रे जमवून माहिती जमा करा.
2. समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, विक्रमादित्य, कालीदास, आर्यभट्ट, वराहमिहीर, आणि वाग्भट यांची जीवन चरित्रे वाचा.

## वर्धन घराणे

©KTBS Not to be republished

गुप्त साम्राज्याच्या ऱ्हासानंतर उत्तर भारतामध्ये अनेक स्वतंत्र राजधराणी उदयास आली. त्यापैकी यानेश्वरचे पुण्यभूती घराणे एक होय. परंतु यापैकी वर्धन हे एकच घराणे प्रसिद्ध झाले. हर्षवर्धन हा वर्धन घराण्यातील लोकप्रिय राजा होय.

## हर्षवर्धन :

हर्षवर्धन जेव्हा सिंहासनावर आला त्यावेळी त्याचे वय 16 वर्षे होते. यावेळी त्याला टिकून राहण्यासाठी बऱ्याच समास्याना सामोरे जावे लागले. हर्षवर्धनाचे वडील प्रभाकर वर्धन यांच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ राजवर्धन गादीवर आला. बहिण राजश्री हिचा मौखरी घराण्यातील ग्रहवर्मा बरोबर विवाह झाला. माळवा घराण्यातील एका दुष्ट राजाने ग्रहवर्माला ठार मारून राजश्रीला कनोजला बंदी करून ठेवले. त्यावेळी राजवर्धनने त्यावर चाल करून माळवा सेनेचा पराभव केला. पण गौडदेशाच्या शशांकने राजवर्धनला ठार मारले. अशा संकटसमयी हर्षवर्धन गादीवर आला.




**हर्षवर्धन साम्राज्य :** विंध्यपर्वतातील अरण्यामध्ये बंदीवासातून मुक्त होउन फिरत

©KTBS Not to be republished

असलेल्या विधवा बहिणीचा शोध लावला. पुढे ग्रहवर्माच्या मौखरी राज्याला सुद्धा त्याने आपल्या अधिपत्याखाली आणले. मौखरीचे कनोज शहर हेच आपली राजधानी बनविले. त्यानंतर राजवर्धनच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या शशांकवर चढाई केली. पुढे भरपूर सेना गोळा करून काश्मीर व सिंध हे प्रांत जिंकून घेतले. दक्षिण भारतावर चढाई केली. दक्षिणमध्ये नर्मदा नदीच्या काठापर्यंत आलेल्या हर्षवर्धनाला कन्नडच्या चालुक्य घराण्यातील दुसऱ्या पुलकेशीने माघारी जाण्यास भाग पाडले. एकुणच उत्तर भारतात प्रभुत्व मिळविलेल्या हर्षवर्धनाने सुमारे 40 वर्षे राज्यकारभार चालविला. चिनी प्रवासी हयू-एन-त्संग हा हर्षवर्धनाचा अगदी जवळचा मित्र झाला होता.

**साहित्यः** हर्षवर्धन हा केवळ रसिक नव्हता. तो स्वतः एक उत्तम कवी होता. त्यानी संस्कृतमध्ये प्रियदर्शिका, रत्नावली आणि नागानंद अशी तीन नाटके रचली. हर्षवर्धनाने पंडीत व विद्वानांना आसरा दिला होता. त्यामध्ये बाणभट्ट हा प्रमुख होय. हर्षवर्धनाचे चरित्र सांगणारा 'हर्षचरित' हा ग्रंथ बाणभट्टाने लिहीला. त्याने नालंदा विद्यापिठाला उदारपणे देणग्या दिल्या.

**धर्मः** हर्षवर्धन हा सर्वधर्म समभाव जपणारा होता. म्हणजे सर्व धर्माबदल त्याला आदर होता. मूलतः शैव धर्माचा असूनसुद्धा बौद्ध धर्माला अपार महत्व दिले होते. कनोज व प्रयाग येथे दर पाच वर्षांनी धर्मसंमेलने भरविली होती.



ह्यू-एन-त्संग

### ह्यू. एन. त्संग

ह्यू-एन-त्संग (Hiuen Tsang) हा चीन देशाचा प्रसिद्ध प्रवासी होता. तो सुमारे 1400 वर्षापूर्वी भारतात आला होता. 15 वर्षापर्यंत भारतात प्रवास करून बौद्ध साहित्याचा अभ्यास केला. नालंदा विश्वविद्यालय येथे अभ्यास केला. हर्षवर्धनाच्या राज्यात बरीच वर्षे घालविली. भारतातील आपले अनुभव सि-यु-की (पश्चिमभूमीची कथा) हा ग्रंथ लिहीला (Record of western kingdom) या ग्रंथात त्याने स्वतःच्या

©KTBS not to be republished

भारतभ्रमणाचे वर्णन केले आहे. आताच्या बिहार राज्यातील नालंदा विश्वविद्यालय हे गुप्तांच्या काळापासून 600 वर्षापासून जगप्रसिद्ध होते. येथे अध्ययनासाठी जपान, चीन आणि इतर देशातून अध्ययनासाठी हजारो विद्यार्थी येत असत. येथे आठ महापाठशाळा आणि तीन बृहत (महा) ग्रंथालये होती. येथे वेद, योग,वैद्यकीय शास्त्र या विषयांचे अध्ययन होत असे. ह्यू-एन-त्संग याने या विश्वविद्यालयात अनेक वर्षे अध्ययन केले.

**माहीत असू द्या.**

नालंदा विश्वविद्यालयात शिक्षणासाठी, राहण्यासाठी व आहारासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नसे. शंभर गावातून मिळालेल्या विविध करातून हा खर्च चालविला जात असे. सम्राट हर्षवर्धन हा या विश्वविद्यालयाच्या पोषकापैकी होता. येथील विद्यार्थ्यांचे जीवन शिस्तबद्ध होते. श्रेष्ठ विद्वान अध्यापक येथे शिकवित होते.



**नालंदा विश्वविद्यालय**

©KTBS Not to be republished

## I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून पूर्ण करा.

1. हर्षवर्धनाच्या काळात भेट दिलेला चिनी प्रवासी __________ होय.
2. ह्यू-एन-त्संग याच्या प्रवास वर्णनाचे नाव __________.
3. नालंदा विश्व विद्यालय सध्याच्या __________ राज्यात आहे.
4. हर्षवर्धनचा नर्मदा काठावर पराभव केलेला कन्नड राजा __________

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. हर्षवर्धनाच्या भावाचे व बहिणीचे नावे लिहा.
2. हर्षवर्धनची राजधानी कोणती ?
3. 'हर्षवर्धन' ग्रंथाची रचना कोणी केली ?
4. हर्षवर्धनने रचलेल्या नाटकांची नावे लिहा.
5. हर्षवर्धन साम्राज्याला भेट दिलेला चिनी प्रवासी कोण ?
6. प्राचिन भारतातील प्रसिद्ध विश्वविद्यालय कोणते ? आणि कोठे आहे ?

* * * * *

©KTBS
Not to be republished

| पाठ 09 | नागरिकत्व |
|---|---|

**पाठाचा परिचय**

या पाठात नागरिकत्वाचा अर्थ, महत्व, लक्षणे, नागरिकत्व मिळविण्याच्या तसेच गमविण्याच्या पद्धतींचे स्पष्टीकरण केले आहे.

**सामर्थ्ये**

1) नागरिकत्वाचा अर्थ आणि महत्व समजून घेणे.
2) नागरिकत्वाच्या लक्षणांची यादी करणे.
3) नागरिकत्व मिळविण्याच्या पद्धती समजून घेणे.
4) नागरिकत्व गमावण्याच्या पद्धती समजून घेणे.

©KTBS Not to be republished

## नागरीत्वाचा अर्थ आणि महत्व

**अर्थ :** प्रत्येक व्यक्तिला उत्तम जीवन जगण्यासाठी पूरक असलेल्या संघटनेला राष्ट्र असे संबोधले जाते. एका राष्ट्रातील जबाबदार सदस्याला नागरिक असे म्हणतात. नागरिकत्व मिळालेल्या प्रत्येकाला त्या राष्ट्राने दिलेले हक्क प्राप्त होतात. म्हणजेच किमान जीवनमान, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सुरक्षा तसेच इतर हक्क त्यांना मिळतात. नागरिकाचे आपल्या देशाशी दृढ संबध असतात. एकाचवेळी एका पेक्षा अधिक देशांचे नागरिकत्व मिळविता येत नाही.

**महत्व:** आपण राहात असलेल्या देशामध्ये अभिमानाने जीवन जगण्यासाठी देशाच्या शासन व्यवस्थेत भाग घेण्यासाठी तसेच प्रत्येकाचे जीवन उत्तमरित्या चाल-विण्यासाठी उपयुक्त शासन व्यवस्था स्थापन करण्यासाठी नागरिकत्व आवश्यक आहे. त्याशिवाय देशाची एकता आणि अखंडतेला धक्का पोहचणार नाही असे वागणे हे नागरिकत्व अत्यंत महत्वाचे आहे.

## लक्षणे

1) व्यक्ती आपण एका देशाचा नागरिक आहे असे नागरिकत्वावरून ओळखतो.
2) नागरिक त्या देशाने बहाल केलेले सर्व हक्क मिळवू शकतो.

3) नागरिकत्व हे आपल्या देशातील कायद्याप्रमाणे जीवन जगण्यासाठी लोकांना सुचविते.

4) देशाच्या अत्युच्च हुद्यापासून ते इतर सर्व हुद्यांचे असलेले अधिकार नागरिक प्राप्त करू शकतो.

5) विदेशी लोकांना राजकीय हक्क नाकारले आहेत.



स्वदेशी मैसूरूचाराजवाडा विदेशी

## नागरिकत्व मिळविण्याची पद्धत

खाली दिलेल्या पद्धतीप्रमाणे लोकांना एखाद्या देशाचे नागरिकत्व मिळविता येते.

1) जन्मतः 2) वंशपरंपरेने (विदेशात रहाणाऱ्या दांपत्याच्या पोटी जन्मलेल्याना त्यांच्या आई वडिलांच्या देशाचे नागरिकत्व मिळते) 3) नोंदणी करून. 4) एका देशाशी दुसऱ्या देशाला भूभाग जोडला (समाविष्ट) तर समाविष्ट झालेल्या देशाचे नागरिकत्व प्राप्त होते. 5) सरकारच्या अनुमतीने नागरिकत्व प्राप्त करून घेऊ शकतो.

**1. जन्मत :** कोणतीही व्यक्ती ज्या देशामध्ये जन्मतो अथवा जन्मते त्याला आपोआप जन्मलेल्या देशाचे नागरिकत्व प्राप्त होते. अशाना आई वडील कोणत्याही देशाचे असले तरी त्यांचा विचार न करता जन्म हा आधार मानून नागरिकत्व मिळते.

© KTBS Not to be republished

उदा. 26 जानेवारी 1950 नंतर भारतात जन्मलेल्याना भारतीय नागरिकत्व मिळाले. कारण या दिवशी भारतात राज्यघटना अंलात आली.

**2. वंशपरंपरेने प्राप्त नागरिकत्व :** या विधानाप्रमाणे एक व्यक्तीचे आई वडील देशाचे नागरिक असल्यास वंश परंपरेने नागरिकत्व मिळते. उदा. 26 जानेवारी 1950 रोजी किंवा नंतर दुसऱ्या देशात असणाऱ्या कुटुंबात जन्म झाल्यास भारताचे नागरिकत्व प्राप्त होते.

**3. नोंदणी द्वारे :** कोणत्याही एका देशाचे नागरिकत्व योग्य पध्दतीने संबंधीत कार्यालयात अर्ज करुन नोंदणी करुन नागरिकत्व मिळवू शकतो. असा अर्ज करण्यासाठी काही मानदंड प्रत्येक राष्ट्राने ठरविलेले आहेत. उदा. भारतात कमीतकमी 5 वर्ष राहीले पाहिजे. अशाना नोंदणी पध्दतीने नागरिकत्व मिळू शकते.

**4. एखाद्या:** देशाचा भूभाग दुसऱ्या देशात समावेश केल्यास ज्या देशात भूप्रदेश समावेश केला जातो त्या देशाचे नागरिकत्व प्राप्त होते. सामान्यपणे युध्दामुळे किंवा देशाच्या स्वनिर्धारामुळे दुसऱ्या देशात समावेश होऊ शकतो. अशा संदर्भात समाविष्ट देशाचे नागरिकत्व मिळते.

## नागरिकत्व गमावण्याची पद्धत

एखाद्या देशाचे नागरिकत्व खालील कारणामुळे गमावू शकतो.

1) स्वईच्छेने नागरिकत्वाचा त्याग करणे. 2) दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारल्यास. 3) राष्ट्र विरोधी कृत्ये केल्यास. या तीन कारणामुळे व्यक्तीला आपले त्या देशाचे नागरिकत्व गमवावे लागते.

1) **त्याग करणे (Renunciation):** कोणताही भारतीय नागरिक दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारल्यास स्व-ईच्छेने भारतीय नागरिकत्व त्याग करु शकतो.

2) **रद्द करणे (Termination):** भारताच्या कोणत्याही नागरिकाने विदेशातील नागरिकत्व स्वीकारुन त्यांचाकडून अर्ज केल्यास कायद्याप्रमाणे त्याचे भारतीय नागरिकत्व रद्द होते.

3) **निलंबन (By Deprivation):** कोणत्याही व्यक्तीने घटनाबाह्य कार्य केल्यास अथवा राष्ट्रविरोधी कार्यात भाग घेतल्यास अथवा भारतीय संविधानाला बाधा आणणारे कार्य केल्यास त्याचे नागरिकत्व रद्द होऊ शकते. हे बळजबरीने निलंबन होते.

©KTBS Not to be republished

**I. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.**

1) नागरिकत्व म्हणजे काय ?
2) नागरिकत्वाच्या लक्षणांची यादी करा.
3) नागरिकत्व मिळविण्याच्या पद्धती लिहा.
4) नागरिकत्व गमावण्याची कारणे कोणती ?

**II. चर्चा करा.**

1) नागरिकत्वाची आवश्यकता काय ?
2) नागरिकत्व गमावल्यामुळे होणारे नुकसान याची यादी करा.

* * * * *

©KTBS Not to be republished

## पाठ 10 राष्ट्रीय बोधचिन्हे आणि राष्ट्रीय एकात्मता

### पाठाचा परिचय

या पाठात आपला राष्ट्रध्वज, राष्ट्रचिन्ह, राष्ट्रगीत, राष्ट्रीय सण तसेच त्याचे आचरण यांचा परिचय करून दिला आहे.

### सामर्थ्ये

1. राष्ट्रध्वजाची विशेषता समजून घेणे.
2. राष्ट्रध्वजाची संहिता समजून घेऊन त्याचे पालन करणे.
3. राष्ट्रचिन्हाचे विवरण आणि महत्व समजून घेऊन त्याचा गौरव करणे.
4. राष्ट्रगीताची पोर्शभूमी आणि त्याचे महत्व समजून घेणे.
5. राष्ट्रगीत योग्य पद्धतीने गाण्यास समर्थ होणे.
6. राष्ट्रीय सण व त्यांच्या आचरणाचे महत्व समजून घेणे.

©KTBS Not to be republished

### राष्ट्रीय बोधचिन्हे

सामान्यपणे एक देश आपली संस्कृती आणि परंपरेची वैशिष्टेय प्रतिबिंबीत करण्यासाठी काही बोधचिन्हांचा वापर करतो. त्यांना राष्ट्रीय बोधचिन्हे असे म्हणतात. मुख्यतः राष्ट्रध्वज आणि राष्ट्रचिन्ह ही त्या देशाची राष्ट्रीय प्रतिके असतात. प्रत्येक देशाला आपले स्वतःचे राष्ट्रगीत आहे. त्याप्रमाणे भारत देशालाही राष्ट्रगीत आहे. तसेच भारत देशाला राष्ट्रीय प्राणी व राष्ट्रीय पक्षी आहे. लोकांच्यामध्ये देशाभिमान व एकात्मता वाढविण्यासाठी यांचा उपयोग होतो.

### आपले राष्ट्रगीत

जन गण मन हे भारताचे राष्ट्रगीत आहे. रविंद्रनाथ टागोर यांनी 1911 साली बंगाली भाषेत या गीताची रचना केली. हे गीत दीर्घ अशा 5 कडव्यांचे आहे. त्यातील पहिल्या कडव्याला संविधान समितीने 24 जानेवारी 1950 रोजी राष्ट्रगीत म्हणून अंगिकार केला.

हे राष्ट्रगीत 52 सेंकदात गायिले. पाहिजे काही संदर्भात संक्षिप्तपणे राष्ट्रगीताच्या पहिल्या व शेवटच्या ओळी मात्र गायिल्या जातात. त्यास 20 सेकंद लागतात.

राष्ट्रगीताचा मान राखणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. राष्ट्रगीताचा अपमान करणे किंवा त्यामध्ये व्यत्यय आणणे हा अपराध शिक्षेस पात्र आहे.

- राष्ट्रगीत गाताना आपण ताठ व शिस्तीत उभे रहावे.
- योग्य चालीत न चुकता हे गीत म्हणावे.

## आपला राष्ट्रध्वज

राष्ट्रध्वज हा राष्ट्राचे एक प्रतिक आहे. राष्ट्रध्वज हा स्वातंत्र्य, देशप्रेम, एकता आणि निष्ठा यांचे प्रतिक आहे. राष्ट्रध्वज ध्वजस्तंभावर फडकताना प्रत्येक नागरिकाचे हृदय भरुन येते.


राष्ट्रध्वज

## स्वतंत्र भारताच्या तिरंग्याचे वर्णन

आपल्या भारत देशाचा राष्ट्रध्वज तीन रंगाचा मिळून बनलेला आहे. सर्वात वर केशरी, मध्यभागी पांढरा व खाली हिरवा रंग आहे. पांढऱ्या रंगाच्या मध्यभागी निळ्या रंगाचे चक्र आहे. यात 24 आऱ्या आहेत. चक्राचा व्यास पांढऱ्या पट्टीच्या रुंदी इतका असतो.

आपला राष्ट्रध्वज हा आयताकार आहे. त्याच्या लांबी रुंदीचे प्रमाण 3:2 असते. तिन्ही रंगाच्या पट्ट्या समप्रमाणात असतात. ध्वजाचे कापड खादी किंवा रेशमी असावे. शिवाय ते कापड हातमागाचे असावे. त्याबरोबर त्याचे सूत हातानेच तयार केलेले असावे.

## राष्ट्रध्वजाची वैशिष्टये

आपल्या राष्ट्रध्वजातील तीन रंग काय सुचवितात? केसरी रंग त्याग व निस्वार्थतेचे प्रतिक आहे. पांढरा रंग सत्य, शांती व पावित्र्यतेचे प्रतिक आहे. हिरवा रंग हिरव्यागार जमीनीची शामलता दर्शवितो.सारनाथ येथील स्तंभावरील शिल्पकृतीमध्ये चार सिंह चार दिशेला तोंड करून मागील पायावर पाठीला पाठ लावून बसलेले आहेत. ती बैठक व्यवस्था गोलाकार असून चार बाजूला चक्रे आहेत. या चक्राच्या मध्ये हती, बैल, घोडे व सिंह यांचे एकेक चिन्ह आहे. या आसनातील चक्राना धर्मचक्र असे म्हणतात. आपल्या राष्ट्रध्वजावरील पांढऱ्या पट्टीवर हेच चक्र प्रतिबिंबीत केले आहे.

©KTBS Not to be republished

## राष्ट्रध्वज संहिता

- राष्ट्रध्वज मलीन किंवा फाटलेला असू नये.
- ध्वजारोहन करताना केशरी रंग वरच्या बाजूला येईल असा करावा.
- राष्ट्रध्वजापेक्षा उंचावर दुसरा कोणताही ध्वज फडकला जाऊ नये.
- ध्वजस्तंभाच्या वरच्या टोकापर्यंत ध्वज चढवावा.
- केव्हाही सूर्योदयानंतर ध्वजारोहन करावे आणि सूर्यास्ताच्या अगोदर ध्वज उतरावा व व्यवस्तीत घडी घालून ठेवावा.
- राष्ट्रीय दु:खवटा आचरण करताना राष्ट्रध्वज ध्वजस्तंभाच्या अर्ध्यावर फडकवावा.
- पथसंचलनावेळी राष्ट्रध्वज उजव्या हातात धरावा.
- राष्ट्रध्वज जमिनीला लागू देऊ नय.

**प्लास्टीक ध्वजाचा वापर करू नये.**

©KTBS Not to be republished

## आपले राष्ट्रचिन्ह



राष्ट्रीय चिन्ह

आपल्या राष्ट्रचिन्हाचे निरीक्षण करा. हे सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या वरच्या भागाची प्रतिकृती आहे. वर्तुळाकार आसनावर सिंह असल्यामुळे त्याला सिंह मुद्रा असे म्हणतात. सारनाथ येथील सिंहमुद्रा ही आपल्या देशातील राष्ट्रचिन्ह किंवा राष्ट्रमुद्रा बनली आहे.

तसेच परस्पर सामंजस्याने वागावे. सर्वांनी आम्ही सर्व राष्ट्र नावाच्या कुटुंबाचे समसदस्य आहोत ही भावना बाळगणे होय. जाती, पंथ, धर्म, लिंगभेद न मानता आम्ही सर्व एक आहोत ही भावना रुजविणे म्हणजेच राष्ट्रीय एकात्मता. एका बलशाली राष्ट्र निर्मितीसाठी अशी भावना सर्वामध्ये वाढविणे आवश्यक आहे. आम्ही सर्व भारतीय एक आहोत अशी भावना दृढ करणे हीच राष्ट्रीय एकात्मता.

भारत सरकारने हे बोधचिन्ह 26 जानेवारी 1950 रोजी आंगिकारले आहे. या बोधचिन्हातील तीन सिंह दर्शनी दिसत असून एक सिंह दृष्टी आड आहे. आसनावरील चक्राखाली देवनागरी लिपीत सत्यमेव जयते (नेहमी सत्याचाच विजय होतो) हे मुंडक उपनिषदातील ब्रीद वाक्य कोरलेले आहे.

## राष्ट्रीय प्राणी आणि राष्ट्रीय पक्षी

वाघ हा आपला राष्ट्रीय प्राणी आहे. शरीराने तो अत्यंत बळकट असून दिसायला आकर्षक आहे. मोर हा आपला राष्ट्रीय पक्षी आहे. लाल आणि पिवळा रंग मिश्रीत पंख, डोक्यावर तुरा असलेला मोर हा अत्यंत मनमोहक पक्षी आहे.



राष्ट्रीय प्राणी वाघ



राष्ट्रीय पक्षी मोर

## राष्ट्रीय एकात्मता

## राष्ट्रीय एकात्मतेचा अर्थ

राष्ट्रीय एकात्मता म्हणजे एकाने दुसऱ्याबद्दल अथवा एका समाजाने दुसऱ्या समाजाबद्दल द्वेष, असुया आणि पूर्वग्रह दूषित असु नये. शिवाय एकाने दुसऱ्याचा गौरव करावा. आपल्या देशाच्या नैसर्गिक संपतीचे प्रतीक असून, कृषी औद्योगिकतेची समृद्धी आणि वैभवाचे प्रतिक आहे. राष्ट्रध्वजातील चक्र सारनाथ येथील अशोक स्तंभातील चक्राचे प्रतिरूप आहे. हे अशोक चक्र आम्हाला प्रगतीपथावर निरंतर पुढे चालण्यास स्फूर्ती प्रदान करणारे प्रगतीचे प्रतीक आहे.

**एकात्मतेचे महत्व :** एखाद्या राष्ट्रातील जनतेमध्ये एकी निर्माण करण्यासाठी एकात्मता महत्वाची आहे. राष्ट्राचे हित जोपासण्यासाठी, अभिवृद्धी करण्यासाठी, देशातील जनतेने आम्ही सर्व एक आहोत ही भावना वाढविणेसाठी एकात्मता फार महत्वाची आहे. एकात्मता ही देशाच्या सार्वभौम बंधुता आणि समानतेला प्रेरणा ठरते.

© KTBS Not to be republished

## विविधता

भारताची विविधता ही येथील निसर्ग, सजीव तसेच जनजीवनातील विविधतेत दिसून येते.

- **नैसर्गिक विविधता :** भारतामध्ये अत्यंत उंच पर्वत श्रेणी, अतिलांब नद्या, तसेच विशाल मैदाने आहेत. त्याचप्रमाणे अति थंड व अति उष्ण प्रदेशसुद्धा आहेत. रणरणते वाळवंटही येथे आहे. घनदाट जंगले, शीतल सरोवरे, धबधबे, मनमोहक किनारपट्टी, शेकडो लहान लहान बेटे ही निसर्गाने दिलेली देणगी आहे.
- **सजीवांची विविधता :** भारतात सजीवांची विविधता भरपूर आहे. जगात इतकी सजिवांची विविधता आढळणारे देश क्वचितच आहेत.

आतापर्यंत 47,000 पेक्षा अधिक प्रकारच्या विविध वनस्पती येथे आढळल्या आहेत. येथे 90,000 पेक्षा अधिक प्रकाराचे प्राणी आहेत. यामध्ये 1,232 प्रकारचे पक्षी आणि 2,546 प्रकारचे मासे यांचा समावेश आहे. रंगीबेरंगी पक्षी हा भारताचा अमूल्य ठेवा आहे.

- **जन विविधता :** विशाल अशा भारत देशात वेगवेगळया (समाजाचे) जातीचे लोक आहेत, त्यांचे रूप, शरीर रचना, भाषा, वेषभूषा, आहार, रितीरीवाज, आचार-विचार धर्म वेगवेगळे आहेत. आपल्या देशातील जनजीवनातील सौंदर्य डोळे भरून पाहायचे असल्यास संपूर्ण भारत फिरला पाहिजे.

## विविधतेत एकता

आपण सर्व एक आहोत ही सांस्कृतिक जागृतीची भावना पूर्वीपासूनच आली आहे. भारतात विविधता आढळून येते. जागतीक लोकसंखेच्या आधारे दुसरा क्रमांक लागतो. भौगोलिक दृष्टीनेही विविधता आढळणारा आपला देश आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्याला हवा तो धर्म स्वीकारु शकते. आपण पाहिजे त्या प्रादेशीक भाषेमध्ये बोलून जीवन जगू शकतो. भारतामध्ये विविध जाती धर्माचे लोक एकत्र रहात असल्यामुळे त्यांच्यामधील विविधतेतून एकतेचे दर्शन घडते. विविध भाषा संस्कृती धर्मावरील विश्वास असल्यामुळे अनेक संस्कृतीचे लोक येथे एकत्र रहातात. आपल्या देशामध्ये वेगवेगळ्या धर्माचे लोक स्वत:च्या धर्माचे आचरण करु शकतात. असे वेगवेगळ्या

©KTBS Not to be republished

धर्माचे लोक येथे गुण्यागोविंदाने नांदत असल्यामुळे अनेकतेमधून एकतेचे दर्शन होते. अशी विविधता जपण्यास आपल्या संविधानाने आम्हाला मान्यता दिलेली आहे.

## राष्ट्रीय एकात्मतेला बाधक अंश

- **जातीयता :** जातीयता म्हणजे दुसऱ्या जातीपेक्षा आपली जात उच्च मानणे. जातीयता ही देशाच्या एकात्मतेला बाधक आहे. ही जातीयता आज सर्व क्षेत्रामध्ये पसरली आहे. यामुळे संकुचीत भावना वाढलेती आहे. अशा प्रकारे जातीयता ही देशाच्या एकात्मतेला मारक ठरत आहे.

- **धार्मिक वाद :** दुसऱ्या धर्मापेक्षा आपला धर्म श्रेष्ठ आहे असे मानणे. केवळ आपल्या धर्मासाठी भांडणतंटा करणे म्हणजेच धार्मिकवाद किंवा जातीय वाद होय. जातीयवाद समाजातील शांती भंग करतो. यामुळे जीवीत हानी आणि संपत्तीचा नाश होण्याचा संभव असतो इतकेच नाहीतर हा वाद लोकांच्यातील परस्पर प्रेम सामंजस्य कमी करतो. वेगवेगळ्या लोकांमध्ये सामंजस्य नाहीसे करून हे देशाच्या प्रगतीस बाधा आणतो.

- **प्रादेशिक वाद :** राष्ट्रीय भावैक्यतेला बाधक होईल असा दुसरा वाद म्हणजे प्रादेशिक वाद. आपल्या प्रदेशाबद्दलची काळजी, तीव्र निष्ठा आणि संकुचीत भावना म्हणजेच प्रादेशिक वाद होय.

म्हणजे संविधानानुसार आपल्या विविध राज्यामध्ये एकतेची भावना असल्यामुळे, प्रादेशिक भाषा, संस्कृती, राज्यकारभार, संपत्ती ही मुख्य आहेत. यामुळे आपल्या राष्ट्रीय एकतेला मारक ठरणारा प्रादेशिक वाद योग्य नाही. सर्व प्रथम आम्ही भारतीय आहोत. त्यानंतर राज्य अथवा एका प्रदेशाशी संबंधीत असतो. हे समजून घेतले तर प्रादेशिकतेची भावना अपायकारी होत नाही. प्रादेशिक वाद हा प्रत्येकतावाद होऊ नये. प्रत्येकतावादाची भावना वाढीस लागली तर ती देशाच्या एकात्मतेला मोठी हानी निर्माण करते.

©KTBS Not to be republished

**गटात चर्चा करून उत्तर द्या.**

1. विविधतेत एकता म्हणजे काय?
2. भारतामध्ये एकात्मतेसाठी पोषक अंश कोणते?
3. राष्ट्रीय एकात्मतेला बाधक अंश कोणते?

**चर्चा करा.**

राष्ट्रीय भावैक्यता साधण्यासाठी कोणते निर्दिष्ठ उपाय करू शकतो.

**उपक्रम**

1. एकात्मतेला मारक ठरणाऱ्या तुमच्या गावातील स्थानिक पातळीवरील समस्याची यादी करा.
2. सध्या भारतात एकात्मतेच्या दृष्टीने अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत याचे कारण काय? त्यावर उपाय कोणते?

देशात एकात्मता कशी वाढवू शकतो याबद्दल चर्चा आयोजित करून सूचनांची यादी करा.

* * * * *

©KTBS Not to be republished

| पाठ "1 | # ग्लोब आणि नकाशे |
|---|---|

## पाठ परिचय -

भूगोलचा अभ्यास करण्यासाठी आणि भूगोल समजून घेण्यासाठी ग्लोब आणि नकाशे ही उत्तम साधने आहेत. यांच्या सहाय्याने भूगोल शिकणे आणि शिकवणे सोपे होते. ग्लोबचा अर्थ आणि उपयोग, नकाशांचे उपयोग, त्यांचा अर्थ आणि पद्धती. नकाशे बनविण्यासाठी महत्वाच्या भौगोलिक संकेतांचा वापर आणि नकाशा वाचन कसे करावे याचे पाठात विवरण केले आहे.

## सामर्थ्ये

1) ग्लोबचा वापर आणि महत्व समजून घेणे.

2) नकाशे बनविण्याकरिता लागणारी विविध सामुग्री आणि नकाशांचे प्रकार समजून घेणे.

3) भौगोलिक संकेत आणि खुणांचा, नकाशांच्या पद्धतीप्रमाणे वापर केल्यास त्यांची उपयुक्तता समजून घेणे.

4) नकाशातील भौगोलिक संकेत व चिन्हे यांची माहिती करून घेणे.

5) नकाशा वाचनाची कला समजून घेणे.

©KTBS Not to be republished

## 1. ग्लोब (पृथ्वीचा गोल)

**ग्लोबचा अर्थः** मागच्या सत्रात आपण पृथ्वीच्या आकाराचा आणि व्याप्तीचा अभ्यास केला आहे. पृथ्वी ही जियाय्ड (Geoid) आकारात असून, ग्लोब ही त्याची प्रतिकृती आहे. कत्रिम उपग्रहा वरून घेतलेल्या पृथ्वीच्या छायाचित्राद्वारे पृथ्वीचे खरे आणि पूर्ण रूप आपल्याला माहीत होते. परंतु आम्ही पृथ्वीचा एकाच बाजूचा आकार पाहू शकतो. ग्लोब ही पृथ्वीचीच प्रतिकृती असल्यामुळे आम्ही पृथ्वीची दुसरी बाजू ही ग्लोब फिरवून पाहू शकतो.




पृथ्वीची प्रतिकृती ग्लोब

## ग्लोबची वैशिष्ट्ये

ग्लोब ही पृथ्वीची लहान प्रतिकृतीच आहे. पृथ्वीच्या संत्र्याकृती आकाराची ही प्रतिकृती असून, नकाशावर सपाट दिसणा-या आकाराप्रमाणे ती नसते. पृथ्वीच्या अनेक अंगाची माहिती ग्लोबमुळे आपल्याला मिळते. हे एक अत्यंत सोपे शिकण्याचे आणि शिकवण्याचे उपकरण आहे. ते आपण टेबलावर ठेवून फिरवू शकतो. त्यामुळे आपल्याला अनेक भौगोलीक विषयांची माहिती घेता येते.

## ग्लोबचे उपयोग



सॅटे लईट वरून घेतलेले पृथ्वीचे छायाचित्र

1) पृथ्वीच्या आकाराचा अभ्यास करण्यासाठी उपयोग होतो.

2) प्रदेशांचा आकार, व्याप्ती, खंड, समुद्र आणि महासागर यांची माहिती मिळते.

3) ग्लोब वरील अक्षांश, रेखांश, आपल्याला निश्चित प्रदेश आणि राजकीय सीमा पाहण्यास मदत करतात.

4) उत्कृष्ट दर्जाचे ग्लोब आपल्याला पृथ्वीच्या अक्षाच्या हालचाली म्हणजेच, पृथ्वीच्या गती व त्यांचे परिणाम दाखवितात. दिवस रात्र, ऋतू वगैरे बद्दल माहिती देत कटिबंध प्रदेशाची दिशा सूचित करतात.

5) ग्लोब आपल्याला टेकड्या, पठारे, वाळवंटे, नद्या व बेटांची माहिती देतात.

## 2. नकाशे

ग्लोब आपल्याला पृथ्वीची सर्वसाधारण माहिती देते. परंतु नकाशे एखाद्या प्रदेशाच्या भौगोलिक, राजकीय आणि प्रदेशाच्या स्थितीबद्दल अचूक माहिती देतात.

जगाच्या पूर्ण आकृतीचे किंवा विभागाचे सपाट रुपात आणि मोजमापात केलेले प्रदर्शन म्हणजेच नकाशा. नकाशा तयार करण्याची कला आणि विज्ञान म्हणजे नकाशा शास्त्र. विविध प्रकारच्या नकाशांचा एकत्रित संग्रहित पुस्तकाला 'ॲटलास' असे म्हणतात.

©KTBS Not to be republished

## नकाशांचे प्रकार

माप आणि उपयुक्तता यांच्या आधारे नकाशांचे खालील प्रकारे वर्गिकरण केले जाते.

### 1) मोजमापावर आधारित नकाशे

मोजमापावर आधारित दोन प्रकाराचे नकाशे आहेत.

**अ) मोठ्या आकाराचे नकाशे :** लहान प्रदेशाची माहिती या प्रकारच्या नकाशाद्वारे मिळते. यांचे भौतिक व राजकीय नकाशे असे वर्गीकरण करता येते. यांची दोन प्रकारात विभागणी होते. 'राजकीय' किंवा एखाद्या वैयक्तिक संपत्तीची पूर्ण माहिती देणारे नकाशे आणि 'भौगोलिक' किंवा भूभागांची संपूर्ण बारकाव्या सहीत माहिती देणारे नकाशे.




मोठ्या आकाराचे नकाशे

: 1:25,000

Not to be republished ©KTBS

**ब) लहान आकाराचे नकाशे:** हे जगातल्या मोठ्या देशांची किंवा प्रदेशांची माहिती देणारे नकाशे होय. उदा. जगाचा नकाशा, खंड, देश. यामध्ये भिंतीवर लटकविण्याचे नकाशे आणि ॲटलास असे दोन प्रकार असतात. ॲटलास पेक्षा भिंतीवर लटकणारे नकाशे आकाराने मोठे असतात. वर्गात शिकविण्यास त्यांचा उपयोग होतो. राजकीय, प्रादेशिक वगैरे माहिती पुरवणारे हे नकाशे असतात. 'ॲटलास' जरी आकाराने लहान असले तरीही ते आपल्याला काही उपयुक्त माहिती पुरवितात.




लहान आकाराचे नकाशे

## 2) उपयुक्तता आधारित नकाशे -

हे विषयवार नकाशे असतात. ते खालील प्रमाणे.

**अ) स्वाभाविक नकाशे :** याप्रकारचे नकाशे पठार, डोंगराळ प्रदेश, शिखरे, नद्या, सपाट भूप्रदेश वगैरे दर्शवितात.

**ब) राजकीय नकाशे :** याप्रकारचे नकाशे दोन खंडातील, देशातील, राज्यातील व्याप्त भूप्रदेश व त्यांची स्थिती यांची माहिती देतात.

©KTBS Not to be republished

**क) वर्गीकृत नकाशे :** या नकाशाद्वारे वैविध्यपूर्ण वर्गीकरणाची माहिती मिळते. उदा. वापरात असलेला भूभाग, हवामान, पर्ज्यन्य, लोकसंख्या, मातीचे प्रकार, पिके, खनिजे, औद्योगिक कारखाने, रेल्वेमार्ग, रस्ते वगैरे माहिती देतात.

## नकाशांचे प्रमुख अंश

अक्षांश, रेखांश, मोजमापन, दिशा, शिर्षक हे उत्तम नकाशांचे प्रमुख अंश होत.

**1. शीर्षक :** प्रत्येक नकाशाला त्यात असणाऱ्या विषया संबंधी समर्पक शिर्षक हवे. उदा : राजकीय भारत किंवा स्वाभाविक विभाग भारत.

**2. मोजमापन :** प्रत्यक्ष जमिनीवरचे अंतर आणि त्यानुसार नकाशातले अंतर हे प्रमाणबद्धते नुसार दर्शविलेले असते. याच्यामुळे आपल्याला जमिनीवरील दोन ठिकाणाचे प्रत्यक्ष अंतर कळून येते. नकाशामध्ये दोन स्थळे जवळ दिसत असली तरी प्रत्यक्षात ती दूर असतात.

**3. अक्षांश-रेखांश :** हे मोजमापाच्या काल्पनीक रेषांचे जाळे असून त्याच्या आधारे आपल्याला निर्दिष्ट ठिकाणे, अंतर आणि दिशा याचे ज्ञान मिळते.

**4. दिशा :** नकाशामध्ये दिशा बाणाची खूण करून निर्दिष्ट केलेली असते. नकाशाच्या वरील बाजूस उत्तर (N) अक्षर लिहिलेले असते. बाणाचे टोक उत्तर दिशेकडे असते. एकदा आपल्याला उत्तर दिशा नेमकी समजली तर इतर दिशा सहज समजू शकतात.

**5. अनुक्रम किंवा सूची :** एखाद्या विषयासाठी एखादी विशिष्ट खूण जेव्हा वापरली जाते तेव्हा त्याला सूची असे म्हणतात. अशा सूचीद्वारे आपल्याला नकाशाम ध्ये दिलेल्या विषयांचे, रंग किंवा विशिष्टखूणाद्वारे सहज ज्ञान होते. उदा. पाण्याकरीता निळा रंग, मैदानांकरिता हिरवा रंग वगैरे.

©KTBS Not to be republished




उत्तर दिशा दाखविण्याची पध्दत




नकाशा सूची

## नकाशांचे फायदे

नकाशांचे अनेक फायदे आहेत.

- नकाशे आपल्याला खेडी, शहरे, जिल्हे, राज्ये, देश आणि खंड यांची माहिती देतात.
- ते आपल्याला भौगोलिक स्थितीची माहिती देतात. उदा. टेकडी, पठारे, डोंगराळ प्रदेश, वने, वाळवंटी प्रदेश, किनारपट्टी आणि बेटे दर्शवितात.
- नकाशे आपल्याला भूमार्ग, जलमार्ग व वायूमार्ग यांची माहिती देतात.
- युद्धकाळात लष्करास नकाशांचा उपयोग सुरक्षितता आणि बेत आखणीस होतो.
- नकाशे प्रवाशांना नियोजित स्थळी पोहोचण्यास मदत करतात.
- वर्गात शिकविण्यास व शिकण्यास नकाशे हे उत्तम साधन आहे.
- नकाशे हाताळण्यास आणि ने-आण करण्यास सुलभ असतात.
- नकाशे आपणास पिके, खनिजे व कारखान्यांची माहिती देतात.

©KTBS Not to be republished

# 3. भौगोलिक संकेत

विशिष्ट वस्तू निश्चित करण्याकरीता खूणांचा वापर केला जातो. नकाशातून वापरणाऱ्या खूणा या संबंध जगात एकाच पद्धतीच्या असतात. या खुणामुळे आपल्याला खूप माहिती मिळते.

**रंग:** आपण जर भिंतीवर टांगलेल्या नकाशाकडे पाहिले तर आपल्याला अनेक रंगाच्या खूणा आढळून येतात. प्रत्येक रंगाच्या खुणांचा अर्थ निराळा असतो. तो पुढील प्रमाणे.




भौगोलिक संकेत




वर्ण संकेत

©KTBS Not to be republished

**अ) निळा रंग :** निळा रंग हा समुद्र, महासागर, नदी, तळे व सरोवरे जल भाग दर्शविण्यास वापरतात.

**आ) हिरवा रंग:** हिरवा मैदानी प्रदेश किंवा मैदान आणि उतार दर्शविण्यास वापरला जातो.

**इ) पिवळा रंग :** मैदाना पेक्षा उंच भाग दर्शविण्यासाठी. डोंगराळ भाग

**ई) तपकिरी रंग :** टेकड्या आणि उंच पर्वत शिखरांच्या खालील भागाचा प्रदेश बफाच्छादित प्रदेश

**उ) गडद तपकिरी रंग :** उंच शिखरांच्या उंच प्रदेशा करिता.

**ऊ) शुभ्र किंवा जांभळा रंग :** शुभ्र किंवा जांभळा रंग बर्फाच्छादित दर्शविण्यासाठी.

या व्यतिरिक्त राजकीय नकाशामध्ये विविध राज्ये, जिल्हे दर्शविण्यासाठी विविध रंग वापरले जातात.

**विविध रंगीतरेषा:** नकाशावर रेल्वे, रस्ते, वायुमार्ग इत्यादींचे जाळे दाखविण्यासाठी विविध रेषा वेगवेगळ्या रंगांनी दाखविल्या जातात. काळ्या रेषांनी सीमाभाग, लालरंगानी रस्ते इत्यादी दाखविण्यास या रेषा उपयोगी पडतात.

## 4. नकाशांचे वाचन / आकलन

नकाशांचे वाचन करण्यासाठी किंवा आकलन करण्यासाठी आपल्याला काही खूणांचे अर्थ समजणे आवश्यक असून, त्यात निर्दिष्टीत अक्षराचे ज्ञान असणे महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे कोणत्या गोष्टीसाठी कोणता रंग वापरला जातो, रेषा आणि खूणा कशासाठी वापरल्या जातात हे ही माहीत असणे जरूरीचे आहे.

नकाशा वाचणे ही एक कला आहे. ही कला आत्मसात करण्यासाठी आपल्याला काही महत्वाच्या सर्वसाधारण गोष्टीचे आकलन होणे जरूरीचे आहे. ते खालील प्रमाणे

©KTBS Not to be republished




नकाशाचे वाचन करण्याची पद्धत

**वि.सू.** व्यापकपणे कलबुरगी आणि बागलकोट जिल्हा केंद्रामधिल थेट अंतर 222 कि.मी. आहे.

1. **निर्दिष्ट स्थळे जाणण्यासाठी:** एखादे निर्दिष्ट स्थळ नकाशावर पाहण्यासाठी आपल्याला ते कोणत्या अक्षांश आणि रेखांशावर आहे हे जाणणे जरूरीचे आहे.

2. **दिशा जाणण्यासाठी :** उत्तरेकडे रेखांकित केलेले बाणाचे टोक आपल्याला इतर दिशा जाणण्यास मदत करतात.

3. **दोन स्थळातील अंतर जाणण्यासाठी :** नकाशावर दिलेले अंतराचे माप आपल्याला दोन ठिकाणामधील अंतर जाणण्यास मदत करते.

**नवीन शब्द :**

ग्लोब, नकाशे, स्थळे, ॲटलास, नकाशे रेखांकित करणे, चिन्हे, शिर्षक, सूची, संचार संपर्क.

**लक्षात ठेवा**

- बॅबीलोनिया येथे 2300 (ख्रि.पू.) मध्ये आढळून आलेला नकाशा हा अतिप्राचिन नकाशा होय. ग्रीक खगोलशास्त्रज्ञ क्लाऊडियस टॉलेमी याने पहिला ॲटलास तयार केला (ख्रि.शक. 90-168)
- मोठ्या मापाचे नकाशे लहान जागा दर्शवितात आणि लहान मापाचे नकाशे मोठ्या जागा दर्शवितात.
- भौगोलिक अभ्यास करण्यासाठी नकाशांचा उपयोग होतो. शिकविण्याचे ते उत्तम साधन आहे.
- दोन ठिकाणातील अचूक अंतर शोधण्यासाठी नकाशावरील सेंटी मीटरचे किलो मीटर मध्ये आणि इंचाचे मैलामध्ये रूपांतर करून अचूक अंतर शोधता येते.
- होका यंत्रातील सुई नेहमी उत्तर दिशा दर्शविते.

©KTBS Not to be republished

## खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1. ग्लोब म्हणजे काय ?
2. ग्लोबचे दोन उपयोग सांगा.
3. नकाशा म्हणजे काय ?
4. नकाशांचे विविध प्रकार कोणते ?
5. नकाशांचे दोन उपयोग सांगा.
6. ॲटलास म्हणजे काय ?
7. मोजमापन म्हणजे काय ?
8. भौगोलिक संकेत म्हणजे काय ?
9. नकाशांचे प्रमुख अंश कोणते ?
10. ज़ल प्रदेश दर्शविण्यासाठी नकाशामध्ये कोणत्या रंगाचा उपयोग केला जातो ?

## कृती :-

1) रबरी चेंडू, पुठ्ठा, कागद वापरून ग्लोबची प्रतिकृती तयार करा.
2) निरनिराळे नकाशे पहा आणि त्यातील फरक जाणा.
3) भारत देशाच्या रेखांकित नकाशामध्ये खालील बाबींना रंग द्या.

   अ) भारताचे प्रमुख स्वाभाविक विभाग.

   ब) भारताच्या शेजारील महासागर आणि समुद्र यांना रंग देऊन नावे द्या.

* * * * *

©KTBS Not to be republished

| पाठ 1# | आशिया - वैविध्यपूर्ण खंड |
|---|---|

**पाठाचा परिचय**

जगाचा नकाशा पाहिल्यास जमिनीचे सहा भागामध्ये विभाजन झालेले दिसते. यापैकी सर्वात मोठा भाग कोणता ते तुम्ही सांगू शकाल का ?

आशिया खंडाचे स्थान, विस्तीर्ण आणि भौगोलीक रचना. प्रादेशिक विभाग, प्राकृतीक लक्षणे, प्रमुख नद्या आणि शेती, हवामान आणि वनस्पती, प्रमुख खनिजे लोकसंख्या घनता याचा परिचय.

**सामर्थ्य**

1 आशिया खंडाचे स्थान, विस्तीर्ण, भौगोलीक रचना आणि वैविध्यतेची लक्षणे समजू शकाल.
2 प्रादेशिक विभागाची विभागणी आणि त्यांच्यामधील साम्य याविषयी सम जून घ्याल.
3 आशियाच्या प्रमुख स्वाभाविक विभागाबद्दल माहिती समजून घ्याल.
4 नद्यांची व्यवस्था आणि व्यवसाय यामधील संबंध समजून घेतील.
5 हवामान आणि नैसर्गिक वनस्पती यामधील संबंधा बद्दल माहिती समजून घ्याल.
6 प्रमुख खनिज संपती, त्यांची विभागणी, लोकसंख्येची वाढ, लोकसंख्या विभागणी आणि लोक संख्येची घनता याविषयी समजून घ्याल.

## 1 स्थान, विस्तार आणि भौगोलिक रचना

**परिचय :** जगात आशिया खंड मोठा आहे. त्यामुळे तो स्वाभाविक लक्षणे, हवामान, वनस्पती, वन्यप्राणी, आर्थिक व्यवस्था याहीमध्ये विविधता दिसून येते. या खंडामध्ये अति उंच पर्वत, विशाल सुपीक मैदाने, वाळवंटी प्रदेश, नद्यांची मैदाने आणि सरोवरे दिसून येतात. त्याचप्रमाणे भाषा, धर्म, लोकसंख्येची विभागणी आणि लोकसंखेची घनता यामध्येही आम्हाला विविधता आढळून येते. त्यामुळे आशिया 'वैविध्यपूर्ण खंड' म्हणून ओळखला जातो.

©KTBS Not to be republished

**कृती :** आशिया खंड हा वैविध्यपूर्ण कसा आहे. हे नकाशात पाहून चर्चा करा.

**स्थान :** आशिया खंड 1०-16० उत्तर पासून 77०-41० उत्तर अक्षांश आणि 26०-04० पूर्वे पासून 169०-4० पश्चिम रेखांश यांच्यामध्ये विस्तारलेला आहे. मलेशियाच्या थोडे दक्षिणेला भूमध्यरेषा आणि कर्क वृत्तरेषा भारत आणि अरेबीयातून गेली आहे.

**विस्तार :** आशिया खंडाचा एकूण भौगोलीक विस्तार सुमारे 44 मिलीयन चौ. कि.मी. आहे. हा जगातील संपूर्ण विस्तारापैकी 33% भागाएवढा आहे. हा खंड संपूर्णपणे उत्तरगोलार्धात आहे.




**जगात आशियाचे स्थान**

**भौगोलीक रचना :** आशिया खंड तीन बाजूने समुद्र आणि एका बाजूस जमीनीने वेढलेला आहे. भोवताली असलेले समुद्र म्हणजे उत्तरेला आर्क्टिक महासागर, पूर्वेला पॅसिफीक महासागर आणि दक्षिणेला हिंदूमहासागर, पश्चिमेला यूरोपखंड आहे.

आशिया आणि युरोप खंडाची सीमा सांप्रदायप्रमाणे काल्पनीक रेषा असून ती वेडीवाकडी आहे, आणि उरल पर्वत, कॅस्पीयन समुद्र, ककासस पर्वत आणि तांबडा समुद्रमार्गे ओलांडून जाते.

©KTBS Not to be republished

**युरोप आणि आशियाला मिळून युरेशिया असे म्हणतात.**




**आशियाचे स्थान आणि भौगोलिक विस्तार**

©KTBS Not to be republished

आशिया आणि आफ्रिकेची सीमारेषा सामान्यपणे सुवेझ कालव्यामार्गे व आशिया आणि ऑस्ट्रेलीयाची सीमारेषा न्यूगिनी आणि ऑस्ट्रेलियाच्या मधून जाते.

## 2 आशियाचे स्वाभाविक विभाग

आज आशिया खंडामध्ये 48 देश आहेत. ते खालील प्रमाणे पाच स्वाभाविक विभागामध्ये विभागलेले आहेत.

**1 पूर्व आशिया :** यामध्ये चीन, उत्तर आणि दक्षिण कोरिया, जपान, हाँगकाँग, तैवान आणि मंगोलीया देश येतात. हे उत्तरेकडे विशाल असा रशिया, दक्षिणेकडे दक्षिण आशिया आणि आग्नेय आशिया यांच्या मध्ये विस्तारलेले आहेत.

**2 आग्नेय आशिया :** यात मॅनमार, लावोस, व्हिएतनाम, थायलंड, कंबोडीया, मलेशिया, इंडोनिशिया, सिंगापूर. ब्रुन्हे आणि फिलीपाईन्स देश यांचा समावेश आहे.

हे एक पर्यायी द्विप, द्विप समुहांचा प्रदेश. उदाहरण - सुमात्रा, जावा, सुलाविशी, बोर्नियो, पापूव इत्यादी. याच्या पश्चिमेला हिंदूमहासागर आणि पूर्वेला पॅसिफीक महासागर आहे.




आशियाचे स्वाभिाविक विभाग

**3 दक्षिण आशिया :** यात भारत, बांग्लादेश, भूतान, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका आणि मालदीव देश आहेत. यामध्ये भारत सर्वात मोठा देश आहे. भारताच्या दक्षिणेला हिंदूमहासागर आणि त्याचा उपभाग असलेले बंगालचा उपसागर व अरबी समुद्र भोवताली आहेत. उत्तरेला हिमालयाच्या पर्वतरांगा, पूर्वेला म्यानमार आणि पश्चिमेला अफगाणीस्तान आहे.

**4 नैर्ऋत्य आशिया :** अफगाणीस्तान, बऱ्हेन, सैंप्रस, इराण, ईराक, इस्राईल, जॉर्डन, कुवैत, लेबनॉन, ओमान, कत्तार, सिरीया, पॅलेस्टाईन, सौदीअरेबीया, अरब अमीराती, योमान आणि टर्की देश या विभागात येतात. हा विभाग तांबड्या समुद्राच्या दक्षिण भागात असून पश्चिमेला मेडीटेरीयन समुद्र आणि पूर्वेला भारत

©KTBS Not to be republished

यांच्या मध्ये विस्तारलेला आहे. हा जास्तीजास्त वाळवंटी आणि कमी वाळवंटी भागांनी बनलेले असले तरी पेट्रोलियम आणि नैसर्गीक वायू (गॅस) यांनी समृद्ध आहे.

**5 मध्य आशिया :** हे कॅस्पीयन समुद्रापासून चीन पर्यंत आणि कझाकीस्तान पासून इरान - अफगाणीस्तान पर्यंत विस्तारलेला आहे. या विभागातील प्रमुख देश म्हणजे कझाकीस्तान, किर्घीस्तान, तजाकीस्तान, तुर्कमेनीस्तान, आणि उज्बेकिस्तान आणि सैबीरीया (रशिया).

## 3 स्वाभाविक विभाग

आशियाच्या स्वाभाविक विभागामध्ये उंच पर्वताच्या रांगा प्रमुख जमीनीच्या रुपात आहेत. सोबत विविध पठारी प्रदेश, पर्वतमय प्रदेश, मातीची मैदाने आणि द्विप समुहांनी सामावलेला आहे.

**प्रमुख स्वाभाविक विभाग :** भूरचना आणि भौगोलीक परिस्थितीच्या आधारावर आशिया खंड पाच प्रमुख स्वाभाविक विभागात विभागलेला आहे.

1 वायव्येकडील सखल मैदाने
2 मध्यभागातील पर्वतमय प्रदेश
3 दक्षिणेकडील पठारी प्रदेश
4 नद्यांचा मोठा मैदानी प्रदेश
5 बेटांचा समुह प्रदेश

**1 वायव्येकडील सखल मैदाने :** हा विभाग आशियाच्या स्वाभाविक लक्षणामध्ये अत्यंत महत्वाचा आहे. बेंरींगची सामुद्रधुनी पासून कॅस्पीयन समुद्रापर्यंत विस्तारलेला आहे. मध्य भागातील पर्वतमय प्रदेश आणि आर्क्टिक महासागर यांच्या मध्ये दिसून येतो. त्रिकोणी आकार असलेल्या विशाल सखल मैदानाला ''सैबीरीया मैदान'' असे म्हटले जाते. उत्तरेला साधारण उतार भाग आहे. या मैदानातून काही नद्या वाहतात. उदा : लीन, ओब आणि येन्सी. या उत्तरेकडे वाहत जाऊन आर्क्टिक महासागराला मिळतात.

**2 मध्यभागातील पर्वतमय प्रदेश :** हा आशियाचा दुसऱ्या क्रमांकाचा अत्यंत महत्वाचा स्वाभाविक विभाग आहे. वायव्येकडील सखल मैदानाच्या दक्षिण भागात आहे. मध्य आशियामध्ये असलेल्या पर्वतरांगाना ''मध्यभागातील पर्वतमय प्रदेश'' असे म्हणतात. हा आशिया मायनर पासून बेंरींग सामुद्रधुनी पर्यंत विस्तारलेला आहे. येथे अनेक पर्वतरांगा पामीर ग्रंथी पासून सगळीकडे पसरलेल्या आहेत. पूर्व दक्षिण रांगामध्ये, हिमालय, कुनलून, काराकोरम, टियेनशान, आल्टाय, सयान, यब्लोनी, किंगान आणि स्टानवाय पर्वतश्रेणी मुख्य आहेत. पश्चिम श्रेणी मध्ये हिंदुकूश,

©KTBS Not to be republished

किर्तार, सुलेमान, एल्बर्ज, जाग्रोस, ककासस, पोंटीन आणि तारस पर्वतश्रेणी पसरलेल्या आहेत.

घडीचे पर्वत हिमालय श्रेणीच्या पामीर ग्रंथीपासून आग्नेयेला पसरले आहेत. ते जगातील अति उंच पर्वत आहेत. येथील माऊंट एव्हरेस्ट जगातील सर्वात उंच शिखर आहे.



**माऊंट एव्हरेस्ट**

पर्वत रांगामध्ये अनेक पठारी प्रदेश आहेत. उदा : तिबेट, मंगोलिया, इराण, अनटोनीया पठारी प्रदेश इत्यादी. आशिया खंडातील अनेक नद्या उत्तर भागामध्ये उगम पावल्या आहेत.




**स्वाभाविक विभाग**

Not to be republished ©KTBS

**3 दक्षिणेकडील पठारी प्रदेश :** हा कठीण आणि स्फटीक दगडापासून तयार झालेला पुरातन पठारी प्रदेश आहे. त्यामध्ये प्रमुख प्रदेश म्हणजे अरेबीया, दख्खन (भारत) युन्नान (चीन) आणि शान (मॅनमार) ही प्रसिद्ध पठारे आहेत. अरेबीया पठारी प्रदेश एक पर्यायी द्विप आणि कोरडा प्रदेश आहे.

दख्खन पठारी प्रदेशाने भारताच्या द्विपकल्पचा जास्त भाग व्यापलेला आहे. भारतातील पर्वताच्या रांगा पश्चिमघाट आणि पूर्वघाट यामध्ये आहेत. पूर्व दिशेला उतार आहे. त्या कारणाने अनेक नद्या पूर्वदिशेला वाहतात.

चिनच्या नैर्ऋत्येला युन्नान पठारी प्रदेश आहे. हा एक उत्तम प्रतीचा चुनखडीचा प्रदेश आहे. याचा पुढचा भागच शान (मॅनमार) चे पठार होय.

**4 नद्यांचा मोठा मैदानी प्रदेश :** हिंदू महासागर अथवा पॅसिफीक महासागराला मिळालेल्या कित्येक नद्या याच मैदानातून वाहतात. येथील वाहणाऱ्या नद्यामुळे पाण्याबरोबर येणारा गाळ साठतो व सुपीक मैदाने तयार झाली आहेत. या प्रदेशातील मैदाने म्हणजे सिरीया आणि इराकचे तैग्रीस-युफ्रेटीस नद्यांची मैदाने. भारत व पाकिस्तानचे सिंधू-गंगा नद्यांची मैदाने, म्यानमारचे इरावडी-मेंकाग नद्यांची मैदाने. इन्डोचायनामधील मिनाम व मिकांग चीनच्या चियांग जीयांग (यांगस), तसेच सिकीयांग व होयाँग हो नद्यांची मैदाने. या सर्व भागात दाट लोकवस्ती आहे.

**5 बेटांचा समुद्र प्रदेश :** आशिया खंडातील आग्नेय आणि पॅसिफीक महासागराच्या किनाऱ्याला अनेक द्विपसमुह आहेत. या उत्तरेकडील कमचटक पासून दक्षिणेकडील फिलीपाईन्स आणि बोर्नियिा पर्यंत रांगामध्ये (श्रेणीमध्ये) पसरले आहेत. ते पाच समुद्रानी वेढलेले आहे. उदा : ओकाटक समुद्र, जपान समुद्र, हळदी समुद्र, पूर्वचीन समुद्र आणि दक्षिणचीन समुद्र.

**प्रमुख द्विप समुह :** 1) क्युरेल 2) जपान 3) लाचू 4) फिलीपाईन्स आणि 5) बोर्नीयो, यामधील जास्तीत जास्त 'ज्वालामुखी' पासून तयार झाले आहेत. त्याचबरोबर सुपीक माती, खोल दऱ्या आणि शंखाकृती पर्वतांचा समावेश आहे.

## 4 प्रमुख नद्या आणि शेती

**आशियातील प्रमुख नद्या :** आशिया खंडातील नद्याच्या जाळ्यामध्ये विविधता आहे. या खंडातील नद्यावरती स्वाभाविक विभाग आणि जलप्रवाहांचा अधिक प्रभाव पडतो. आर्क्टिक महासागर, पॅसिफीक महासागर आणि हिंदूमहासागराने आशिया

©KTBS Not to be republished

खंडाला वेढले आहे. या खंडातून वाहणाऱ्या जास्तीत जास्त नद्या या सागरानाच जाऊन मिळतात. अशाप्रकारे महासागराना जाऊन मिळणाऱ्या नद्यांच्या आधारे आशिया तील नद्यांचे चार भाग पडतात.

**1) हिंदूमहासागराला जाऊन मिळणाऱ्या नद्या :** यातील मुख्य नद्या सिरिया आणि इराक देशातील तैग्रीस आणि युप्रेटीस नद्या, पर्शियाची खाडीला. पाकिस्तान आणि भारतातील सिंधू, गंगा, आणि ब्रम्हपूत्रा नद्या हिमालयात उगम पावून दक्षिणेकडे वाहत जाऊन हिंदू महासागराला मिळतात. म्यानमार मधील सिट्यांग, साल्वीन आणि इरावडी नद्या बंगालच्या उपसागराला जाऊन मिळतात.

**2) पॅसिफीक महासागराला जाऊन मिळणाऱ्या नद्या :** या समुहातील रशियातील अमर, चीनची हो-यांग हो. चियांग झियांग (यांग्त्से) आणि सिकीयांग नद्या पूर्वेकडे वाहत जाऊन क्रमशः ओकोटस्क, हळदी समुद्र, आणि चीनच्या समुद्राला जाऊन मिळतात. इंडोचिनामधील मिनाम आणि मिकांग नद्या दक्षिणचीन समुद्राला जाऊन मिळतात.




**आशिया खंडातील नद्या**

Not to be republished ©KTBS

**3) आर्क्टिक महासागराला जाऊन मिळणाऱ्या नद्या :** ओब, येन्सी आणि लीन या भागातील प्रमुख नद्या आहेत. या नद्या मध्यभागातील उंचवटयावर उगम पावून उत्तरेकडे वाहत जाऊन आर्क्टिक महासागराला मिळतात.

**4) आंतर्गत नद्या :** या समुहामध्ये असलेल्या नद्या अंतर्गत समुद्राला जाऊन मिळतात. उदा : व्होल्गा आणि उरल नद्या कॅस्पीयन समुद्राला आणि आमुदरीय आणि सिरदरिया नदी अरल समुद्राला जाऊन मिळतात.

## आशियातील शेती

शेती हा आशियातील प्रमुख व्यवसाय आहे. जास्तीतजास्त लोक शेती करतात. आशियातून जास्तीत जास्त प्रमाणात कृषी उत्पादने निर्यात होतात.

आशिया खंडातील शेती आणि नद्या यांचा जवळचा संबंध आहे. सैबेरिया सोडून उरलेली जास्तीत जास्त शेती नदी मैदानी प्रदेशात वसलेली आहे. याला येथील सुपीक माती आणि पाणी पुरवठ्याच्या सोई कारणीभूत आहेत.

आशियातील अनेक देशामध्ये शेतकरी मशागतीसाठी हाताने तयार केलेली उपकरणे आणि प्राणी यांचा उपयोग करतात. अलिकडे ते आधूनिक (Intensive) पद्धतीचा अवलंब करतात.

प्रचलित असलेल्या पद्धती क्रमशः पाण्याची शेती, कोरडी शेती, बागायतीशेती, मिश्र शेती, स्थलांतरीत शेती इत्यादी. अलिकडे आधूनिक शेतीची अवजारे (उपकरणे) रासायनीक ख्रते, अधिक उत्पन्न देणाऱ्या बियाणांचा वापर, इत्यादी पद्धतीचा अवलंब आशियातील काही देशामध्ये जास्त प्रमाणात करत आहेत. तरी सुद्धा आजही अनेक देशामध्ये काही कारणामुळे उत्पन्न कमी आहे.

## पिके



**भाताचे पीक**

आशियाखंडामध्ये अनेक विविध प्रकारची पिके दिसून येतात. भात आणि गहू ही प्रमुख आहार धान्य पिके आहेत. चीन आणि भारत हे भात पिकविणारे प्रमुख देश असून जगातील एकूण भाताच्या उत्पादना पैकी 90% उत्पादन करतो. जपान, बांग्लादेश, थायलंड आणि आग्नेय आशिया हे भात पिकविणारे इतर प्रमुख देश आहेत. चीन, भारत, पाकिस्तान आणि रशिया हे गहू पिकविणारे प्रमुख देश आहेत.

Not to be republished ©KTBS

आशिया जगात रबर आणि चहा उत्पादनामध्ये पुढे आहे. इंडोनेशिया, मलेशिया, आणि थायलंड हे रबर पिकविणारे प्रमुख देश आहेत. चहा पिकविणारे प्रमुख देश म्हणजे चीन, इंडोनेशिया, मलेशिया, भारत आणि थायलंड होय.



**चहाचे मळे**



**कॉफीचे मळे**

©KTBS Not to be republished

आशिया खंडातील इतर पिके : कापूस, ताग आणि ऊस होय. चीन, भारत, पाकिस्तान, टर्की, तुर्कस्तान आणि उझबेकिस्तान हे कापूस पिकविणारे प्रमुख देश आहेत. बांग्लादेश, चीन आणि भारतात तागाचे उत्पादन होते. उसाचे पीक जास्त करुन भारत, इंडोनेशिया, फिलीपाईन्स आणि बांग्लादेशात दिसून येते. जगात ऊस पिकविण्यात भारताचा दुसरा क्रमांक लागतो.

कॉफी, कोकम, विविध तृणधान्ये (राळा, नाचणा, बाजरी) इ. तसेच द्विदल धान्ये, तेलबिया, मसाल्याचे पदार्थ इ. उत्पादने करण्यासाठी आशिया खंड प्रसिद्ध आहे.

## 5 हवामान आणि नैसर्गिक वनस्पती

**हवामान :** आता सांगितल्याप्रमाणे आशिया खंडाचा विस्तार विशाल आहे. दक्षिणेकडील भूमध्य रेषेपासून उत्तर गोलार्धापर्यंत विस्तारलेला आहे. परिणामी त्यामुळे आशिया खंडाच्या विविध भागामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे हवामान दिसून येते. आशियातील काही भागामध्ये जगातील अत्यंत थंड (धृवीय भागातील) हवामान दिसून येते तर काही भागात अति उष्ण हवामान (मध्यभागी आणि नैऋत्येला) आहे. तसेच पाऊस न पडणारा आणि अधिक पाऊस पडणारी ठिकाणे सुद्धा दिसून येतात. आशियाच्या वेगवेगळ्या हवामानाला काही गोष्टी कारणीभूत आहेत. उदा. विशाल विस्तार, अक्षांशाचा विस्तार, स्वाभाविक विभाग, मान्सून वारे इत्यादी.




**वार्षिक तापमान विभागणी**

**तापमान :** सामान्यपणे वेगवेगळया ठिकाणी वेगवेळ्या कालावधीमध्ये हवामानात फरक पडतो. जानेवारी महिन्यामध्ये दक्षिणेकडील देशापेक्षा उत्तरेकडील देशामध्ये अतिशय थंडी असते. सैबीरियातील वर्कोयानस्क हे अति थंडीचे ठिकाण आहे. जुलै महिन्यामध्ये सैबेरियातील उत्तर भाग आणि मध्य आशियातील उंच पर्वत आणि पठारी प्रदेश सोडून आशियाच्या बहुतेक भागात उष्णता जास्त असते. काही भागामध्ये तापमान $40^{o}$ सेल्सीयस पेक्षा जास्त असते.

**पावसाळा :** आशिया खंडात नैर्ऋत्य मान्सून वाऱ्यापासून उन्हाळ्यामध्ये जादा पाऊस पडतो. परंतू मान्सूनचे वारे मध्य आशिया पर्यंत पोहचत नाहीत. तो भाग वर्षभर कोरडाच असतो. पश्चिम आशियातील देशामध्ये पश्चिमी वाऱ्यापासून (प्रती व्यापारी) पाऊस पडतो आणि चीनचा पूर्व भाग आणि फिलीपाईन्स, मलेशिया इत्यादी देशामध्ये उष्ण प्रदेशातून वाहणाऱ्या आवर्त वाऱ्यापासून पाऊस पडतो.

©KTBS Not to be republished




**वार्षिक पावसाचे प्रमाण**

**हिवाळा :** आशिया खंडाच्या जास्तीत जास्त भागामध्ये ऑक्टोबर पासून मार्च पर्यंत हिवाळा असतो. आशियाचा जास्त भाग उत्तर गोलार्धात आहे. या काळात उत्तरगोलार्धावर सुर्याची किरणे तिरपी पडतात. याचा परिणाम म्हणजे आशियाच्या बहुतेक भागात उष्णता अत्यंत कमी असून अति थंड हवामान असते.

मध्य आशियामध्ये वाऱ्याचा दाब जास्त आणि हिंदूमहासागर मध्ये वाऱ्याचा दाब कमी असतो. त्यामुळे जमीनीकडून समुद्राकडे वारे वाहतात. ते वारे कोरडेच असतात. ते पाऊस घेऊन येत नाहीत म्हणून हिवाळ्यात पाऊस कमी असतो.

**उन्हाळा:** हिवाळ्याच्या विरुद्ध उन्हाळ्यात परिस्थिती असते. याची सुरुवात एप्रिल मध्ये होते आणि सप्टेंबर मध्ये संपते. या काळात उत्तर गोलार्धात सूर्याची किरणे लंब रुपाने पडतात. त्यामुळे आशियाच्या जास्त भागामध्ये उष्णता जास्त असते आणि मध्य आशियात त्याची तिव्रता कमी असते. या काळात समुद्रावरुन जमीनीकडे वारे वाहतात. ते कमी जास्त प्रमाणात अशिया खंडात सगळीकडे पाऊस पाडतात.

©KTBS Not to be republished

- जानेवारी महिन्यामध्ये सैबेरियाच्या वर्कोयानस्क येथे-51° से. आणि ओमीयाक्नी या ठिकानी-70° से. कनिष्ठ तपमानाची नोंद होते.
- भारताच्या मेघालय राज्यातील माथेरान येथे जगात सर्वात जास्त पाऊस पडतो. (1187 सें.मी.)

## नैसर्गिक वनस्पती

आशिया खंडातील नैसर्गीक वनस्पती आणि हवामान यामध्ये परस्पर संबंध आहेत. जमीनीचे स्वरुप (भूस्वरुप) माती आणि मानवाचा हस्तक्षेप यांचा सुद्धा वनस्पतीचे प्रकार आणि विभागणी यावर प्रभाव पडतो. आशिया खंडातील वनस्पती मध्ये विविधता आढळून येते. त्यांचे 7 प्रकारामध्ये वर्गीकरण करु शकतो.




नैसर्गीक वनस्पती वर्ग

©KTBS Not to be republished

**1 तंड्रा प्रदेशातील वनस्पती:** या वनस्पती अरुंद व लांब अशा आर्क्टिक किनारपट्टीच्या प्रदेशात आढळतात. येथील बहुतेक भाग हिमकण आणि बर्फाने अच्छादलेला असतो. त्यामुळे तेथे फक्त शेवाळ आणि दगडफूल या वनस्पती आढळतात.

**2 सूचीपर्णी अरण्ये (कोनीफेरस अरण्ये):** सूचीपर्णी अरण्ये तंड्रा प्रदेशात आढळतात. त्यांना 'तैगा अरण्ये' असेही म्हणतात. फर, स्फ्रूस, लार्च, देवदार, पाईन इ. येथे आढळणाऱ्या मुख्य वनस्पती आहेत. या मऊ लाकडाच्या जातीच्या वनस्पती आहेत.



**तैगा अरण्ये**

**3. समशितोष्ण कटीबंधातील गवताळ कुरणे (स्टेपीस) :** मध्य आशिया व वाळवंटीप्रदेश आणि ओसाड भागातील काही भागामध्ये आढळतात. पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे कमी उंचीचे गवत येते.

**4. वाळवंटी वनस्पती :** अशा प्रकारच्या वनस्पती उष्ण कटीबंध आणि सम शितोष्ण कटीबंधातील ओसाड जमीनीवर आढळतात. उदा. अरेबिया, इराण, थरचे वाळवंट इ. ठिकाणी आढळतात. येथे फक्त काटेरी झुडूपे, निवडूंग आणि खुरटे गवत उगवते. ओयासीस जवळ (वाळवंटात पाणी असलेले ठिकाण) खजूर आणि ताडाच्या जातीच्या वनस्पती आढळतात.

Not to be Published



मान्सून अरण्ये

**5 मान्सून अरण्ये :** ही अरण्ये आशिया खंडाचा दक्षिण व नैर्ऋत्य भाग आणि पूर्व आशियाच्या काही भागात आढळतात. येथे अति उष्णता आणि अति पाऊस पडत असल्यामुळे मोठया प्रमाणात अरण्ये आढळतात. साग, साल, शिसव, चंदन, बांबू आणखीन काही जाड (घट्ट) वनस्पती येथे वाढतात. त्यांची शरद ऋतूमध्ये पाने झडतात.

**6 विषुववृत्त प्रदेशातील अरण्ये :** ही अरण्ये पूर्व इंडीस आणि अधिक पाऊस पडणाऱ्या मान्सून प्रदेशात जास्त प्रमाणात आढळतात. ही अरण्ये सदाहरीत अरण्ये आणि उंच वाढणाऱ्या वनस्पतीच्यामुळे तयार झाली आहेत. येथे वाढणाऱ्या प्रमुख वनस्पती म्हणजे महोगनी, एबोनी, रबर, बांबूची बेटे इ. होय.



विषुव वृत प्रदेशातील अरण्ये

©KTBS Not to be republished

**7 मेडीटरेनियन वनस्पती :** या वनस्पती आशिया खंडाच्या नैर्ऋत्य भागात आढळतात. येथे ऑलीव, ओक, सायप्रस, फिग जातीची झाडे आणि खुरटया वनस्पती वाढतात. ही झाडे कमी उंचीची आहेत.

## 6 प्रमुख खनिजे

**लोखंड :** लोखंडाची खनिजे ही लोखंड आणि पोलाद तयार करण्यासाठी लागणारा अत्यावश्यक कच्चा माल आहे. आशिया खंडात भरपूर लोखंडाची खनिजे असून जगातील 30% एवढे खनिजांचे साठे आहेत. चीन हा लोखंडाची खनिजे उत्पादन करणारा अग्रेसर देश आहे. भारत, टर्की, फिलीपाईन्स, मलेशिया, थायलंड, इंडोनेशिया, म्यानमार, व्हिएतनाम, कझाकिस्तान आणि पाकिस्तान हे इतर उत्पादकांपैकी प्रमुख देश आहेत. कोरीया, तैवान, श्रीलंका, जपान आणि नैर्ऋत्य आशियामधील राष्ट्रामध्ये अल्प प्रमाणात लोखंडाची खनिजे आढळतात.




प्रमुख खनिजे

Not to be republished ©KTBS

**म्‌गनीज :** हे एक लोहमिश्रीत खनिज आहे. उच्च प्रतीचे पोलाद तयार करण्यासाठी हे अत्यावश्यक आहे. आशिया खंडात अधिक प्रमाणात मॅगनीजचे साठे आहेत. हे साठे ट्रान्स, ककासस, मध्यआशिया, सैबेरीया, चीन आणि भारतात मोठ्या प्रमाणात आढळतात. मॅगनीज उत्पादनामध्ये चीन अग्रेसर आहे.

**बॉक्साईट :** मॅगनीज हे लोखंडरहीत लोह खनिज आणि अल्यूमिनीयम तयार करण्यासाठीचे अत्यावश्यक खनिज आहे. आशिया हा बॉक्साईटचे भरपूर साठे असणारा खंड आहे. हे साठे कझाकिस्तान आणि दक्षिण मध्य सैबेरीया मध्ये भरपूर प्रमाणात मिळतात. त्याचप्रमाणे भारत इंडोनेशिया, टर्की, मलेशिया, चीन देशामध्येही भरपूर बॉक्साईट मिळते.

**दगडीकोळसा :** दगडी कोळसा हे ज्वाळाग्रही इंधन आहे. हे एक शक्तीचे उगमस्थान आहे. आशिया खंडामध्ये भरपूर प्रमाणात दगडी कोळसा सापडतो. परंतू ते ठिकठिकाणी कमी जास्त प्रमाणात आढळतात. दगडी कोळशाचे साठे चीन, भारत, इंडोनेशिया, सैबेरिया आणि मध्य आशियातील देशामध्ये अधिक प्रमाणात आढळतात.

भरपूर प्रमाणात दगडी कोळशाचे साठे असणारा आणि उत्पादन करणाऱ्या देशामध्ये चीनचा जगात प्रथम क्रमांक लागतो. चीनच्या सर्व भागामध्ये (प्रांतामध्ये) दगडी कोळसा सापडतो. दगडी कोळशाच्या उत्पादनामध्ये आशिया खंडात भारत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. सध्याच्या काळात सैबेरीयामधील कुजेनेटसच्या आसपासचा भाग दगडी कोळशाचे उत्पादन करतो. उझबेकिस्तान, किर्धिस्तान, तजाकिस्तान, पाकिस्तान, आणि जपान या देशामध्ये थोड्या प्रमाणात दगडी कोळशाचे साठे आढळतात.

**पेट्रोलीयम :** पेट्रोलीयम हे एक तेल इंधन आहे. स्वयंचलीत वाहने, रेल्वे, जहाज आणि विमान याना लागणारे हे शक्तीचे साधन आहे. नैर्ऋत्य आशियामध्ये पेट्रोलियमचे भरपूर साठे आहेत. सौदी अरेबिया, इराण, ईराक, कुवैत, बऱ्हेन, कतार, आणि संयुक्त अरब अमिराती (UAE) देशामध्ये जास्त प्रमाणात आढळतात. जगातील एकूण पेट्रोलीयम साठ्यापैकी निम्मे साठे येथे आहेत आणि जगातील 25% पेट्रोलचे उत्पादन होते.

पूर्व आणि आग्नेय आशियामधील काही देशात पेट्रोलियमचे साठे आढळतात. उदा: इंडोनेशिया, मलेशिया, चीन, तैवान, मॅनमार, सार्वाक, भारत, व्हिएतनाम इत्यादी.

©KTBS Not to be republished

सध्याच्या काळात सैबेरीयाच्या काही भागात पेट्रोलीयमचे उत्पादन वाढले आहे.

- पेट्रोलियम शब्द (Petroleum) 'petra' म्हणजे 'दगड' आणि 'Oleum' 'म्हणजे तेल' या दोन लॅटीन शब्दापासून तयार झाला आहे.
- सौदी अरेबीया हा जगात सर्वात जास्त पेट्रोलियम उत्पादन करणारा देश आहे.

मध्य आशियातील तुर्कस्तान, उझबेकीस्तान, कझाकीस्तान इत्यादी भागात देखील भरपूर पेट्रोल सापडते.

## प्रमुख उद्योगधंदे

आशिया खंडाचा विस्तार विशाल आहे. खनिजे आणि कृषी संपत्तीने हा खंड समृद्ध आहे. तरीदेखील यूरोप खंडाएवढे उद्योगधंदे येथे नाहीत. याला कारण म्हणजे नवीन तंत्रज्ञानाचा अभाव, चळवळीचा अभाव, पारंपारीक पद्धतींचा वापर आणि जास्त लोक शेती व्यवसायात गुंतलेले आहेत.

प्रमुख उद्योग धंदे आणि उद्योगधंद्याला अनुरुप असलेल्या भागाला ''औद्योगीक प्रदेश'' असे म्हणतात. येथे उद्योग धंदे स्थापन करण्यासाठी अनुकूल असा काही भागच आढळतो.

आशियातील प्रमुख उद्योग धंद्याचे प्रदेश खालीलप्रमाणे :

**जपान :** या देशात प्रमुख औद्योगिक प्रदेश आहेत.

1. **किहीन प्रदेश :** टोकीओ, कावासकी, आणि याकोहामा या शहरात मोठया प्रमाणात उद्योग धंदे चालतात. येथे कापड उद्योग, यांत्रीक उपकरणे, जहाज बांधणी, कागद तयार करणे आणि सिमेंट उत्पादन हे प्रमुख उद्योगधंदे आहेत.
2. **हान्शीन प्रदेश :** ओसाक, कोबे आणि कियूटो या मोठ्या शहरामध्ये कापड उद्योग प्रमुख आहे.
3. **ऐसे कोल्ली प्रदेश :** हा प्रदेश नगोय शहराच्या भोवती विस्तारलेला आहे. येथे कापड आणि यांत्रीक उपकरणे तयार करण्याचे उद्योगधंदे प्रमुख आहेत.
4. **किट कियूशू प्रदेश :** युवाट, मोज, आणि कोकूर ही शहरे पोलाद, जहाज बांधणी, यांत्रीक उपकरणे, आणि कापड उद्योगासाठी प्रसिद्ध आहेत.

**चीन :** चीन हा शेती प्रधान देश आहे. येथे उद्योगधंदे कमी आहेत. येथे कम्यूनिस्ट सरकार आल्यानंतर उद्योगधंद्याना चालना मिळाली आहे. या देशातील उद्योगधंद्याचे प्रदेश खालिल प्रमाणे.

©KTBS Not to be republished

1. **मंचूरीया प्रदेश :** येथे पोलाद, यांत्रिक उपकरणे आणि रासायनीक उद्योगधंदे प्रमुख आहेत.
2. **बिजींग प्रदेश :** येथे यांत्रिक उपकरणे, जहाज बांधणी, कापड आणि रासायनिक उद्योग मुख्य आहेत.
3. **शान्शी बावटोव :** येथे लोखंड आणि पोलाद व शेतीची अवजारे तयार होतात.
4. **चांग झियांग :** या प्रदेशात कापड उद्योग, जहाज बांधणी, आणि पोलाद तयार करणे इ.उद्योग दिसून येतात.
5. **वुहान प्रदेश :** लोखंड तयार करणे, मोठ्याप्रमाणातील उद्योग धंदे, वस्तू तयार करणे.

**भारतातील उद्योग धंद्याचे प्रदेश:** 1) हुगळी-कोलकत्ता प्रदेश, 2) मुंबई-पूणे प्रदेश, 3) अहमदाबाद-बडोदा प्रदेश, 4) मदूराई कोईमतूर-बेंगळूरु प्रदेश, 5) छोटानागपूर प्रदेश, 6) दिल्ली-मिरत प्रदेश, 7) विशाखापट्टण आणि, 8) कोल्लम-तिरुवनंतरपूर प्रदेश.

दक्षिण कोरिया, हाँगकाँग, सिंगापूर आणि मलेशिया हे आशिया खंडातील इतर उद्योगधंद्याचे प्रदेश आहेत.

## 7) आशिया खंडाची लोकसंख्या

**लोकसंख्येची वाढ :** आशिया खंडाची लोकसंख्या सुमारे 4.2 बिलीयन इतकी आहे. ही लोकसंख्या जागतीक लोकसंखेच्या 60% एवढी आहे. सध्याची लोकसंख्या मागील 3 शतकापेक्षा पाचपटीने वाढलेली आहे. 1950 मध्ये आशिया खंडाची लोकसंख्या फक्त 1.4 बिलीयन होती. आतापर्यंत लोकसंख्या वाढीचे प्रमाण जास्त होते. मात्र आता हे प्रमाण कमी झाले आहे.

**लोकसंख्या विभागणी आणि घनता:** आशिया खंडात लोकसंख्येच्या विभागणीमध्ये मोठ्या प्रमाणात असमानता आहे. नकाशा पहा. आशिया खंडाच्या जास्त भागामध्ये लोकसंख्या विरळ आणि कमी भागामध्ये जास्त लोकसंख्या आहे हे तुम्ही पाहू शकाल.

आशिया खंडातील लोकसंख्येची सरासरी घनता प्रति चौरस किलो मिटरला 96 इतकी आहे. अत्यंत थंडीचे ठिकाण असलेले उत्तर आणि पूर्व सैबेरिया, वाळवंटी प्रदेश असलेला अरेबिया, इराण आणि थरचे वाळवंट (भारत) या भागात आणि अती उंच असलेल्या मध्य आशियातील भागामध्ये लोकसंख्या अत्यंत विरळ आहे.

आशिया खंडात दाट लोकवस्ती असलेल्या देशामध्ये भारतामधील सुपीक मैदानी प्रदेश, बांग्लादेश, चीन, जपान, कोरिया आणि जावा व्दिप (इंडोनेशिया) हे प्रमुख देश आहेत. यातील जास्तीत जास्त भाग सुपीक मैदानी प्रदेश, सपाट मैदानी प्रदेश आणि नदी काठच्या प्रदेशात आहेत. म्यानमार, थायलंड, फिलीपाईन्स,

©KTBS Not to be republished

ईराक, श्रीलंका, व्हिएतनाम, मलेशिया आणि कंबोडीयात देखील लोकसंख्येची घनता वाढलेली आहे.




**आशियाची लोकसंख्या**

आशिया खंडात विविध प्रकारचे लोक राहतात. पूर्व आणि आग्नेय आशिया मध्ये पिवळसर मंगोलियन वर्णाचे लोक राहतात. भारत, पाकिस्तान, बांग्लादेश आणि दक्षिण आशियातील भागामध्ये कृष्णवर्णीय लोक आहेत. नैर्ऋत्य आशियातील भागाम ध्ये अरबी, तुर्की, पर्शियन, अफगान लोक इत्यादी राहतात. मध्य आशियामधील भागामध्ये कझाक आणि किर्घी लोक आहेत. त्याच प्रमाणे विविध धर्माचे लोक सुद्धा आशिया खंडामध्ये आहेत.

**नवीन शब्द :**

शरत्काल, बिलीयन, सुचीपर्णी (कोनीफेरस) ज्वालाग्रही इंधन, घडीचे पर्वत, ग्रंथी, चुनखडी, (पाची, शिलावल्क) ओयॉसिस, तैगा, तंड्रा इ.

©KTBS Not to be republished

## हे तुम्हाला महित असू दे.

- माऊंट एव्हरेस्ट हे आशिया खंडातील सर्वात उंच ठिकाण आहे.(8848 मीटर)
- मृत समुद्र आशिया खंडातील सर्वात खोलीचे ठिकाण आहे.
- जगातील सर्वात जास्त हिमनद्या काराकोरम पर्वतश्रेणी मध्ये आहेत.
- जगात अति उंच असे तिबेटचे पठार आहे. त्याला जगाचे छप्पर असे म्हणतात.
- कॅस्पीयन समुद्र जगातील अत्यंत विशाल सागर आहे.
- दक्षिण सैबेरियातील "बैकल सरोवर" सर्वात खोल सरोवर आहे.
- क्षेत्रफळ आणि लोकसंख्येच्या मानाने मालदीव हा देश आशियातील सर्वात लहान देश आहे.

## गटात चर्चा करुन उत्तर लिही

1. "आशिया खंडाला वैविध्यपूर्ण खंड" का म्हणतात ?
2. आशिया खंडाची भौगोलिक परिस्थिती लिहा.
3. आशिया खंडाचे स्वाभाविक विभाग कोणते ?
4. आशिया खंडातील सर्वात उंच पर्वत आणि पठार कोणते ?
5. आशिया खंडात कोणत्या ऋतूमध्ये जास्त पाऊस पडतो ?
6. आशियातील प्रमुख आहार पिके कोणती ?
7. आशियातील प्रमुख ज्वालाग्रही इंधनाची नांवे लिहा ?
8. आशिया खंडातील कोणत्या भागात लोकसंख्या विरळ आहे ? आणि का?
9. 'औद्योगीक प्रदेश' म्हणजे काय ?

## उपक्रम :

1. तुमच्याकडे असलेल्या ॲटलासच्या सहाय्याने आशिया खंडाच्या नकाशाचा अभ्यास करुन, पर्वत, पठारी प्रदेश, मैदानी प्रदेश, आणि नद्या ओळखा व यादी करा. आणि तुमच्या वहीतील नकाशात दाखवा.
2. आशिया खंडातील प्रमुख नद्या आणि त्यांच्या उपनद्या, यांचे विवरण उदा : उगमस्थान, लांबी उपनद्या, धरणे इ. माहिती आणि चित्रांचा संग्रह करा.
3. तुम्ही रहात असलेल्या आजूबाजूच्या परिसराचे निरीक्षण करा. तेथील पिके, वनस्पती, आणि पाण्याची ठिकाणे याबद्दल यादी करा.

* * * * *

©KTBS Not to be republished